महाराष्ट्र शासन

# पंचायतीसंबंधीचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे ) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापन अहवाल सन - २०२२-२३

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

MAHARASHTRA STATE
PUNE.

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# पंचायतीसंबंधीचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे ) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा अंमलबजावणी

## मूल्यमापन अहवाल
(सन २०२२-२३)



**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१**

# प्रस्तावना

"Panchayat Raj represents true democracy realized. We would regard the humblest and the lowest Indian as being equally the ruler of India with the tallest in the land."

Mahatma Gandhi

महाराष्ट्रातील प्रत्येक आदिवासी जमात ही वैशिष्टयपूर्ण असून त्यांची संस्कृती, परंपरा, जीवन जगण्याची पध्दती विशिष्ट प्रकारची आहे. या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे जतन व्हावे, त्यांच्या विकासाला चालना मिळावी या उद्देशाने ग्रामसभेला विशेष अधिकार देणारा पेसा कायदा केंद्र शासनाने सन १९९६ मध्ये पारित केलेला आहे. तसेच या पेसा कायद्याच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे पंचायत क्षेत्र विस्तार कायद्याला आदिवासींचा स्वशासन कायदा असेही म्हणतात. आदिवासी समाजाला ग्रामसभेच्या माध्यमातून स्वशासनाचा अधिकार या कायद्यामुळे मिळालेला आहे. महाराष्ट्र शासनाने आदिवासी उपयोजनेअंतर्गत ५% अबंध निधी दरवर्षी थेट पेसा ग्रामपंचायतींना वितरीत करण्याचा निर्णय घेऊन या कायद्याला अधिक बळकट केलेले आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना कार्यक्रम यांचा आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीवर झालेला परिणाम/बदल यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधन तसेच मूल्यमापन करण्यात येते. मा. राज्यपाल महोदय, यांचे जा.क्र./TC/CR-४११/PESA Assessment/२३७ दि. १४/१०/२०२० च्या पत्रानुसार पेसा कायदा अंमलबजावणीचा मूल्यमापन अभ्यास करण्यात आलेला आहे.

अनुसूचित क्षेत्रामधील पेसा कायद्याचा प्रचार-प्रसार, पेसा कायद्याची अंमलबजावणी, ५% अबंध निधीचे मूल्यमापन व फलनिष्पत्ती इत्यादी बाबींचा सदर मूल्यमापन अहवालात समावेश करण्यात आलेला आहे. एकूण १३ जिल्ह्यांमधील ५९ तालुक्यांतील विहीत पध्दतीने निवडलेल्या २९३ ग्रामपंचायती व त्यातील ८५२ पेसा गावे यांना क्षेत्रभेटी देऊन, जिल्हा पेसा समन्वयक, तालुका पेसा समन्वयक, सरपंच, ग्रामसेवक, ग्रामसभाकोष अध्यक्ष/ सदस्य, पेसा मोबिलायझर, ग्रामस्थ यांचेकडून ७ प्रकारच्या प्रश्नावलींमधुन गुगल फॉर्मच्या माध्यमातून एकूण ५,९१४ प्रश्नावलींमध्ये माहिती संकलित केलेली आहे. प्राप्त माहितीचे संकलन, पृथ:करण व विश्लेषण करून त्याआधारे पेसा कायदा अंमलबजावणीचा मूल्यमापन अहवाल ए.क्षे.वि.का. शाखेने राज्य पेसा कक्षाच्या सहकार्याने तयार केला असून अहवालात महत्वपूर्ण शिफारसी करण्यात आल्या आहेत.

सदर अहवालाचा पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता व त्याबाबत शासनास धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता उपयोग होईल.

दिनांक : १६/११/ २०२२
ठिकाण : पुणे

(राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
आयुक्त

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

(२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१)

## पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम १९९६ अर्थात पेसा कायदा अंमलबजावणी

**मूल्यमापन अहवाल**

*************


डॉ. राजेंद्र भारूड भा.प्र.से.
आयुक्त
मौलिक मार्गदर्शन

हंसध्वज सोनवणे
उपसंचालक
विशेष मार्गदर्शन

विक्रांत बगाडे
संचालक, राज्य पेसा कक्ष
विशेष मार्गदर्शन

प्रियांका बोकील
संशोधन अधिकारी
मूल्यमापन व अहवाल लेखन मार्गदर्शन

एक्षेविका शाखा

गणेश चिंचकर — क्षेत्रीय कार्यक्रम नियोजन व अहवाल लेखन
सहा. संशोधन अधिकारी

निता रेगडे
मूल्यमापन सल्लागार — तथ्य विश्लेषण (Data Analysis)

ब्रम्हानंद देशमुख — व अहवाल लेखन
प्रकल्प समन्वयक

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | प्रस्तावना | | |
| २ | **प्रकरण - १ पेसा कायदा (पंचायतीसंबंधी उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम - १९९६) ची माहिती** | | |
| | १.१ पेसा कायद्याची पार्श्वभूमी | १ | १ |
| | १.२ पेसा कायदा म्हणजे काय? | १ | २ |
| | १.३ पेसा कायद्याचा हेतू/उद्देश | २ | २ |
| | १.४ पेसा कायद्याचे महत्व | २ | २ |
| | १.५ पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेस प्राप्त अधिकार | ३ | ३ |
| | १.६ पेसा कायद्यांतर्गत स्थापन होणाऱ्या समित्या | ३ | ३ |
| | १.७ पेसा कायदा लागू असलेले महाराष्ट्रातील जिल्हे व तालुके | ४ | ६ |
| | १.८ पेसा कायद्यांतर्गत प्राप्त होणारा ५ % अबंध निधीच्या विनियोगाची कार्यपद्धती | ६ | ८ |
| ३ | **प्रकरण - २ मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे** | ९ | ९ |
| ४ | **प्रकरण - ३ मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी व कार्यपद्धती** | | |
| | ३.१ पार्श्वभूमी | १० | ११ |
| | ३.२ कार्यपध्दती व नमुना निवड | ११ | १४ |
| | ३.३ मूल्यमापन अभ्यासासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखत अनुसूची | १४ | १४ |
| | ३.४ क्षेत्रीय कामाचा कालावधी | १४ | १४ |
| ५ | **प्रकरण - ४ संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण** | | |
| | ४.१ जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | १५ | ३८ |
| | ४.२ तालुका पेसा समन्वयक यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | ३९ | ५९ |
| | ४.३ सरपंचांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | ६० | ८५ |
| | ४.४ ग्रामसेवकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | ८६ | ११५ |
| | ४.५ ग्रामसभा कोष अध्यक्ष /सदस्य यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | ११६ | १४० |
| | ४.६ पेसा मोबिलायझर यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | १४१ | १५६ |
| | ४.७ ग्रामस्थांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण | १५७ | १७२ |
| ६ | **प्रकरण - ५ निष्कर्ष व शिफारसी** | | |
| | ५.१ निष्कर्ष | १७३ | १७७ |
| | ५.२ शिफारसी | १७८ | १८३ |
| ७ | **परिशिष्ट** | | |
| | १. मुलाखत अनुसूची (प्रपत्रे) | १८४ | २२३ |
| | २. पेसा कायदा अधिनियम १९९६ | २२४ | २२८ |

# तक्त्यांची यादी


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | १.१ पेसा कायदा लागू असलेले महाराष्ट्रातील जिल्हे व तालुके. | ४-५ |
| २ | १.२ वर्षनिहाय प्राप्त ५% अबंध निधीबाबत तपशिल. | ७ |
| ३ | १.३ जिल्हा निहाय प्राप्त ५% अबंध निधीबाबत तपशिल. | ८ |
| ४ | ३.१ मूल्यमापनासाठी निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायती व गावांची संख्या. | १२-१४ |
| ५ | ४.१.१ जिल्हा समन्वयक यांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाल्याचा स्त्रोत. | १५ |
| ६ | ४.१.२ जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम. | १६ |
| ७ | ४.१.३ पेसा कायद्याचे गाव स्तरावरील व्यक्तींच्या प्रशिक्षणाविषयी तपशिल. | १७ |
| ८ | ४.१.४ पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे प्रशिक्षणाबाबत माहिती. | १८ |
| ९ | ४.१.५ शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण करणेसंबंधीची माहिती. | १९ |
| १० | ४.१.६ शासनामार्फत जिल्हा पेसा समन्वयकांना पेसा कायद्याबाबत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणासंबंधीची माहिती. | २० |
| ११ | ४.१.७ पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणाऱ्या विषयांची माहिती. | २१ |
| १२ | ४.१.८ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांच्या सहकार्याबाबत. | २३ |
| १३ | ४.१.९ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | २४ |
| १४ | ४.१.१० पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्धतेबाबत. | २५ |
| १५ | ४.१.११ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णय व परिपत्रके यामधील तफावतीबाबत. | २५ |
| १६ | ४.१.१२ पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी जास्त वापर झालेल्या अधिकारांबाबत. | २८ |
| १७ | ४.१.१३ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून केले जाणारे प्रयत्न. | २९ |
| १८ | ४.१.१४ आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून केलेले प्रयत्न. | ३० |
| १९ | ४.१.१५ लहान जलस्त्रोतांच्या उपयोगाबाबत. | ३० |
| २० | ४.१.१६ पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेबाबत. | ३१ |
| २१ | ४.१.१७ गौण वनउपज विक्रीच्या प्रक्रियेबाबत. | ३१ |
| २२ | ४.१.१८ विकास गटामधील मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती. | ३२ |
| २३ | ४.१.१९ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल. | ३२ |
| २४ | ४.१.२० पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत. | ३४ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २५ | ४.१.२१ पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत. | ३४ |
| २६ | ४.१.२२ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | ३५ |
| २७ | ४.१.२३ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत. | ३५ |
| २८ | ४.२.१ पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळणेचा स्त्रोत. | ३९ |
| २९ | ४.२.२ जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याबाबत माहिती देण्याचे माध्यम. | ४० |
| ३० | ४.२.३ प्रशिक्षण दिल्या जाणाऱ्या व्यक्तींचा तपशिल. | ४१ |
| ३१ | ४.२.४ प्रशिक्षण घेण्यात आलेल्या समित्यांची माहिती. | ४१ |
| ३२ | ४.२.५ शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण करणेसंबंधीची माहिती. | ४२ |
| ३३ | ४.२.६ शासनामार्फत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती देणेबाबत तपशिल. | ४२ |
| ३४ | ४.२.७ तालुका पेसा समन्वयक यांच्या पेसा प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेल्या विषयासंबंधीची माहिती. | ४३ |
| ३५ | ४.२.८ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत. | ४५ |
| ३६ | ४.२.९ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत | ४६ |
| ३७ | ४.२.१० पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | ४६ |
| ३८ | ४.२.११ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत. | ४७ |
| ३९ | ४.२.१२ पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी जास्त वापर झालेल्या अधिकारांबाबत. | ४८ |
| ४० | ४.२.१३ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी तालुका समन्वयकांकडूनकेले जाणारे प्रयत्न. | ४९ |
| ४१ | ४.२.१४ आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी तालुका समन्वयकांकडून केलेले प्रयत्न. | ५० |
| ४२ | ४.२.१५ लहान जलस्त्रोतांच्या उपयोगाबाबत. | ५० |
| ४३ | ४.२.१६ पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेबाबत. | ५१ |
| ४४ | ४.२.१७ गौण वनउपज विक्रीच्या प्रक्रियेबाबत. | ५२ |
| ४५ | ४.२.१८ विकास गटामधील मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती. | ५३ |
| ४६ | ४.२.१९ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल. | ५३ |
| ४७ | ४.२.२० पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत. | ५४ |
| ४८ | ४.२.२१ पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत. | ५५ |
| ४९ | ४.२.२२ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | ५५ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५० | ४.२.२३ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत. | ५६ |
| ५१ | ४.३.१ सरपंचांना पेसा कायदा - १९९६ ची माहिती मिळाल्याचा स्त्रोत. | ६० |
| ५२ | ४.३.२ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत तपशिल. | ६१ |
| ५३ | ४.३.३ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ६२ |
| ५४ | ४.३.४ ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम. | ६२ |
| ५५ | ४.३.५ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल. | ६३ |
| ५६ | ४.३.६ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाबाबत सरपंचांचा जिल्हानिहाय तपशिल. | ६३ |
| ५७ | ४.३.७ पेसा कायद्याचे प्रशिक्षणाचा स्त्रोत. | ६४ |
| ५८ | ४.३.८ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धी बाबत. | ६५ |
| ५९ | ४.३.९ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ६६ |
| ६० | ४.३.१० ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम. | ६६ |
| ६१ | ४.३.११ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने. | ६७ |
| ६२ | ४.३.१२ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्धतेबाबत. | ६८ |
| ६३ | ४.३.१३ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून उपलब्ध साहित्याचा तपशिल. | ६९ |
| ६४ | ४.३.१४ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल. | ६९ |
| ६५ | ४.३.१५ सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत तपशिल. | ७० |
| ६६ | ४.३.१६ सर्व समित्यांच्या कामकाजातील सरपंचांच्या सहभागाबाबत. | ७१ |
| ६७ | ४.३.१७ समितीचे अभिलेखे व दस्तऐवजांच्या तपासणीबाबत तपशिल. | ७१ |
| ६८ | ४.३.१८ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरच्या निवडीबाबत. | ७१ |
| ६९ | ४.३.१९ पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होणाऱ्या उपयोगाचा तपशिल. | ७२ |
| ७० | ४.३.२० पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत. | ७२ |
| ७१ | ४.३.२१ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | ७३ |
| ७२ | ४.३.२२ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | ७३ |
| ७३ | ४.३.२३ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत. | ७४ |
| ७४ | ४.३.२४ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत. | ७४ |
| ७५ | ४.३.२५ पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांनी पूर्णपणे वापर केलेल्या विशेष अधिकारांचा तपशिल. | ७५ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ७६ | ४.३.२६ पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पूर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी आवश्यक उपाययोजना. | ७७ |
| ७७ | ४.३.२७ पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत. | ७७ |
| ७८ | ४.३.२८ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल. | ७८ |
| ७९ | ४.३.२९ पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत. | ७९ |
| ८० | ४.३.३० पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत. | ८० |
| ८१ | ४.३.३१ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ८० |
| ८२ | ४.३.३२ लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | ८१ |
| ८३ | ४.३.३३ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | ८२ |
| ८४ | ४.३.३४ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाचा जिल्हानिहाय तपशिल. | ८२ |
| ८५ | ४.३.३५ मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | ८३ |
| ८६ | ४.३.३६ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत. | ८३ |
| ८७ | ४.३.३७ सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | ८४ |
| ८८ | ४.४.१ पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत. | ८६ |
| ८९ | ४.४.२ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत माहिती. | ८७ |
| ९० | ४.४.३ ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देण्याचा स्त्रोत. | ८८ |
| ९१ | ४.४.४ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल. | ८९ |
| ९२ | ४.४.५ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाबाबत ग्रामसेवकांचा जिल्हानिहाय तपशिल. | ८९ |
| ९३ | ४.४.६ पेसा कायद्याचे प्रशिक्षण देणाऱ्या यंत्रणाबाबतची माहिती. | ९० |
| ९४ | ४.४.७ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत. | ९१ |
| ९५ | ४.४.८ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ९२ |
| ९६ | ४.४.९ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम. | ९३ |
| ९७ | ४.४.१० पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने. | ९३ |
| ९८ | ४.४.११ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्धतेबाबत. | ९४ |
| ९९ | ४.४.१२ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून उपलब्ध साहित्याचा तपशिल. | ९५ |
| १०० | ४.४.१३ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल. | ९६ |
| १०१ | ४.४.१४ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये पेसा विषयक स्थापन केलेल्या सामित्यांची माहिती. | ९७ |
| १०२ | ४.४.१५ सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत तपशिल. | ९८ |
| १०३ | ४.४.१६ सर्व समित्यांच्या कामकाजातील ग्रामसेवकांच्या सहभागाबाबत. | ९९ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १०४ | ४.४.१७ समितीचे अभिलेखे व दस्तऐवजांच्या तपासणीबाबत तपशिल. | ९९ |
| १०५ | ४.४.१८ ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरच्या निवडीबाबत. | ९९ |
| १०६ | ४.४.१९ पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होणाऱ्या उपयोगाचा तपशिल. | १०० |
| १०७ | ४.४.२० पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत. | १०१ |
| १०८ | ४.४.२१ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हास्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत . | १०१ |
| १०९ | ४.४.२२ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | १०२ |
| ११० | ४.४.२३ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत. | १०२ |
| १११ | ४.४.२४ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत | १०३ |
| ११२ | ४.४.२५ पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांनी पूर्णपणे वापर केलेल्या विशेष अधिकारांचा तपशिल. | १०४ |
| ११३ | ४.४.२६ पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पूर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी आवश्यक उपाययोजना. | १०५ |
| ११४ | ४.४.२७ पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत. | १०५ |
| ११५ | ४.४.२८ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्याचा समावेश ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आराखड्यात करणेबाबत. | १०६ |
| ११६ | ४.४.२९ पेसा ५% अबंध निधीचा समावेश ग्रामविकास आराखड्यामध्ये करण्यात आला असल्यास सदर आराखड्यात तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीच्या मंजुरीबाबत तपशिल. | १०७ |
| ११७ | ४.४.३० पेसा ५% अबंध निधीचा समावेश असलेला ग्रामपंचायत विकास आराखडा इ. ग्रामस्वराज या वेबपोर्टलवर अपलोड करणेबाबत. | १०७ |
| ११८ | ४.४.३१ पेसा ५% अबंध निधीच्या अनुषंगाने वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेली कामे. | १०८ |
| ११९ | ४.४.३२ पेसा ५% अबंध निधीच्या विनियोगाबाबतची माहिती. | १०८ |
| १२० | ४.४.३३ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत | ११० |
| १२१ | ४.४.३४ पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत. | ११० |
| १२२ | ४.४.३५ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत. | १११ |
| १२३ | ४.४.३६ लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | १११ |
| १२४ | ४.४.३७ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | ११२ |
| १२५ | ४.४.३८ मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | ११२ |
| १२६ | ४.४.३९ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत. | ११३ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १२७ | ४.४.४० सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | ११३ |
| १२८ | ४.५.१ ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/ सदस्य यांचा जिल्हानिहाय तपशिल. | ११६ |
| १२९ | ४.५.२ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल. | ११७ |
| १३० | ४.५.३ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा जिल्हानिहाय तपशिल. | ११७ |
| १३१ | ४.५.४ पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले याचा तपशिल. | ११८ |
| १३२ | ४.५.५ गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत. | ११९ |
| १३३ | ४.५.६ गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ११९ |
| १३४ | ४.५.७ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम. | १२० |
| १३५ | ४.५.८ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे माध्यम/साधन | १२१ |
| १३६ | ४.५.९ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल. | १२२ |
| १३७ | ४.५.१० ग्रामसभा कोष समितीची स्थापना कोणामार्फत करण्यात आली याबाबत तपशिल. | १२३ |
| १३८ | ४.५.११ ग्रामसभा कोष समितीचा कालावधी | १२३ |
| १३९ | ४.५.१२ ग्रामसभा कोष समिती कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत. | १२४ |
| १४० | ४.५.१३ ग्रामसभा कोष समितीच्या कामकाजातील अध्यक्ष/सदस्यांचा सहभाग. | १२४ |
| १४१ | ४.५.१४ ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्यांचा समितीच्या कामकाजातील सहभाग. | १२४ |
| १४२ | ४.५.१५ गावामध्ये ग्रामसभेचे स्वतंत्र कक्ष/कार्यालयाबाबत. | १२५ |
| १४३ | ४.५.१६ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | १२५ |
| १४४ | ४.५.१७ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत. | १२६ |
| १४५ | ४.५.१८ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत. | १२६ |
| १४६ | ४.५.१९ ग्रामसभा कोष समितीला देण्यात आलेल्या अधिकारांचा तपशिल. | १२८ |
| १४७ | ४.५.२० पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत. | १२८ |
| १४८ | ४.५.२१ पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत जिल्हानिहाय तपशिल. | १२९ |
| १४९ | ४.५.२२ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामधील कामांचा तपशिल. | १२९ |
| १५० | ४.५.२३ पेसा ५ % अबंध निधीसाठी ग्रामसभा कोष समितीचे स्वतंत्र बँक खात्याबाबत तपशिल. | १३० |
| १५१ | ४.५.२४ ग्रामसभा कोष समितीचे अभिलेखे व विविध रजिस्टर जतन तपशिल. | १३१ |
| १५२ | ४.५.२५ अद्यावत ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांचा तपशिल. | १३१ |
| १५३ | ४.५.२६ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत. | १३४ |
| १५४ | ४.५.२७ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | १३४ |
| १५५ | ४.५.२८ लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | १३५ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १५६ | ४.५.२९ पेसा ५% अबंध निधीच्या नोंदवह्यांबाबत. | १३५ |
| १५७ | ४.५.३० पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | १३५ |
| १५८ | ४.५.३१ मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | १३६ |
| १५९ | ४.५.३२ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत | १३७ |
| १६० | ४.५.३३ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | १३७ |
| १६१ | ४.५.३४ सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल. | १३८ |
| १६२ | ४.५.३५ पेसा ५% अबंध निधी योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीबाबत. | १३९ |
| १६३ | ४.६.१ पेसा मोबिलायझर या पदावर निवड करणारी यंत्रणा. | १४१ |
| १६४ | ४.६.२ पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाबाबतची माहिती. | १४२ |
| १६५ | ४.६.३ पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाविषयी मोबिलायझर यांची जिल्हानिहाय माहिती. | १४३ |
| १६६ | ४.६.४ पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामधून पेसा मोबिलायझर या पदाची कर्तव्ये व जबाबदारीच्या आकलनाबाबत माहिती. | १४३ |
| १६७ | ४.६.५ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेच्या आयोजनाबाबतची माहिती. | १४५ |
| १६८ | ४.६.६ ग्रामसभेचे आयोजन करणेकरिता मोबिलायझरमार्फत करण्यात येणाऱ्या बाबी. | १४६ |
| १६९ | ४.६.७ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबतची माहिती. | १४७ |
| १७० | ४.६.८ ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती दिलेला स्त्रोत. | १४७ |
| १७१ | ४.६.९ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबतची माहिती. | १४८ |
| १७२ | ४.६.१० पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम . | १४९ |
| १७३ | ४.६.११ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांविषयीची माहिती. | १५० |
| १७४ | ४.६.१२ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये स्थापन केलेल्या पेसा विषयक समित्यांची माहिती. | १५२ |
| १७५ | ४.६.१३ ग्रामसभेच्या कामकाजातील सहभागाबाबत. | १५३ |
| १७६ | ४.६.१४ पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या पूर्णपणे वापराबाबतची माहिती. | १५३ |
| १७७ | ४.६.१५ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांचेमार्फत पूर्णपणे वापर करण्यात येणाऱ्या विशेष अधिकारांचा तपशिल. | १५४ |
| १७८ | ४.७.१ ग्रामस्थांच्या पेसा कायद्याविषयक माहितीचा तपशिल. | १५७ |
| १७९ | ४.७.२ पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत. | १५८ |
| १८० | ४.७.३ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस ग्रामस्थांच्या उपस्थितीबाबत माहिती. | १५८ |
| १८१ | ४.७.४ पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला देण्याचा स्त्रोत. | १५९ |
| १८२ | ४.७.५ पेसा कायद्याच्या प्रशिक्षणाविषयीची माहिती. | १६० |
| १८३ | ४.७.६ पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळण्याचा स्त्रोत. | १६१ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १८४ | ४.७.७ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीविषयीची माहिती. | १६२ |
| १८५ | ४.७.८ पेसा कायद्याविषयी करण्यात आलेल्या प्रचार व प्रसिद्धीसंबंधीची माहिती. | १६३ |
| १८६ | ४.७.९ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम. | १६३ |
| १८७ | ४.७.१० ग्रामसभेच्या बैठकांच्या नियमित उपस्थितीबाबत. | १६४ |
| १८८ | ४.७.११ पेसा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेणेबाबत माहिती. | १६५ |
| १८९ | ४.७.१२ गावातील विविध विकास कामे ठरविण्यासाठी ग्रामसभेत सूचना करणेसंबंधीची माहिती. | १६६ |
| १९० | ४.७.१३ ग्रामसभेत घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत तपशिल . | १६६ |
| १९१ | ४.७.१४ पेसा कायद्यानुसार मिळालेले अधिकाराविषयीची माहिती. | १६७ |
| १९२ | ४.७.१५ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांविषयीची माहिती. | १६८ |
| १९३ | ४.७.१६ पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला झालेल्या फायद्याविषयीची माहिती. | १७० |
| १९४ | ४.७.१७ पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेणेबाबतची माहिती. | १७० |
| १९५ | ४.७.१८ ग्रामसभा आराखड्यानुसार पाडा/वस्तीतील पूर्ण करण्यात आलेल्या कामासंबंधीची माहिती. | १७१ |
| १९६ | ४.७.१९ ग्रामपंचायती/ग्रामकोष समितीने केलेल्या कामावर समाधानी असणेबाबत ग्रामस्थांची मते. | १७१ |
| १९७ | ४.७.२० ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजेनुसार कामाचा प्राधान्य क्रम ठरविणेबाबतची माहिती. | १७२ |
| १९८ | ४.७.२१ पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला मिळालेल्या चालनेबाबत. | १७२ |


## आलेखांची यादी


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ४.१.१ पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत. | १६ |
| २ | ४.१.२ जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम. | १७ |
| ३ | ४.१.३ शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण करणेसंबंधीची माहिती. | १९ |
| ४ | ४.१.४ शासनामार्फत जिल्हा पेसा समन्वयकांना पेसा कायद्याबाबत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणासंबंधीची माहिती. | २० |
| ५ | ४.१.५ पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणाऱ्या विषयांची माहिती. | २१ |
| ६ | ४.१.६ पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांच्या सहकार्याबाबत. | २४ |
| ७ | ४.१.७ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून केले जाणारे प्रयत्न. | २९ |
| ८ | ४.२.१ पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळणेचा स्त्रोत. | ३९ |
| ९ | ४.२.२ जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याबाबत माहिती देण्याचे माध्यम. | ४० |
| १० | ४.२.३ पेसा प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेले विषय. | ४३ |
| ११ | ४.२.४ ग्रामसभा व ग्रामपंचायत यांनी जास्त वापर केलेल्या अधिकारांची माहिती. | ४९ |
| १२ | ४.२.५ गौण वनउपज विक्रीच्या प्रक्रियेबाबत. | ५२ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १३ | ४.२.६ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत. | ५४ |
| १४ | ४.३.१ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत तपशिल. | ६१ |
| १५ | ४.३.२ पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाबाबत सरपंचांचा जिल्हानिहाय तपशिल. | ६४ |
| १६ | ४.३.३ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने. | ६७ |
| १७ | ४.३.४ शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्धतेबाबत. | ६८ |
| १८ | ४.३.५ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत. | ७५ |
| १९ | ४.३.६ पूर्णपणे वापर केलेल्या विशेष अधिकारांचा तपशिल. | ७६ |
| २० | ४.३.७ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | ८१ |
| २१ | ४.४.१ पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत. | ८६ |
| २२ | ४.४.२ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत माहिती. | ८७ |
| २३ | ४.४.३ ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देण्याचा स्त्रोत. | ८८ |
| २४ | ४.४.४ पेसा कायदा प्रशिक्षणाबाबत ग्रामसेवकांचा जिल्हानिहाय तपशिल. | ९० |
| २५ | ४.४.५ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धी बाबत. | ९१ |
| २६ | ४.४.६ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने. | ९४ |
| २७ | ४.४.७ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून उपलब्ध साहित्याचा तपशिल. | ९५ |
| २८ | ४.४.८ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये पेसा विषयक स्थापन केलेल्या सामित्यांविषयीची माहिती. | ९७ |
| २९ | ४.४.९ पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होत असलेल्या उपयोगाबाबत. | १०० |
| ३० | ४.४.१० पूर्णपणे वापरत असलेले विशेष अधिकार. | १०४ |
| ३१ | ४.४.११ उपक्रमांचे/ कामाचे लेखापरीक्षणाबाबत. | १११ |
| ३२ | ४.४.१२ संनियंत्रण केलेल्या यंत्रणांचा तपशिल. | ११३ |
| ३३ | ४.५.१ पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले याचा तपशिल. | ११८ |
| ३४ | ४.५.२ गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल. | १२० |
| ३५ | ४.५.३ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे माध्यम/साधन. | १२१ |
| ३६ | ४.५.४ ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत. | १२७ |
| ३७ | ४.५.५ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामधील कामांचा तपशिल. | १३० |
| ३८ | ४.५.६ अद्यावत ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांचा तपशिल. | १३२ |
| ३९ | ४.५.७ पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत. | १३६ |
| ४० | ४.५.८ उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत जिल्हानिहाय तपशिल. | १३८ |
| ४१ | ४.६.१ पेसा मोबिलायझर या पदावर निवड करणारी यंत्रणा. | १४१ |
| ४२ | ४.६.२ पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाबाबतची माहिती. | १४२ |
| ४३ | ४.६.३ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेच्या आयोजनाबाबतची माहिती. | १४५ |
| ४४ | ४.६.४ प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करणेकरिता मोबिलायझर मार्फत करण्यात येणाऱ्या बाबी. | १४६ |
| ४५ | ४.६.५ ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती दिलेला स्त्रोत. | १४८ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४६ | ४.६.६ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबतची माहिती. | १४९ |
| ४७ | ४.६.७ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम. | १५० |
| ४८ | ४.६.८ पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेले उपक्रमांविषयीची माहिती. | १५१ |
| ४९ | ४.६.९ पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये स्थापन केलेल्या पेसा विषयक समित्यांची माहिती. | १५२ |
| ५० | ४.६.१० पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांचेमार्फत पूर्णपणे वापर करण्यात येणाऱ्या विशेष अधिकारांचा तपशिल. | १५४ |
| ५१ | ४.७.१ ग्रामस्थांच्या पेसा कायद्याविषयक माहितीचा तपशिल. | १५७ |
| ५२ | ४.७.२ ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस ग्रामस्थांच्या उपस्थितीबाबत माहिती. | १५९ |
| ५३ | ४.७.३ पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला देण्याचा स्त्रोत. | १६० |
| ५४ | ४.७.४ पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळण्याचा स्त्रोत. | १६१ |
| ५५ | ४.७.५ ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीविषयीची माहिती. | १६२ |
| ५६ | ४.७.६ पेसा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेणेबाबत माहिती. | १६५ |
| ५७ | ४.७.७ ग्रामसभेत सूचना करणेसंबंधीची माहिती. | १६६ |
| ५८ | ४.७.८ पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांविषयीची माहिती. | १६८ |
| ५९ | ४.७.९ पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला झालेल्या फायद्याविषयीची माहिती. | १७० |





**ग्रामस्थांकडून मुलाखत अनुसूची भरून घेताना अन्वेषक**

# प्रकरण - १

# (पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम - १९९६) अर्थात पेसा कायद्याची माहिती

## १.१ पेसा कायद्याची पार्श्वभूमी :

केंद्र शासनाने पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी व त्यांना स्वायत्तता देण्यासाठी ७३ वी घटना दुरुस्ती केली परंतु ५ व्या अनुसूचीच्या वैशिष्टपूर्ण रचनेमुळे अनुसूचित क्षेत्राला ७३ व्या घटना दुरुस्तीतील तरतुदी आहेत तशा लागू करता येत नव्हत्या कारण, घटनेतील ५ व्या अनुसूचीप्रमाणे राष्ट्रपतींना व राज्यपालांना आदिवासींच्या हितांचे रक्षण करण्यासाठी या अनुसूचीने काही विशेष अधिकार प्रदान केले आहेत.

केंद्र शासनाने ७३ व्या घटना दुरुस्तीच्या तरतुदी अनुसूचित क्षेत्राला कशा लागू करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी डॉ. दिलीपसिंग भुरिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. या समितीच्या शिफारसी प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाने आदिवासीच्या हितांचे रक्षण करणारा व त्यांच्या विकासाला चालना देणारा "पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करणे) अधिनियम" सन १९९६ पारित केला. या कायद्याच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे या कायद्याला पंचायतींचा स्वशासन कायदा असे म्हणतात.

## १.२ पेसा कायदा म्हणजे काय?

Provisions of the Panchayats (Extention to The Scheduled Areas) Act १९९६, (PESA Act) म्हणजे पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करणे) अधिनियम - १९९६. पेसा कायदा आदिवासी क्षेत्रातील पंचायतराज व्यवस्था सुदृढ होणेसाठी निर्माण करण्यात आलेला आहे. आदिवासींच्या ज्या परंपरा, चालीरीती आहेत त्यांचे जतन करणे आणि त्यांना स्वशासनाचे अधिकार देणे हे या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

पेसा कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील लोकांच्या परंपरा व रूढी, त्यांची सांस्कृतिक ओळख, सामुहिक साधनसंपत्ती आणि तंटा निवारण्याची रूढीगत पद्धत आणि गौण उत्पादनावरील मालकी इत्यादीचे हक्क बहाल करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा आणि पंचायतींना अधिकार प्रदान केले आहेत. तसेच गावाच्या विकासाच्या दृष्टीने विकास योजनांना मान्यता देणे, त्यांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवणे, कामांचे मूल्यमापन करणे, विविध योजनांसाठी लाभधारकांची निवड करणे, जमिनीच्या हस्तांतरावर निर्बंध घालणे, सावकारी व बाजारावर नियंत्रण ठेवणे याबाबतचे अधिकारही पंचायतींना, ग्रामसभेला देण्यात आले आहेत.

**१.३ पेसा कायद्याचा हेतू/उद्देश :**

१) अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना, स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम करणे त्यांना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार पंचायतींना बहाल करणे.

२) पेसा कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेल्या अशा अधिकार व प्राधिकारांचे संपूर्णत: विकेंद्रीकरण करून पंचायतींना त्या शक्ती पूर्णपणे प्रदान करणे.

**१.४ पेसा कायद्याचे महत्व :**

आदिवासींचा व्यक्तीगत व सामुहिक विकास तसेच गावाचा विकास होण्यासाठी पेसा कायद्यात महत्वाच्या तरतुदी आहेत.

गावाचा एकात्मिक विकास आराखडा तयार करुन त्याला ग्रामसभेत मान्यता घेणे व गावाचा एकात्मिक व नियोजनबध्द विकास साधण्यासाठी ग्रामसभेची आराखड्यातील कामांनाच मंजुरी घेणे यामुळे लोकांच्या गरजेनुसार व इच्छेनुसार कामे होण्यास व पर्यायाने गावच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणे अपेक्षित आहे.

या कायद्यान्वये आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या विविध प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीबाबत तसेच जमिनीबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. या कायद्यान्वये गावासाठीच्या योजना व प्रकल्पांकरिता सर्व ग्रामसभांची मान्यता मिळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. जलस्त्रोत, सिंचन, खाण-खनिजे आणि गौण वनोत्पादन यांचे व्यवस्थापन हेही ग्रामसभेकडे विहित करण्यात आले आहे. अनुसूचित जमातीतील व्यक्तींची कोणतीही जमीन बिगर आदिवासींकडे बेकायदेशीरपणे हस्तांतर होणार नाही, याची ग्रामसभा सुनिश्चिती करेल असे अपेक्षित आहे.

५ टक्के अबंध निधीतून ग्रामपंचायतींना आवश्यक असलेल्या प्राथमिक सोयी- सुविधा प्राप्त करून घेणे सुकर होणार आहे.

### १.५ पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेस प्राप्त अधिकार :

पेसा कायद्यांतर्गत पेसा गावांना प्राप्त झालेले अधिकार पुढीलप्रमाणे.

१) पाडे/वस्ती/वाड्या यांना नवीन स्वतंत्र गाव होण्याचा व ग्रामसभा घेण्याचा अधिकार.

२) आदिवासी समूहाचे रूढी, परंपरा जतन करण्याचा अधिकार.

३) विविध योजना, कार्यक्रम आराखडे व कामे मंजूर करण्याचा अधिकार.

४) विकास योजना कार्यक्रम आराखडे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार.

५) विकास कामांचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याचा अधिकार.

६) गौण वनोपज वापर, उपयोग आणि व्यवस्थापनाचा अधिकार.

७) जमीन अधिग्रहणापूर्वी ग्रामसभेची मंजुरी घेण्याचा अधिकार

८) आदिवासींची बेकायादेशिररित्या हस्तांतरीत झालेली जमीन परत मिळविण्याचा अधिकार.

९) लघु जलसंचय आणि मासेमारी व्यवस्थापनाचे अधिकार.

१०) गौण खनिजाबाबत उत्खननास शिफारस करण्याचा अधिकार.

११) अनाधिकृत सावकारीला आळा घालणे व त्याचे नियमन करण्याचा अधिकार.

१२) अंमली पदार्थाचे सेवनावर निर्बंध व नियमन करण्याचे अधिकार.

१३) बाजारांच्या व्यवस्थापनाचे अधिकार.

१४) विविध शासकीय योजनांसंदर्भात लाभार्थींची निवड करण्याचे अधिकार.

१५) नैसर्गिक साधनसंपत्ती शेती व जमीन यांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार.

### १.६ पेसा कायद्यांतर्गत स्थापन होणाऱ्या समित्या :

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

अ) ग्रामसभा कोष समिती

आ) साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती

इ) शांतता समिती

ई) बाजार व्यवस्थापन समिती

उ) मादक द्रव्य नियंत्रण समिती

ऊ) ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती

ए) न्याय समिती

ऐ) कर्ज नियंत्रण समिती

ओ) जमीन व्यवस्थापन समिती

## १.७ पेसा कायदा लागू असलेले महाराष्ट्रातील जिल्हे व तालुके :

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ हा केंद्र शासनाचा कायदा असून तो २४ डिसेंबर १९९६ पासून लागू करण्यात आला आहे. हा कायदा भारतातील १० राज्यातील अनुसूचित क्षेत्राला लागू होतो. यामध्ये आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडीसा, छत्तीसगड, तेलंगणा व झारखंड या राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील १३ जिल्हे, ५९ तालुके, २९२९ ग्रामपंचायती आणि ८४१३ गावांचा यामध्ये समावेश आहे. अनुसूचित क्षेत्रात असणारे महाराष्ट्र राज्यातील जिल्हे, तालुके व तालुक्यांतर्गत समाविष्ट असणाऱ्या ग्रामपंचायती व पेसा गावांची संख्या पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र.- १.१**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या तालुक्याचे नाव | पेसा ग्रामपंचायतींची संख्या | अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या पेसा गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | शहापूर | ११० | ५४० |
| | | मुरबाड | ५५ | २१६ |
| | | भिवंडी | ३९ | १७६ |
| २ | पालघर | तलासरी | २१ | ११४ |
| | | डहाणू | ८५ | २७५ |
| | | पालघर | ८७ | २०८ |
| | | वाडा | ८४ | ३३५ |
| | | वसई | १९ | ८० |
| | | विक्रमगड | ४२ | १७६ |
| | | जव्हार | ५० | १७९ |
| | | मोखाडा | २७ | १११ |
| ३ | नंदुरबार | शहादा | ११२ | १७३ |
| | | अक्कलकुवा | ७७ | २१० |
| | | अक्राणी | ५० | १७६ |
| | | तळोदा | ६७ | १२० |
| | | नवापूर | ११४ | २२२ |
| | | नंदुरबार | ९८ | १०७ |
| ४ | धुळे | साक्री | १०६ | ३२२ |
| | | शिरपूर | ५२ | २०८ |
| ५ | जळगाव | चोपडा | १४ | ४० |
| | | रावेर | १३ | ३० |
| | | यावल | ५ | १७ |
| ६ | नाशिक | कळवण | ८६ | २०१ |
| | | सुरगाणा | ६१ | २७९ |
| | | पेठ | ७३ | २०८ |
| | | दिंडोरी | १०४ | १९३ |
| | | देवळा | २२ | २९ |

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या तालुक्याचे नाव | पेसा ग्रामपंचायतींची संख्या | अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या पेसा गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| ६ | नाशिक | नाशिक | ३२ | ४९ |
| | | इगतपुरी | ६४ | ११८ |
| | | त्रंबकेश्वर | ८४ | २९३ |
| | | बागलाण | ४९ | ११२ |
| ७ | अहमदनगर | अकोले | ७९ | १६६ |
| ८ | पुणे | आंबेगाव | ३७ | ७० |
| | | जुन्नर | ४७ | ८० |
| ९ | नांदेड | किनवट | ९२ | १२४ |
| | | माहूर | ३२ | ४९ |
| १० | यवतमाळ | आर्णी | ८ | १४ |
| | | घाटंजी | २६ | ५६ |
| | | मारेगाव | २४ | ६४ |
| | | पांढरकवडा | ५१ | १३८ |
| | | राळेगाव | २६ | ४८ |
| | | झरी-जामणी | २९ | ९४ |
| ११ | अमरावती | धारणी | ६२ | १६८ |
| | | चिखलदरा | ५२ | १७३ |
| १२ | चंद्रपूर | जिवती | ३१ | ६० |
| | | कोरपना | ३२ | ६६ |
| | | राजुरा | ३३ | ५६ |
| १३ | गडचिरोली | अहेरी | ३९ | १७९ |
| | | आरमोरी | १८ | ६६ |
| | | भामरागड | १९ | ११५ |
| | | चामोर्शी | ३८ | ९६ |
| | | देसाईगंज | ९ | ९ |
| | | धानोरा | ६१ | २१८ |
| | | एटापल्ली | ३१ | २५७ |
| | | गडचिरोली | २७ | ६७ |
| | | कुरखेडा | ४५ | १५७ |
| | | कोरची | २९ | १३९ |
| | | मुलचेरा | ११ | ४५ |
| | | सिरोंचा | ३९ | १२२ |
| **एकूण** | | **५९** | **२९२९** | **८४१३** |

**स्त्रोत - राज्य पेसा कक्ष यांचेकडील संबंधित पेसा जिल्ह्यांकडून प्राप्त माहिती ( जुन २०२२ अखेर)**

उपरोक्त तक्त्यात महाराष्ट्रातील एकूण १३ जिल्ह्यातील ५९ तालुक्यामधील २३ तालुके पूर्णत: तर ३६ तालुके अंशत: अनुसूचित क्षेत्रात येतात. एकूण ५९ जिल्ह्यांमध्ये एकूण २९२९ इतक्या ग्रामपंचायती अनुसूचित क्षेत्रात आहेत व या ग्रामपंचायती अंतर्गत एकूण ८४१३ इतकी पेसा गावे घोषित आहेत.

### १.८ पेसा कायद्यांतर्गत प्राप्त होणारा ५ % अबंध निधीच्या विनियोगाची कार्यपद्धती :

मा. राज्यपाल महोदय यांच्या दि. ३० ऑक्टोबर, २०१४ च्या अधिसूचनेनुसार दि. ९ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना दरवर्षी आदिवासी घटक योजना नियतव्ययाच्या एकूण ५ % निधी उपलब्ध करून देण्याच्या योजनेस (पेसा ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजना) मान्यता देण्यात आली. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून पेसा ग्रामपंचायतींना प्राप्त होणारा ५ % निधी खालील बाबींकरिता प्रत्येकी १/४ प्रमाणात विनियोग करण्याचे निर्देशित केले आहे.

**अ) पायाभूत सुविधा :**

संबंधित पेसा गावातील ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या, शाळा, दफनभूमी, गोडाऊन, गावांचे अंतर्गत रस्ते व तत्सम पायाभूत सुविधा इ. संबंधीची कामे करावीत.

**ब) वनहक्क अधिनियम (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी :**

- आदिवासींसाठी उदरनिर्वाहाच्या/उपजिविकेच्या संदर्भात प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण/मार्गदर्शन करणे.
- गावतळी विकास किंवा मत्स्यपालन व्यवसाय/मत्स्यबीज खरेदी.
- सामाईक जमिनी विकसित करून देणे.
- गौण पाणी साठ्याचे व्यवस्थापन.
- सामाईक नैसर्गिक साधनसंपदा व सामाईक मालमत्ता विकसित करणे.

**क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण :**

- सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे.
- गावामध्ये स्वच्छता राखणे.
- सांडपाणी व्यवस्थेकरिता गटारे बांधणे व त्यांची देखभाल करणे.
- शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणे.

**ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविका :**

संबंधित ग्रामपंचायतीमधील गावांच्या ग्रामसभांनी वरील 'अ' व 'क' क्षेत्रांमधून त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड करण्यात येते. ग्रामसभांनी कामाची निवड करणे म्हणजेच त्या कामास ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता प्राप्त होते. ग्रामसभेने निवड केलेल्या रु. ३.०० लक्ष पेक्षा कमी मूल्याच्या कामास स्वतंत्र तांत्रिक मान्यता आवश्यक असणार नाही व रु. ३.०० लक्ष पेक्षा अधिक मूल्याच्या कामांसाठी तांत्रिक मान्यता गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत देण्यात येते. तसेच वन विभागाशी निगडीत काम असल्यास उप वनसंरक्षक किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत देण्यात येते.

मात्र उपरोक्त 'ब' व 'ड' येथील क्षेत्रामधील त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड ग्रामसभेने केल्यानंतर त्याकरिता लागणारा निधी ग्रामसभेची अनुमती घेऊन संबंधित गावांच्या साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती (पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी) व सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी) यांना देण्यात येतो.

### १.८.१) ग्रामपंचायतीला निधी वितरीत करण्याची पध्दती -

सर्व ग्रामपंचायतींचे बचत खाते क्रमांक व त्या ग्रामपंचायतीतील गावे / वस्ती यांची लोकसंख्या याबाबतची माहिती संबंधित जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभागाला उपलब्ध करून देते. सदर माहितीच्या आधारे आदिवासी उपयोजनेचा निधी आदिवासी विकास विभागामार्फत राज्य स्तरावरून थेट ग्रामपंचायतींना RTGS व्दारे लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यात येतो.

ग्रामपंचायतीच्या खात्यातून निधी ग्रामसभा कोषामध्ये वर्ग करण्यात येतो व ग्रामसभा कोष समितीमार्फत प्राप्त निधीचे व्यवस्थापन ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली करण्यात येते.

### १.८.२) सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीत प्राप्त ५% अबंध निधीबाबत तपशिल

जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून प्राप्त माहितीनुसार सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीतील शासनाकडून प्राप्त निधी, निधीचा विनियोग, शिल्लक रक्कम याचा तपशिल खालीलप्रमाणे दिला आहे. पुणे जिल्ह्यात जिल्हा पेसा समन्वयक पद रिक्त असल्याने एकूण १२ जिल्ह्यांकडून प्राप्त माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### १.८.२.१) प्राप्त ५% अबंध निधीबाबत वर्षनिहाय तपशिल

**तक्ता क्र.-१.२**

( रू. लाखात )

| अ.क्र | सन | प्राप्त निधी | निधीचा एकूण विनियोग | शिल्लक राहिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | १७७९८.४५ | १७६३५.८५ | १५९.३० |
| २ | २०१६-१७ | २१०४३.६६ | २१००४.४५ | ३९.१७ |
| ३ | २०१७-१८ | २१०५२.२३ | २१००१.८६ | १५.२० |
| ४ | २०१८-१९ | २६०७४.१३ | २५९६४.०२ | ३९.११ |
| ५ | २०१९-२० | १५७८३.३९ | १४५८५.४८ | १०५८.०६ |
| ६ | २०२०-२१ | १८०२९.०१ | ८९७७.३६ | ६८९३.२० |
| **एकूण** | | **११९७८०.८७** | **१०९१६९.०२** | **८२०४.०४** |

**स्त्रोत - जिल्हा पेसा समन्वयक यांनी भरलेल्या प्रपत्रातील प्राप्त माहितीच्या आधारे**

उपरोक्त तक्यात वर्षनिहाय ५% अबंध निधीबाबत जिल्हा पेसा समन्वयक यांनी दिलेली माहिती नमूद केलेली आहे. उपरोक्त माहितीनुसार सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीमध्ये रु. ११९७८०.८७ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे त्यापैकी १०९१६९.०२ लक्ष इतक्या निधीचा विनियोग झाल्याचे दिसुन येते.

### १.८.२.२) सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीत जिल्हा निहाय प्राप्त ५% अबंध निधीबाबत तपशिल

**तक्ता क्र.- १.३**

( रू. लाखात )

| अ.क्र. | जिल्हा | प्राप्त निधी | निधीचा एकूण विनियोग | शिल्लक राहिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ९७४१.४४ | ८६५९.२१ | १०८२.२३ |
| २ | यवतमाळ | ३२३१.८७ | २८०७.५२ | ४२४.३५ |
| ३ | चंद्रपूर | १७९४.६५ | १५१४.३१ | २८०.३४ |
| ४ | ठाणे | ५५६४.३३ | ४६६०.४६ | ६०१.४१ |
| ५ | धुळे | ७८८४.७३ | ७६६६.५५ | २१८.०९ |
| ६ | नाशिक | २५६६४.१७ | २४०६५.३८ | १५९८.७९ |
| ७ | अहमदनगर | २४८७.०५ | २४३९.०४ | ४८.०२ |
| ८ | नंदुरबार | २७४९२.९३ | २२९००.८१ | २५६८.६० |
| ९ | पालघर | २७१८८.१६ | २६३०३.२८ | ८८४.८८ |
| १० | अमरावती | ५१९२.५८ | ४९८०.७० | २११.८८ |
| ११ | जळगाव | १६४८.१४ | १३७४.६४ | २२६.९५ |
| १२ | नांदेड | १८९०.८२ | १७९७.१४ | ५८.५० |
| **एकूण** | | **११९७८०.८८** | **१०९१६९.०२** | **८२०४.०४** |

**स्त्रोत - जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडील प्रपत्रातील प्राप्त माहितीच्या आधारे**

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार ५% अबंध निधीचे जिल्हानिहाय विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, सर्वात जास्त निधी नंदूरबार जिल्ह्यास प्राप्त झालेला आहे. त्यानंतर पालघर व नाशिक जिल्ह्यास प्राप्त झालेला आहे.



**पेसा ५% अबंध निधीमधुन केलेले डिजीटल शाळा कामकाज**

## प्रकरण - २

# मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे

१) अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा कायद्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होते किंवा कसे याचा अभ्यास करणे.

२) अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसार झाला आहे किंवा कसे याचा अभ्यास करणे.

३) अनुसूचित क्षेत्रामध्ये पेसा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व त्यांची कार्यपध्दती विकसित झाली आहे किंवा कसे याचा अभ्यास करणे.

४) पेसा ५ % अबंध निधी योजनेची अंमलबजावणी व फलनिष्पत्तीचा अभ्यास करणे.

# प्रकरण - ३

# मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी व कार्यपद्धती

## ३.१ पार्श्वभूमी -

मा. राज्यपाल महोदयांनी, जा.क्र./TC/CR-४११/PESA Assessment/२३७ दिनांक १४/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये राज्यातील अनुसूचित क्षेत्रात पेसा कायदा आणि नियमांच्या अंमलबजावणीबाबत अभ्यास करण्याचे निर्देश दिलेले होते त्यानुसार सदर मूल्यमापन अभ्यास करण्यात आला आहे.

दिनांक १४ जुन, २०२१ च्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार पेसा ग्रामपंचायतींना ५ टक्के थेट निधी योजनेबाबत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई (TISS), मुंबई यांचेमार्फत करण्यात आलेला मूल्यमापन अहवाल सदर अभ्यासाच्या वेळी विचारात घेणेबाबत सुचविण्यात आले आहे.

दिनांक २ ऑगस्ट, २०१६ च्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजनेचे टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई (TISS), मुंबई यांचेमार्फत मूल्यमापन करण्यात आले असून, **An Assessment of utilization of 5% Tribal Sub Plan Funds, Devolved to PESA Gram Panchayats in Maharashtra** हा अहवाल शासनास सादर केला असून त्यात ९ जिल्ह्यांमधील १२ तालुक्यांमधील ६० ग्रामपंचायतींमध्ये सर्वेक्षण करण्यात आल्याचे आढळते.

सदर अहवालानुसार सर्वेक्षण केलेल्या ग्रामपंचायतींमध्ये वर्षातून किमान चार वेळा ग्रामसभा घेतल्याचे व या ग्रामसभा मुख्य गावात आयोजित केल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. ग्रामसभांतील महिला उपस्थितीचे प्रमाण नगण्य असल्याचे आढळले. ग्रामपंचायतीमधील कार्यरत व्यक्ती आणि मुख्य गावातील काही ग्रामस्थांनाच ५% अबंध निधीबाबत माहिती असल्याचे आढळले. गावाचा विकास आराखडा तयार नसणे, पेसा अबंध निधीबाबत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्टता नसणे, ग्रामपंचायतीमधील कार्यरत व्यक्तींची बदली अशा प्रकारची कारणे निधीचा विनीयोग न होण्यामागे नमूद केली आहेत.

राज्यातील अनुसूचित क्षेत्र हे १९७१ च्या जनगणनेनुसार सन १९८५ मध्ये घोषित करण्यात आले होते. तद्नंतर अनेक वर्षांचा कालावधी लोटल्यामुळे व आदिवासी जमातींचे स्थलांतर होत असल्याने अनुसूचित क्षेत्र सुधारित करणे व त्यानुसार पेसा गावे घोषित करण्याचे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद केले आहे. गावनिहाय, पाडानिहाय ग्रामसभा आयोजित होत नाहीत असे दिसून येते व यामुळे निधीचा विनीयोग सर्व पेसा गावांमध्ये सारख्या प्रमाणात होत नाही. पेसा गावे घोषित होऊन त्यांनी स्वतंत्रपणे ग्रामसभा घेण्यास सुरूवात केल्यानंतरच गाव व पाडा निहाय लोकसंख्येच्या प्रमाणात सदर निधी वाटप करण्याचे तंत्र खऱ्या अर्थाने उपयोगात येईल असे मत अहवालात व्यक्त केले आहे. यादृष्टीने पेसा कायद्याअंतर्गत मिळालेले अधिकार तसेच ग्रामसभांबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

ग्रामसभांमध्ये महिलांचा सहभाग कमी असून ज्या गावांत बचतगट आहेत तेथिल महिलांचा ग्रामसभेमधील सहभाग लक्षनिय असल्याचे अहवालात नमूद केले आहे. सबब आदिवासी गावे, पाडे यामध्ये

जास्तीत जास्त बचत गट तयार करणे महत्वाचे आहे. याबरोबरच अनुसूचित क्षेत्रातील गावांचा, विशेषत: आदिवासी पाड्यांचा विकास कमी झाल्याचे दिसून आले. यासाठी योग्य निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची गरज आणि आदिवासी वाड्या-वस्त्यांमध्ये विकास कामांना प्राधान्य देण्याची गरज असल्याचे अहवालात विषद केले आहे. याव्यतिरीक्त ग्रामपंचायतींचे पदाधिकारी व ग्रामसेवकांचे प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमांवर भर देण्याचा मुद्दाही अधोरेखित केला आहे.

टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी सदर मूल्यमापन अहवालात नमूद केलेल्या या मुद्यांव्यतिरिक्त पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, अंमलबजावणी यंत्रणेमधील विविध घटकांची क्षमता बांधणी, ५% अबंध निधीबाबत मार्गदर्शक सूचना, कायदा अंमलबजावणीकरिता स्वतंत्र व समर्पित यंत्रणेची आवश्यकता, ग्रामसभांचे बळकटीकरण इत्यादी मुद्यांबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने तयार केलेल्या या अहवालात विश्लेषण केले आहे.

### ३.२ कार्यपध्दती व नमुना निवड :

सदर मूल्यमापन अभ्यासाकरीता एकूण १३ जिल्ह्यांची निवड केली आहे. या जिल्ह्यांमधील विहीत पध्दतीने निवडलेल्या ग्रामपंचायती, गावे, ग्रामस्थ तसेच पेसा कायद्याच्या अंमलबजावणीमधील महत्वाच्या घटकांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संकलित केली आहे. जिल्हा पेसा समन्वयक, तालुका पेसा समन्वयक, सरपंच, ग्रामसेवक, ग्रामसभाकोष अध्यक्ष/सदस्य, पेसा मोबिलायझर व ग्रामस्थ हे सर्व घटक पेसा कायद्याच्या अंमलबजावणीमधील महत्वाचे घटक आहेत. या सर्व घटकांकडून ७ प्रकारच्या प्रश्नावलींमधुन गुगल फॉर्मच्या माध्यमातून एकूण ५,९१४ प्रश्नावलींमध्ये माहिती संकलित केली आहे.

पेसा कायद्याची अंमलबजावणी तसेच विविध स्तरावरील व्यक्तींचे प्रशिक्षण यामध्ये जिल्हा व तालुका पेसा समन्वयकांची व पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसारामध्ये पेसा मोबिलायझर यांची महत्वाची भूमिका आहे. प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये पहिली ग्रामसभा सरपंचाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येते. पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभेला मिळालेल्या अधिकारांची तसेच शासनाचे विविध आदेश यांची माहिती ग्रामसभेला सरपंच व ग्रामसेवक यांचेमार्फत देण्यात येते. ग्रामसेवक हा ग्रामसभा कोष समितीचा पदसिध्द सदस्य असल्यामुळे ५ टक्के अबंध निधीच्या अंमलबजावणीसाठी त्यांची महत्वाची भूमिका आहे. या सर्व घटकांकडून पेसा कायद्याचा प्रचार-प्रसार, प्रशिक्षण, पेसा कायद्याची अंमलबजावणी, ५% अबंध निधीबाबत माहिती, अबंध निधीअंतर्गत गावात राबविण्यात आलेले उपक्रम, पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता उपयोजना इत्यादी मुद्दयांवर माहिती संकलित केली आहे.

पेसा कायदा अंमलबजावणीमध्ये ग्रामसभा पर्यायाने ग्रामस्थांची महत्वाची भूमिका असून, ग्रामस्थांना पेसा कायद्याचे असलेले आकलन, ग्रामसभेला मिळालेले विशेष अधिकार, ५% अबंध निधीमधून गावामध्ये झालेली विकास कामे, पेसा कायद्यामुळे गावच्या विकासाला मिळालेली चालना याबाबत माहिती घेतलेली आहे. उपरोक्त सर्व घटकांची विहीत नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून निवड केली आहे व अन्वेषकांव्दारे माहिती संकलित केली आहे. सदर माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे अहवाल लेखन करण्यात आले आहे.

**नमुना निवड :**

सद्यस्थितीत राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील एकूण १३ जिल्ह्यात २९२४ ग्रामपंचायती अंतर्गत अंदाजे एकूण ८५०६ इतकी गावे/वस्त्या/पाडे ही पेसा गावे म्हणून घोषित आहेत. (नमुना निवड करतेवेळी राज्य पेसा कक्ष यांचेकडील माहितीच्या आधारे, नमुना निवड करतेवेळी प्राप्त आकडेवारी व अहवाल अंतिम करतेवेळीची आकडेवारी यामध्ये बदल झालेला आहे.)

सदर विषयाचा मूल्यमापन अभ्यासासाठी नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून साध्या यादृच्छिक पद्धतीने १० % उत्तरदात्यांची नमुना निवड केलेली आहे. त्यानुसार मूल्यमापन अभ्यासासाठी एकूण १३ जिल्ह्यात २९२४ ग्रामपंचायतीपैकी २९३ (एकूण ग्रा.पं. च्या १० %) ग्रामपंचायती व एकूण ८५०६ पेसा गावांपैकी ८५२ (एकूण पेसा गावांच्या १० %) पेसा गावांची निवड करण्यात आली आहे.

**नमुना निवडीचे निकष पुढीलप्रमाणे** :

१. **ग्रामपंचायतीची निवड पध्दती :** उपरोक्त निवडण्यात आलेल्या १० % ग्रामपंचायतीमध्ये प्रामुख्याने ज्या ग्रामपंचायतींच्या अंतर्गत २ पेक्षा जास्त पेसा गावे आहेत अशा ग्रामपंचायतींची यादृच्छीक पध्दतीने मूल्यमापनासाठी निवड केली आहे.

२. **पेसा गावांची निवड पध्दती :** पंचायतीमधील पेसा गावांची यादृच्छीक पध्दतीने निवड केली आहे.

३. **सरपंच, ग्रामसेवक व पेसा मोबिलायझर यांची निवड पद्धती :** उपरोक्तप्रमाणे निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायतीमधील सरपंच, ग्रामसेवक व पेसा मोबिलायझर यांची निवड केली आहे.

४. **ग्रामकोष समिती अध्यक्ष यांची निवड :** मूल्यमापन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या सर्व पेसा गावातील ग्रामकोष समिती अध्यक्ष किंवा सदस्य यांची निवड केली आहे.

५. **ग्रामस्थ यांची निवड :** मूल्यमापन अभ्यासासाठी यादृच्छीक पध्दतीने निवडण्यात आलेल्या पेसा गावातील प्रत्येक पेसा गावातील ५ ग्रामस्थांची प्रपत्रे भरून घेण्यासाठी निवड केली आहे.

**मूल्यमापनासाठी निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायती व गावांची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.-३.१**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत संख्या | गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | जुन्नर | ५ | ७ |
| | | आंबेगाव | ४ | ५ |
| २ | अहमदनगर | अकोले | ८ | १७ |
| ३ | ठाणे | मुरबाड | ६ | २२ |
| | | शहापूर | ११ | ५४ |
| | | भिवंडी | ४ | १८ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत संख्या | गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| ४ | पालघर | जव्हार | ५ | १८ |
| | | विक्रमगड | ४ | १८ |
| | | डहाणू | ९ | २७ |
| | | मोखाडा | ३ | ११ |
| | | तलासरी | २ | ११ |
| | | पालघर | ९ | २१ |
| | | वसई | २ | ८ |
| | | वाडा | ८ | ३३ |
| ५ | नंदुरबार | अक्कलकुआ | ८ | २१ |
| | | धडगाव/अक्राणी | ५ | १८ |
| | | तळोदा | ७ | १२ |
| | | नवापुर | ११ | २२ |
| | | नंदुरबार | १० | ११ |
| | | शहादा | ११ | १७ |
| ६ | धुळे | शिरपूर | ५ | २१ |
| | | साक्री | १० | ४९ |
| ७ | जळगाव | चोपडा | १ | ४ |
| | | रावेर | १ | ३ |
| | | यावल | १ | २ |
| ८ | नाशिक | सुरगणा | ६ | २८ |
| | | त्र्यंबकेश्वर | ८ | २९ |
| | | पेठ | ७ | २१ |
| | | इगतपुरी | ६ | १२ |
| | | कळवण | ९ | २० |
| | | बागलाण | ५ | ११ |
| | | दिंडोरी | १० | १९ |
| | | देवळा | २ | ३ |
| | | नाशिक | ३ | ५ |
| ९ | अमरावती | चिखलदरा | ५ | १६ |
| | | धारणी | ६ | १६ |
| १० | यवतमाळ | झरी जामणी | ३ | ९ |
| | | आर्णी | १ | १ |
| | | घाटंजी | ३ | ५ |
| | | पांढरकवडा | ५ | १४ |
| | | मारेगाव | २ | ७ |
| | | राळेगाव | ३ | ५ |
| ११ | नांदेड | माहूर | ३ | ५ |
| | | किनवट | ९ | १२ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत संख्या | गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १२ | चंद्रपूर | जिवती | ३ | ६ |
| | | कोरपणा | ३ | ७ |
| | | राजुरा | ३ | ६ |
| १३ | गडचिरोली | सिरोंचा | ४ | १२ |
| | | अहेरी | ४ | १७ |
| | | गडचिरोली | ३ | ७ |
| | | धानोरा | ६ | २१ |
| | | भामरागड | २ | ११ |
| | | कोरची | ३ | १४ |
| | | कुरखेडा | ५ | १६ |
| | | एटापल्ली | ३ | २५ |
| | | मुलचेरा | १ | ४ |
| | | चामोर्शी | ४ | १० |
| | | आरमोरी | २ | ७ |
| | | देसाईगंज | १ | १ |
| **एकूण** | | **५९** | **२९३** | **८५२** |

उपरोक्त तक्त्यानुसार मूल्यमापन अभ्यासासाठी एकूण १३ जिह्यांमधील, ५९ तालुके, २९३ ग्रामपंचायती व ८५२ गावांची निवड करण्यात आली आहे.

### ३.३ मुल्यमापन अभ्यासासाठी तयार करण्यात आलेल्या मुलाखत अनुसूची

पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापन अभ्यास पाहणीसाठी खाली नमूद केलेल्या एकूण ७ मुलाखत अनुसूची तयार करण्यात आल्या आहेत.

१. जिल्हा पेसा समन्वयक
२. तालुका पेसा समन्वयक
३. ग्रामसेवक
४. सरपंच
५. ग्रामसभाकोष समिती अध्यक्ष/ सदस्य
६. पेसा मोबिलायझर
७. ग्रामस्थ

### ३.४ क्षेत्रीय कामाचा कालावधी

सदर विषयावरील मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रिय काम माहे जानेवारी २०२२ ते जुन २०२२ या कालावधीमध्ये पुर्ण करण्यात आले.

# प्रकरण - ४

# संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण

पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापनाअंतर्गत विविध घटकांकडून मुलाखत अनुसूचींव्दारे माहिती संकलित करण्यात आली आहे. माहिती संकलन केलेल्या प्रत्येक घटकाची पेसा कायदा अंमलबजावणीमध्ये महत्वाची भूमिका असून त्यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण सदर प्रकरणात करण्यात आले आहे.

## ४.१ जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

महाराष्ट्रामध्ये एकूण १३ जिल्हे (ठाणे, पालघर, नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर व गडचिरोली) अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित आहेत. पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापन अभ्यासासाठी या एकूण १३ जिल्ह्यातील जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून मुलाखत अनुसूचीव्दारे माहिती घेण्याचे प्रस्तावित होते तथापि एकूण १३ जिल्ह्यांपैकी पुणे जिल्ह्याचे जिल्हा पेसा समन्वयक पद रिक्त असल्याने १२ जिल्ह्यांच्या जिल्हा पेसा समन्वयकांकडून माहिती संकलित केली आहे.

जिल्हा पेसा समन्वयकांकडून, पेसा कायद्याचे प्रशिक्षण, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये इतर विभागांचे सहकार्य, पेसा अंतर्गत मिळालेले अधिकार व त्यांचा वापर, ५% अबंध निधी व या निधीअंतर्गत गावात राबविण्यात आलेले उपक्रम, पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी व प्रभावी अंमलबजावणीकरीता उपयोजना इ. विविध मुद्दयांवर माहिती संकलित केली आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

### ४.१.१) जिल्हा समन्वयक यांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाल्याचा स्त्रोत :

**तक्ता क्र.-४.१.१**

| अ.क्र. | आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | १० | ८३.३३ |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिती | २ | १६.६७ |
| ३ | स्वयंसेवी संस्था | १ | ८.३३ |
| ४ | अद्याप प्रशिक्षण झालेले नाही | २ | १६.६७ |
| | **एकूण** | **१२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. - ४.१.१**




उपरोक्त तक्ता/आलेखामध्ये जिल्हा पेसा समन्वयक यांना पेसा कायद्याविषयी मिळालेल्या प्रशिक्षणाबाबत माहिती दर्शविली आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे आढळते की, एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी १० (८३.३३ %) जिल्हा समन्वयकांचे यशदा, पुणे मार्फत, २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांचे जिल्हा परिषद/पंचायत समितीमार्फत, १ (८.३३%) जिल्हा समन्वयकाचे स्वयंसेवी संस्थेमार्फत प्रशिक्षण झाले आहे तर २ (१६.६७%) जिल्हा समन्वयकांचे अद्याप पर्यंत प्रशिक्षण झाले नाही.

### ४.१.२) जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम :

**तक्ता क्र.- ४.१.२**

| अ.क्र. | पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेत माहिती दिली | ७ | ५८.३३ |
| २ | प्रशिक्षणाद्वारे | ५ | ४१.६७ |
| ३ | स्वयंसेवी संस्था | २ | १६.६७ |
| ४ | शासनाचे अधिकारी | २ | १६.६७ |
| ५ | प्रसिद्धी माध्यमाद्वारे | ३ | २५.०० |
| ६ | अद्याप पर्यंत माहिती दिली नाही | २ | १६.६७ |
| **एकूण** | | **१२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.-४.१.२**




वरील तक्ता/आलेखामध्ये जिल्हा पेसा समन्वयक यांनी जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याची माहिती कोणत्या माध्यमातुन दिली याबाबत तपशिल दिलेला आहे. माहितीच्या आधारे एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी ७ (५८.३३ %) जिल्हा समन्वयकांनी ग्रामसभेच्या माध्यमातुन, ५ (४१.६७ %) जिल्हा समन्वयकांनी प्रशिक्षणाव्दारे, २ (१६.६७ %) जिल्हा समन्वयकांनी अनुक्रमे स्वयंसेवी संस्था व शासनाच्या अधिकाऱ्यांमार्फत तर ३(२५ %) जिल्हा समन्वयकांनी प्रसिद्धी माध्यमांव्दारे पेसा कायद्याची माहिती जिल्ह्यातील गावांना दिल्याचे नमूद केले आहे. २ (१६.६७ %) जिल्हा समन्वयकांनी गावांमध्ये पेसा कायद्याची अद्यापपर्यंत माहिती दिली नाही असे नमूद केले आहे.

### ४.१.३) पेसा कायद्याचे गाव स्तरावरील व्यक्तींच्या प्रशिक्षणाविषयी तपशिल :

**तक्ता क्र.-४.१.३**

| अ.क्र. | आपल्या भागातील कोणकोणत्या स्तरावरील व्यक्तींना प्रशिक्षण दिले जाते? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पेसा मोबिलायझर | ११ | ९१.६७ |
| २ | ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/सदस्य | १० | ८३.३३ |
| ३ | गाव स्तरीय कर्मचारी | १० | ८३.३३ |
| ४ | ग्रामपंचायत सदस्य | १२ | १०० |
| **एकूण** | | **१२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

पेसा कायद्याचे प्रशिक्षण गाव स्तरावरील कोणकोणत्या व्यक्तींना दिले जाते याबाबत जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून माहिती घेतली असता असे आढळून येते की, सर्वात जास्त १२ (१०० %) जिल्हा समन्वयकांनी ग्रामपंचायत सदस्यांना, ११ (९१.६७ %) जिल्हा समन्वयकांनी पेसा मोबिलायझर तर १० (८३.३३%) जिल्हा समन्वयकांनी अनुक्रमे ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/सदस्य व गाव स्तरावरील कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते असे मत नोंदविलेले आहे.




**पेसा कायद्याची माहिती घेताना ग्रामस्थ**

### ४.१.४) पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे प्रशिक्षणाबाबत माहिती :

**तक्ता क्र. - ४.१.४**

| अ.क्र. | पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या खालीलपैकी कोणकोणत्या समित्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा कोष समिती | ९ | ७५.०० |
| २ | साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती | १ | ८.३३ |
| ३ | अद्याप कोणत्याच समितीचे प्रशिक्षण झालेले नाही | ३ | २५.०० |
| **एकूण** | | **१२** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

उपरोक्त तक्त्यामध्ये पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हा समन्वयक यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. सदर माहितीवरून असे निर्देशनास येते की, एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी ९ (७५.०० %) जिल्हा समन्वयकांनी गाव स्तरावरील ग्रामसभा कोष समितीचे प्रशिक्षण झाले आहे तर १ (८.३३%) जिल्हा समन्वयकाने साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन या समितीचे प्रशिक्षण झाले आहे असे नमूद केले आहे. ३ (२५.००%) जिल्हा समन्वयकांनी अद्याप कोणत्याच समितीचे प्रशिक्षण झाले नाही असे नमूद केले आहे.

यावरून असे दिसते की, गावस्तरावरील पेसा नियमानुसार स्थापन झालेल्या समित्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे जेणेकरून समित्यांच्या सदस्यांना समितीच्या कार्यकक्षा समजतील व पेसा कायद्याची अंमलबजावणी होण्यास पोषक वातावरण निर्माण होईल.

### ४.१.५) शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण करणेसंबंधीची माहिती :

**तक्ता क्र. -४.१.५**

| अ.क्र. | शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण केले जाते का? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७ | ५८.३३ |
| २ | नाही | २ | १६.६७ |
| ३ | काही प्रमाणात | २ | १६.६७ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

**आलेख क्र.४.१.३**




उपरोक्त तक्ता/आलेखामध्ये पेसा कायद्याबाबत शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण केले जाते किंवा कसे याबाबत जिल्हा समन्वयक यांनी सांगितलेली माहिती दर्शविलेली आहे. माहितीच्या अवलोकनावरून असे समजते की, एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी ७ (५८.३३%) जिल्हा समन्वयकांनी शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण केले जाते, २ (१६.६७ %) जिल्हा समन्वयकांनी शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण केले जात नाही तसेच प्रशिक्षण काही प्रमाणात पुर्ण केले जाते असे नमूद केले आहे. १ (८.३३ %) जिल्हा समन्वयकाने याबाबत कोणताच प्रतिसाद दिला नाही.

**४.१.६) शासनामार्फत जिल्हा पेसा समन्वयकांना पेसा कायद्याबाबत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणासंबंधीची माहिती :**

**तक्ता क्र. -४.१.६**

| अ.क्र. | शासनामार्फत आपणास दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती दिली जाते का? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ६६.६७ |
| २ | नाही | ३ | २५.०० |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

**आलेख क्र.-४.१.४**




उपरोक्त तक्ता/आलेखामध्ये शासनामार्फत जिल्हा पेसा समन्वयकांना पेसा कायद्याबाबत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणासंबंधीच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे आढळून येते की, एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी सर्वात जास्त ८ (६६.६७%) जिल्हा समन्वयकांनी शासनामार्फत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती दिली जाते तर ३ (२५ %) जिल्हा समन्वयकांनी शासनामार्फत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती दिली जात नाही असे नमूद केले आहे. १ (८.३३%) जिल्हा समन्वयकाने याबाबत कोणताच प्रतिसाद दिला नाही.

### ४.१.७) पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणाऱ्या विषयांची माहिती :

**तक्ता क्र.-४.१.७**

| अ.क्र. | पेसा प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेले विषय | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पेसा कायदा | ९ | ७५.०० |
| २ | पेसा ग्रामसभेचे अधिकार | ११ | ९१.६७ |
| ३ | वनहक्क कायदा | ९ | ७५.०० |
| ४ | गौण वनउपज | ९ | ७५.०० |
| ५ | बाजार व सावकारी | ८ | ६६.६७ |
| ६ | गौण जलसाठे | ९ | ७५.०० |
| ७ | जमीन हस्तांतरण | ७ | ५८.३३ |
| ८ | आदिवासी समाजाची ओळख | १० | ८३.३३ |
| ९ | गाव पातळीवरील स्थायी समित्या, गौण खनिज व्यवस्थापन, जैव विविधता कायदा, योजनांचे संगणकीकरण, आदिवासी योजना इ. | १ | ८.३३ |
| १० | पेसा ५% अबंध निधी | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. -४.१.५**




उपरोक्त तक्ता/आकृतीमध्ये जिल्हा पेसा समन्वयक यांच्या पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेल्या विषयासंबंधीच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीच्या विश्लेषणावरून असे अवलोकन होते की,

एकूण १२ जिल्हा समन्वयकांपैकी ९ (७५%) जिल्हा समन्वयकांच्या मते पेसा कायदा प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याची माहिती, ११ (९१.६७ %) जिल्हा समन्वयकांच्या मते प्रशिक्षणामध्ये पेसा ग्रामसभेचे अधिकार, ९ (७५%) जिल्हा समन्वयकांच्या मते वनहक्क कायद्याची माहिती, गौण वनउपज संबंधीची माहिती तसेच गौण जलसाठे याविषयी माहिती दिली जाते. १ (८.३३ %) जिल्हा समन्वयकाच्या मते पेसा कायदा प्रशिक्षणामध्ये पेसा ५ % अबंध निधी याविषयी माहिती दिली जाते.

### ४.१.८) पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी येणाऱ्या अडचणीसंबंधीची माहिती :

पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी जिल्हा पेसा समन्वयकांना खालीलप्रमाणे अडचणी येतात असे नमूद केले आहे.

१. प्रशिक्षणार्थींची वेळेत उपस्थिती नसणे.
२. प्रवीण प्रशिक्षक उपलब्ध नसणे.
३. प्रशिक्षण हॉल, लाईट, इंटरनेट, कम्प्युटर, प्रशिक्षण साहित्य इ. सुविधा न मिळणे.
४. प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने परिपूर्ण प्रशिक्षण न होणे.
५. निवास व वाहन व्यवस्थेची उपलब्धता नसणे.
६. प्रशिक्षणासाठीचे अर्थसहाय्य शासनांकडून आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला प्राप्त न होणे.
७. पेसा प्रशिक्षण पंचायत राज प्रशिक्षण केंद्रामार्फत घेतले गेल्यास प्रशिक्षण वेळेत व सुविधापूर्ण पद्धतीने होत नाही.

### ४.१.९) जिल्हा पेसा समन्वयक यांचे मते शासनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नव्याने अंतर्भुत करावयाच्या बाबींचा तपशिल :

शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामध्ये कोणकोणत्या नविन बाबी अंतर्भुत करता येतील याबाबत जिल्हा पेसा समन्वयक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१ गावस्तरावर ग्रामस्थांचे प्रशिक्षण आवश्यक आहे.
२ पेसा जिल्ह्यातील पेसा गावांमध्ये नाविन्यपूर्ण राबविलेले उपक्रम प्रशिक्षणामध्ये सांगण्यात यावेत जेणेकरून इतरांना प्रेरणा मिळेल.
३ प्रत्येक जिल्ह्याला सुसज्ज प्रशिक्षण सभागृह असावे.
४ विषयनिहाय तज्ञ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
५ प्रशिक्षणार्थींच्या क्षमतेनुसार प्रशिक्षण मोड्युल बनवावे.
६ एखाद्या आदर्श गावाची क्षेत्रभेट होणे आवश्यक वाटते तसेच आदर्श पेसा गावाबाबत विषय प्रशिक्षणात समाविष्ट करावा.
७ पेसा कायदा, नियम व शासन निर्णयातील तरतुदी व प्रत्यक्षात ग्रामसभेत घडणाऱ्या बाबी यावर चर्चा होणे आवश्यक वाटते.

८ पेसा प्रशिक्षणाचा कालावधी ५ दिवसापेक्षा कमी नसावा.

९ पेसा अधिनियम, नियम व शासन निर्णयातील शब्दाची रचना व त्याचा होणारा अर्थबोध स्पष्टपणे समजावून सांगावे तसेच प्रशिक्षणामध्ये जे विषय घेण्यात येतात त्या सर्व बाबींचे संबंधित साहित्य उपलब्ध करून द्यावे जसे कायदा, शासन निर्णय, परिपत्रक इ.

१० पेसा अंतर्गत स्थापन केलेल्या सर्व समिती सदस्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

११ गावात सक्रीय सामाजिक ग्रामस्थांचे प्रशिक्षण उपक्रम राबवावेत.




**ग्रामस्थांकडून माहिती घेताना अन्वेषक**

### ४.१.१०) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांच्या सहकार्याबाबत

**तक्ता क्र. -४.१.८**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १ | ८.३३ |
| २ | नाही | ३ | २५.०० |
| ३ | काही प्रमाणात | ७ | ५८.३४ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

**आलेख क्र. -४.१.६**




वरील तक्ता/आकृतीमध्ये पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे सहकार्य मिळणेसंबंधी जिल्हा समन्वयकांनी दिलेली माहिती दर्शविलेली आहे. एकूण १२ जिल्हा पेसा समन्वयकांपैकी १ (८.३३ %) समन्वयकाने पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे सहकार्य मिळते, ३ (२५.०० %) समन्वयकांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे सहकार्य मिळत नाही तर ७ (५८.३४%) समन्वयकांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे सहकार्य काही प्रमाणातच मिळते असे नमूद केले आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे पाहिजे त्या प्रमाणात सहकार्य मिळत नसल्याने पेसा कायदा अंमलबजावणीसाठी अडचणी येतात.

**४.१.११) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत :**

**तक्ता क्र. - ४.१.९**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४ | ३३.३३ |
| २ | नाही | ८ | ६६.६७ |
| | **एकूण** | **१२** | **१००** |

वरील तक्त्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्धतेबाबत जिल्हा समन्वयक यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. माहितीवरून असे समजते की, एकूण १२ पेसा समन्वयकांपैकी ४ (३३.३३%) समन्वयकांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व

जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे व  ८ (६६.६७%) समन्वयकांच्यामते पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही.

पेसा कायदा विषयक अडचणी व समस्या उद्धवल्यास जिल्हा समन्वयक राज्य पेसा कक्ष पुणे, शासन, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर जिल्ह्यांचे जिल्हा पेसा समन्वयक व तालुका पेसा समन्वयक इ. कडून मार्गदर्शन घेतात.

### ४.१.१२) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्धतेबाबत :

**तक्ता क्र. - ४.१.१०**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५ | ४१.६७ |
| २ | नाही | ७ | ५८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

माहिती  दिलेल्या एकूण १२ जिल्हा पेसा समन्वयकांपैकी, ५ (४१.६७%) समन्वयकांनी पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे तर ७(५८.३३%) समन्वयकांनी पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही  असे नमूद केले आहे.

### ४.१.१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेले विविध शासन निर्णय व परिपत्रके यामधील तफावतीबाबत :

**तक्ता क्र. - ४.१.११**

| अ.क्र. | पेसा कायदा व नियमाला अनुसरून शासनाने काढलेले शासन निर्णय व परिपत्रके यांचे मध्ये तफावत असल्याचे दिसून येते का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | ८३.३४ |
| २ | नाही | १ | ८.३३ |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

मूल्यमापनाअंतर्गत संकलित केलेल्या एकूण १२ जिल्हा पेसा समन्वयकांच्या  माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसुन येते की, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेले विविध शासन निर्णय व परिपत्रके यामध्ये तफावत असल्याचे १०(८३.३४%) समन्वयकांनी नमूद केले आहे तर १(८.३३%) समन्वयकांने विविध शासन निर्णय व परिपत्रके यामध्ये तफावत नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.१४) शासन निर्णय व परिपत्रके यामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेले विविध शासन निर्णय व परिपत्रके यामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे जिल्हा पेसा समन्वयकांनी नमूद केले आहे.

१. पेसा नियम १० मध्ये ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ हा २ वर्षाचा आहे व आदिवासी विकास विभागाच्या दि. २१/०८/२०१५ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ हा ५ वर्षाचा आहे त्यामुळे संभ्रम निर्माण होतो.
२. ग्रामसभा कोष समितीचा अध्यक्ष कोण असावा सरपंच कि इतर सदस्य याबाबत संभ्रम आहे.
३. गौण वनउपज उत्पादनाबाबत वनहक्क कायद्यामधील समिती कि पेसा कायद्यामधील समिती याबाबत संभ्रम आहे.
४. ग्रामस्थांच्या मालाला परवाना देण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे कि महसूल व वन विभागाला आहे याबाबत संभ्रम आहे.
५. पेसा नियम ४१ मधील उपनियम ३ मध्ये ग्रामसभा सर्व गौण वनोत्पादनासाठी एक व्यवस्थापन व वनसंवर्धन योजना तयार करील असे नमूद आहे व दि. २३/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वनविभागाने work plan (कार्य योजना) जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीला द्यावी असे नमूद केलेले आहे.
६. पेसा ५ % निधी ग्रामपंचायत स्तरावरून खर्च करणेसाठी सुचना निर्गमित होणे.

### ४.१.१५) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत शासन निर्णय व परिपत्रके काढणेसंबंधी समन्वयकांचे मत

पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत कोणकोणत्या बाबतीत शासन निर्णय व परिपत्रके काढणे आवश्यक वाटते याबाबत जिल्हा पेसा समन्वयक यांचे अभिप्राय घेतले असता त्यांनी खालील बाबतीत शासन निर्णय व परिपत्रके काढणे आवश्यक वाटते असे सांगितले आहे.

१. महसूल विभाग - शेती लिलाव व गौण खनिज हक्क
२. वन विभाग - गौण वनोपजाबाबत
३. तेंदू पत्ता संकलनासाठी शासन निर्णय १७/१२/२०१५ नुसार पर्याय क्र.२ नुसार ग्रामसभेला तांत्रिक सहाय्य करणे बाबत परिपत्रक काढण्यात यावे.
४. ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळाबाबत.
५. पेसा समितीचा अध्यक्ष कोण असावा याबाबत.
६. पेसा कायद्यानुसार सर्व स्थायी समितीबाबत शासन निर्णय काढावे व सर्व समित्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात.
७. गौण जलस्त्रोत नियोजन व व्यवस्थापन बाबत स्वशासनाला अनुसरून या आधीचे शासन निर्णय रद्द

करावेत व सुधारित शासन निर्णय काढावे. यामध्ये करावयाची कार्यवाही व मार्गदर्शक सूचना सर्व बाबी नमूद कराव्यात.

८. गौण खनिज बाबतीत परिपत्रके काढणे आवश्यक वाटते.

९. गौण वनोपज बाबत शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे.

१०. महसूल व वनविभागामार्फत गौण वनोत्पादनाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

११. आदिवासी विकास विभागामार्फत जनजागृती, प्रचार, प्रसिद्धी करिता वाचन साहित्य, माहिती फलक, बॅनर इ. साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत.

१२. पेसा ५ % अबंध निधीसाठी स्वतंत्र हेड व यंत्रणेबाबत.

१३. पेसा कायद्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना करणेबाबत.

१४. पेसा ५% अबंध निधी आदिवासी लोसंख्येच्या प्रमाणात न मिळता एकूण लोकसंख्या व क्षेत्रफळानुसार मिळावा याबाबत.



**तेंदूपत्ता संकलन करताना ग्रामस्थ**

**४.१.१६) पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी जास्त वापर झालेल्या अधिकारांबाबत**

**तक्ता क्र. - ४.१.१२**

| **अ.क्र.** | **पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर आपल्या गटामध्ये जास्त झालेला आहे ?** | **जिल्हा समन्वयक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | १ | ८.३३ |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ६ | ५०.०० |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | १ | ८.३३ |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | १ | ८.३३ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवन | ३ | २५.०० |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | ५ | ४१.६७ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | १ | ८.३३ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | ४ | ३३.३३ |
| ९ | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर जिल्हा समन्वयक कार्यरत असलेल्या गटामध्ये जास्त प्रमाणात झालेला आहे याबाबतची माहिती उपरोक्त तक्त्यात दिलेली आहे. उपरोक्त तक्त्यानुसार सर्वात जास्त ६(५०%) जिल्हा समन्वयकांनी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन, ५(४१.६७%) जिल्हा समन्वयकांनी गौण वन उत्पादन मालकी, ४(३३.३३%) जिल्हा समन्वयकांनी ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन तर सर्वात कमी १(८.३३%) जिल्हा समन्वयकांनी अनुक्रमे विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन, गौण खनिजांचे उत्खनन, जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध व सावकारी करण्यावर नियंत्रण या विशेष अधिकारांचा वापर झाल्याचे नमूद केले आहे.

**४.१.१७) प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून केले जाणारे प्रयत्न**

**तक्ता क्र.- ४.१.१३**

| अ.क्र. | प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी आपल्या स्तरावरून कोणते प्रयत्न केले जातात? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पत्रव्यवहार | ११ | ९१.६७ |
| २ | ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे | ५ | ४१.६७ |
| ३ | बैठक घेऊन माहिती देणे | २ | १६.६७ |
| ४ | सोशल मिडियाचा उपयोग | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)

**आलेख क्र. -४.१.७**




उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी ११(९१.६७%) जिल्हा समन्वयकांनी पत्रव्यवहार करणे, ५(४१.६७%) जिल्हा समन्वयकांनी ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे तर २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांनी विविध बैठका घेऊन माहिती देणे तसेच एका जिल्हा समन्वयकाने सोशल मिडीयाचा वापर करणे इत्यादी प्रयत्न केल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.१८) आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून केलेले प्रयत्न

**तक्ता क्र. -४.१.१४**

| अ.क्र. | आदिवासी समाजाचे रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जिल्हा समन्वयक यांचे स्तरावरून करण्यात येणारे प्रयत्न | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करण्यात आला | ६ | ५०.०० |
| २ | माहिती पुस्तिका तयार केली | ३ | २५.०० |
| ३ | व्हिडिओ फिल्म तयार केल्या | १ | ८.३३ |
| ४ | माहिती फलक लावण्यात आले | ४ | ३३.३३ |
| ५ | आदिवासींच्या रूढी परंपरा व आदिवासी योजनांच्या माहितीचे कॅलेंडर छपाई | १ | ८.३३ |
| ६ | सांस्कृतिक साहित्य, वाद्य खरेदी | ३ | २५.०० |
| ७ | अद्याप केलेली नाही | २ | १६.६७ |
| **एकूण** | | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

आदिवासी समाजाच्या रूढी/ परंपरांचे जतन व संवर्धन करणे हे पेसा कायद्या**च्या** महत्वा**च्या** उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. उपरोक्त तक्त्यात आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जिल्हा समन्वयकांकडून कोणकोणते प्रयत्न केले आहेत याची माहिती दिलेली आहे. उपरोक्त माहितीच्या विश्लेषणानुसार असे आढळून येते की, सर्वात जास्त ६(५०%) जिल्हा समन्वयकांनी याबाबत ग्रामसभेत ठराव करणे, ४(३३.३३%) जिल्हा समन्वयकांनी माहिती फलक लावणे, ३(२५%) जिल्हा समन्वयकांनी रुढी/परंपरा जतन करणेबाबत माहिती पुस्तीका तयार करणे तसेच सांस्कृतिक साहित्य, वाद्ये खरेदी करण्यात आल्याचे नमूद केले आहे. २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांनी याबबात अद्यापही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

### ४.१.१९) लहान जलस्त्रोतांच्या उपयोगाबाबत

**तक्ता क्र. - ४.१.१५**

| अ.क्र. | आपल्या गटामध्ये लहान जलस्त्रोतांचा उपयोग कशा प्रकारे करण्यात येतो? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी | १० | ८३.३३ |
| २ | शेतीला पाण्यासाठी | ९ | ७५.०० |
| ३ | पिण्याच्या पाण्यासाठी | ९ | ७५.०० |
| ४ | जनावरांना पाणी | १० | ८३.३३ |
| ५ | इतर (कारखान्यांना पाणी, घरांचे/इमारतींचे बांधकाम) | २ | १६.६७ |
| ६ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यानुसार लहान जलस्त्रोतांचा वापर विविध कामांसाठी करण्यात आल्याचे दिसुन येते. सर्वात जास्त १०(८३.३३%) जिल्हा समन्वयकांनी लहान जलस्त्रोतांचा उपयोग अनुक्रमे मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी व जनावरांना पाण्यासाठी वापर केल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.२०) पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेबाबत

**तक्ता क्र. -४.१.१६**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणती प्रक्रिया राबविली जाते ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गौण वनउपज गोळा करणे | ८ | ६६.६७ |
| २ | लिलाव करणे | ६ | ५०.०० |
| ३ | गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे | ८ | ६६.६७ |
| ४ | गौण वनउपजा बाबत कार्यवाही करण्यात येत नाही | २ | १६.६७ |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणकोणत्या प्रक्रिया राबविण्यात येतात याबाबत माहिती घेतली असता असे आढळून येते की, सर्वात जास्त ८(६६.६७%) जिल्हा समन्वयकांनी गौण वनउपज गोळा करणे तसेच गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे तर ६(५०%) जिल्हा समन्वयकांनी त्यांचा लिलाव करणे इ. प्रक्रिया राबविण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.२१) गौण वनउपज विक्रीच्या प्रक्रियेबाबत

**तक्ता क्र. -४.१.१७**

| अ.क्र. | गौण वनउपज विक्रीची प्रक्रिया कोणती ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लिलावाद्वारे | ७ | ५८.३३ |
| २ | खाजगी ठेकेदार | २ | १६.६७ |
| ३ | बाजारामध्ये | ३ | २५.०० |
| ४ | वैयक्तिक विक्री केली जाते | २ | १६.६७ |
| ५ | ई निविदा व्दारे | १ | ८.३३ |
| ६ | आदिवासी विकास महामंडळ हमीभाव विक्री | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यात गौण वनउपज विक्रीबाबतच्या प्रक्रियेचा आढावा घेतला असता असे दिसुन येते की, गौण वनउपजांची विक्री सर्वात जास्त लिलावाद्वारे होत असल्याचे ७(५८.३३%) जिल्हा समन्वयकांनी नमूद केले

आहे. बाजारामध्ये विक्री होत असल्याचे ३(२५%) जिल्हा समन्वयकांनी तर  खाजगी ठेकेदारांकडे तसेच वैयक्तिक विक्री केली जात असल्याचे २(१६.६७%) जिल्हा  समन्वयकांनी नमूद केले आहे.

### ४.१.२२) विकास गटामधील मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती

**तक्ता क्र. - ४.१.१८**

| अ.क्र. | मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहे | ७ | ५८.३३ |
| २ | मादक द्रव्यांचे सेवन होत नाही | १ | ८.३३ |
| ३ | मादक द्रव्यांच्या दुकानावर बंदी | २ | १६.६७ |
| ४ | याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही | ४ | ३३.३३ |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| | **एकूण** | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

पेसा कायद्यानुसार पेसा गावातील ग्रामसभांना देण्यात आलेल्या  विशेष अधिकारांपैकी मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन हा एक महत्वाचा अधिकार आहे. जिल्हा समन्वयक  कार्यरत असलेल्या विकास गटांमध्ये  मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबत असलेली सद्यस्थिती उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली आहे. वरील तक्त्यानुसार ७(५८.३३%) जिल्हा समन्वयकांनी ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहेत तर २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांनी त्यांच्या विकास गटात मादक द्रव्यांच्या दुकानावर बंदी घातल्याचे नमूद केले आहे. ४(३३.३३%) जिल्हा समन्वयकांनी याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.२३) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.१.१९**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये क्षेत्रनिहाय घेण्यात आलेली कामे | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | १० | ८३.३३ |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | ८ | ६६.६७ |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | १० | ८३.३३ |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | ७ | ५८.३३ |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| | **एकूण** | **१२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये सर्वात जास्त पायाभुत सुविधा तसेच आरोग्य, स्वच्छता व शिक्षण या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत.

### ४.१.२४) पेसा ५% अबंध निधीमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा तपशिल -

पेसा ५% अबंध निधीमधुन गावांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आल्याचे जिल्हा समन्वयकांनी नमूद केले आहे.

१. **शैक्षणिक उपक्रम** - अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळा येथे ई-लर्निग संच, अंगणवाडी डिजिटल करणे, अंगणवाडी करीता साहित्य खरेदी, अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती, अंगणवाडी किचन शेड बांधकाम, अभ्यास सहलीचे आयोजन करणे.

२. **पाणीपुरवठा** - पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, जलशुध्दीकरण यंत्र, पिण्याच्या पाण्याचा आरो प्लांट, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर दुरुस्ती, दुहेरी हातपंप, जंगलात जनावरांसाठी तलाव बांधकाम इ.

३. **आरोग्य** - सनिटरी नॅपकीन वाटप, एक मुठ पोषण आहार वाटप.

४. **रस्ते/ गटारे** - गाव/पाडा/वाडा/वस्ती मध्ये खडीकरण व सिमेंट रस्ते तयार करणे, गावामध्ये बंदिस्त गटारे बांधकाम.

५. **विद्युतीकरण** - सौरपथ दिवे बसविणे, गावामध्ये विद्युत खांब बसविणे.

६. **वृक्षारोपण** - गौण वनोपज वृक्ष लागवड.

७. **सार्वजनिक स्वच्छता** - सार्वजनिक स्वच्छतागृह बांधकाम.

८. **प्रशिक्षण** - मध संकलन प्रशिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण देणे.

९. **पेसा कायदा प्रचार व प्रसिद्धी** - पेसा कायदा विषयक माहिती फलक लावणे, पेसा व वनहक्क बाबत माहितीचा प्रचार करणे.

१०. **इतर उपक्रम** — अ. गावामध्ये बैठक ओटे बसविणे.
आ. आदिवासी संस्कृतीचे जतन करणेसाठी वाद्य/ ढोल/ताशे खरेदी.
इ. चावडी, कोंडवाडा दुरुस्ती, जमीन सपाटीकरण इ.
ई. शेळी वाटप, मत्स्यबीज वाटप.
ऊ. समाज मंदिर दुरुस्ती




**पेसा ५% अबंध निधी अंतर्गत पोषण आहार वाटप**

### ४.१.२५) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.१.२०**

| अ.क्र. | आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध होऊ शकला असता | ९ | ७५.०० |
| २ | उपलब्ध होऊ शकला नसता | २ | १६.६७ |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| | **एकूण** | **१२** | **१००** |

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का याबाबत जिल्हा समन्वयकांचे अभिप्राय घेतले असता ९(७५%) जिल्हा समन्वयकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला असता असे अभिप्राय दिले आहेत तर २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला नसता असे अभिप्राय दिले आहेत. एका जिल्हा समन्वयकाने याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

### ४.१.२६) पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत

**तक्ता क्र. - ४.१.२१**

| अ.क्र. | आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे डुप्लीकेशन झाले आहे/होत आहे ? असे आपणास वाटते का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५ | ४१.६७ |
| २ | नाही | ३ | २५.०० |
| ३ | काही प्रमाणात | २ | १६.६७ |
| ४ | माहिती नाही | १ | ८.३३ |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| | **एकूण** | **१२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात एकूण १२ जिल्हा समन्वयकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, ५(४१.६७%) जिल्हा समन्वयकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत आहे असे नमूद केले आहे तर ३(२५%) जिल्हा समन्वयकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत नाही असे नमूद केले आहे.

### ४.१.२७) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत

**तक्ता क्र. - ४.१.२२**

| अ.क्र. | आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | २५.०० |
| २ | नाही | ८ | ६६.६७ |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | ८.३३ |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे ३(२५%) जिल्हा समन्वयकांनी अभिप्राय दिले आहेत तर ८(६६.६७%) जिल्हा समन्वयकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झालेले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

सदरील उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.१.२८) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत

**तक्ता क्र. - ४.१.२३**

| अ.क्र. | आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का ? | जिल्हा समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७ | ५८.३३ |
| २ | नाही | २ | १६.६७ |
| ३ | प्रतिसाद नाही | ३ | २५.०० |
| **एकूण** | | **१२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे किंवा कसे याबाबत जिल्हा समन्वयक यांचेकडून माहिती घेतलेली आहे. उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे ७(५८.३३%) जिल्हा समन्वयकांनी अभिप्राय दिले आहेत तर २(१६.६७%) जिल्हा समन्वयकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

जास्तीत जास्त कामांचे सनियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी तद्नंतर गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### ४.१.२९) पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१ गावातील ग्रामस्थांमध्ये पेसा कायद्याविषयी प्रबोधन करणे गरजेचे आहे.

२ गावातील ग्रामस्थांमध्ये पेसा कायद्याचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे.

३ पेसा ५ % अबंध निधी गावाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात असायला हवा.

४ पेसा ५ % अबंध निधी PFMS व्दारे खर्च करण्यात यावा.

५ पेसा ५ % अबंध निधीचा वापर जास्तीत जास्त पेसा कायदा अंमलबजावणीसाठी झाला पाहिजे.

६ निधी वापराबाबत मूल्यमापन वेळोवेळी पेसा कक्षाकडून होणे अपेक्षित आहे.

७ प्रत्येक ग्रामपंचायत निहाय पेसा ५ % अबंध निधीच्या कामाची माहिती ऑनलाईन पद्धतीने समाविष्ट करण्यासाठी सॉफ्टवेअर असायला हवे .

८ पेसा ५ % निधी एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात यावा म्हणजे निधीमध्ये वाढ होईल. निधी कमी येतो त्यामुळे मोठ्या स्वरूपाचे किंवा चांगली विकास कामे घेता येत नाहीत. त्यामुळे काम प्रभावी वाटत नाही.

९ पायाभूत सुविधा या घटकाखाली दिलेली कामे ५ % निधीमधून करण्यात येवू नयेत, हा निधी प्रामुख्याने पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता व शिक्षण, वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका या बाबींवरच खर्च करावा.

१० ग्रामसभांचे बळकटीकरण करणे.

११ सर्व स्थायी समित्यांना प्रशिक्षण देणे.

१२ कामांचे प्राधान्यक्रम ठरवूनच कामे करणे.

१३ पेसा ५ % अबंध निधी योजनेची जनजागृती (IEC- Information, Education & Communication) करणेसाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे.

१४ पेसा ५% अबंध निधी योजनेच्या शासन निर्णयानुसार अद्यावत मार्गदर्शक सुचना प्राप्त व्हाव्यात.

१५ पेसा ५ % अबंध निधी व GPDP पंचवार्षिक आराखडा यामध्ये एकत्रीकरण/एकसुत्रीकरण असणे महत्वाचे आहे.

१६ egramswaraj.gov.in या Portal ला पेसा Component add करावा व त्याप्रमाणे online data भरण्याचे काम Asst Computer operator यांचेवर सोपवावे.

१७ दर सहा महिन्यातून एकदा पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणी करणेसाठी विस्तार अधिकारी यांना आदेशित करावे.

१८ दरवर्षी पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण करण्यासाठी Local Fund ला उद्दिष्ट वाढवून द्यावे किंवा त्रयस्थ पक्षाकडून करण्यास परवानगी द्यावी.

१९ पेसा ५ % अबंध निधी विहित वेळेत मिळावा.

२० मोबिलायझर यांची निवड बचत गटांतर्गत न होता ग्रामसभेमार्फत आदिवासी समुदायातील योग्य व्यक्तीची निवड व्हावी.

२१ मोबिलायझर यांची दरमहा बैठक घेण्याची परवानगी मिळावी. त्यांनाही प्रवासभत्ता मिळावा त्यासाठी Contingency ची तरतूद व्हावी.

२२ जिल्हा स्तरावर Contingency मिळाल्यास आदिवासींच्या प्रथा, परंपरा, रूढी यांच्या यशोगाथांच्या Documentary बनविता येतील.

२३ पेसा ५% निधी थेट जिल्हा परिषद स्तरावर वितरण होणे अपेक्षित आहे.

२४ जिल्हा व तालुका पेसा समन्वयक यांना दफ्तर तपासणीचे अधिकार उपलब्ध करून द्यावेत.

**४.१.३०) जिल्ह्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी** -

पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना जिल्हा पेसा समन्वयक यांना कोणकोणत्या अडचणी येतात याचा तपशिल जिल्हा पेसा समन्वयक यांनी खालीलप्रमाणे दिला आहे.

१ पेसा कायदा विषयी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नसल्याने अपेक्षित साध्य साधता येत नाही .

२ स्थानिक यंत्रणेचे सहकार्य मिळत नाही.

३ तालुका स्तरावरील तालुका समन्वयक पदे रिक्त असल्याने पेसा कायद्यांची अंमलबजावणी करण्यास अडचणी येतात.

४ तेंदूपत्ता संकलनाबाबत पेसा व सामुहिक वनहक्क या दोन समितीमध्ये वाद निर्माण होतात त्यामुळे तक्रारी होतात.

५ विविध विभागांचे अपेक्षित सहकार्य मिळत नाही.

६ शासन निर्णय, नियम, परिपत्रके यामध्ये स्पष्टता नाही त्यामुळे नियमाचे मार्गदर्शन करताना अडचणी येतात.

७ पेसा क्षेत्रामध्ये सामुहिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले आहेत, पेसा नुसार समितीचा व ग्रामसभेचा सचिव ग्रामसेवक असतो. परंतु काही पेसा गावामध्ये वनहक्क कायद्यानुसार व्यवस्थापन केले जाते. तेंव्हा त्या ग्रामसभा ग्रामसेवकांना विश्वासात घेत नाहीत परस्पर व्यवहार करतात तसेच महाग्रामसभा व खाजगी संस्था यांचा तेंदू लिलावात होणारा हस्तक्षेप ही अडचण आहे.

८ ग्रामसभेचे बळकटीकरण करताना गावा-गावातील समित्या प्रत्यक्ष काम करताना दिसून येत नाहीत.

९ ग्रामसभा कोष समित्यांचे गाव निहाय बँक खाते नाही.

१० ग्रामपंचायत ही ग्रामविकास विभाग यांच्या अंतर्गत येत असल्याने तालुका व जिल्हा स्तरावर स्वतंत्र पेसा कक्ष स्थापन करण्यात यावा.

११ गाव स्तरावरील ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, समितीतील सदस्य यांचे ३ दिवसीय प्रशिक्षण राबविण्यात यावे.

१२ ग्रामसभेला सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित राहत नाहीत.

१३ अपुरे मनुष्यबळ.

१४ अतिदुर्गम भागांमुळे प्रवासास अडचणी येतात.

१५ जिल्हा व तालुका पेसा समन्वयक यांना इतर जबाबदाऱ्या दिल्याने/ इतर कामे करण्यास निर्देशित केल्याने पेसा कायद्याविषयी कामकाजाकडे दुर्लक्ष होते.

१६ कार्यालयीन कामकाजाचा व्याप जास्त असल्याने गाव भेटी वेळेत करता येत नाहीत.

१७ प्रत्येक गाव/पाडा निहाय IEC Activities घेतल्यास ते अधिक प्रभावी ठरते. तसेच त्यांच्या बोली भाषा येणाऱ्या व्यक्ती उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**४.१.३१) पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना जिल्हा पेसा समन्वयक यांना येणाऱ्या अडचणी** -

जिल्हा पेसा समन्वयक यांना त्यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

१ तालुका व जिल्हा स्तरावरील पेसा कायद्याविषयक स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे अपेक्षित मार्गदर्शन मिळत नाही. तसेच कामाला मर्यादा येतात.

२ पेसा कायद्याबाबत कामकाज करताना ५ % निधी खर्च करताना कायदा अंमलबजावणीबाबत कामकाज मागे राहते व ५ % खर्चावर कामकाज सुरु राहते.

३ कार्यालयात स्टेशनरी, संगणक, बैठक व्यवस्था नाही.

४ कार्यालयीन कामामुळे क्षेत्रभेट होत नाही.

५ जिल्हा पेसा समन्वयक यांना पेसा कायदा व्यतिरिक्त अतिरिक्त कामे देण्यात येतात.

६ राज्य स्तरावरून पेसा बाबतीत आवश्यक निर्णय तातडीने होत नाहीत.

७ जिल्हा स्तरावर Contingency नाही.

८ जिल्हा पेसा समन्वयकांना मोबिलायझर यांच्या बैठका घेता येत नाहीत.

९ प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थी उपस्थित राहत नाहीत.



**ग्रामस्थांकडून माहिती घेताना अन्वेषक**

## ४.२ तालुका पेसा समन्वयक यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापणाअंतर्गत एकूण १३ जिल्ह्यांमधील सर्व ५९ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या ५९ तालुक्यामधील तालुका पेसा समन्वयक यांचेकडून विहीत मुलाखत अनुसूचीमध्ये माहिती घेण्याचे प्रस्तावित होते तथापि ८ तालुक्यांमध्ये हे पद रिक्त आहे. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यामधील रिक्त पदाचा कार्यभार मोखाडा तालुक्याच्या समन्वयकांकडे असल्यामुळे जव्हार तालुक्याची माहिती संकलित केली आहे. तालुका पेसा समन्वयक हे पद रिक्त असल्यामुळे उर्वरित ७ तालुक्यांची माहिती संकलित करता आली नाही. त्यामुळे एकूण ५२ तालुका पेसा समन्वयक यांचेकडील प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

### ४.२.१) पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळणेचा स्त्रोत -

**तक्ता क्र.- ४.२.१**

| अ.क्र. | आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | ४२ | ८०.७७ |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिति | ६ | ११.५४ |
| ३ | अद्याप मिळालेले नाही | ७ | १३.४६ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.-४.२.१**




उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीच्या विश्लेषणानुसार असे निर्देशनास येते की, सर्वात जास्त ४२(८०.७७%) तालुका समन्वयकांना यशदा पुणे मार्फत तर ६(११.५४%) तालुका समन्वयकांना जिल्हा परिषद/ पंचायत समितीमार्फत पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाले आहे. ७(१३.४६%) तालुका समन्वयकांना अद्यापही पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाले नाही.

### ४.२.२) जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याबाबत माहिती देण्याचे माध्यम

**तक्ता क्र.- ४.२.२**

| अ.क्र. | पेसा कायदा १९९६ ची माहिती देण्याचे माध्यम | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेत माहिती दिली | ३७ | ७१.१५ |
| २ | प्रशिक्षणाद्वारे | ३७ | ७१.१५ |
| ३ | शासनाचे अधिकारी | ४ | ७.६९ |
| ४ | प्रसिद्धी माध्यमाद्वारे | १८ | ३४.६२ |
| ५ | मोबिलायझर | २ | ३.८५ |
| ६ | इतर माध्यमे (गावपातळीवरील बैठका, बचत गट बैठका इ.) | ३ | ५.७७ |
| ७ | अद्याप पर्यंत माहिती दिली नाही | ५ | ९.६२ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.- ४.२.२**




उपरोक्त तक्त्यात जिल्ह्यातील गावांना पेसा कायद्याची माहिती कोणामार्फत दिली याबाबतची माहिती दिलेली आहे. सर्वात जास्त ३७(७१.१५%) तालुका समन्वयकांनी अनुक्रमे ग्रामसभेच्या व प्रशिक्षणाच्या माध्यमातुन तर १८(३४.६२%) तालुका समन्वयकांनी प्रसिध्दी माध्यमांव्दारे पेसा कायद्याची माहिती दिल्याचे नमूद केले आहे. ५(९.६२%) तालुका समन्वयकांनी पेसा कायद्याची माहिती गावांना अद्याप पर्यंत दिली नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.२.३) प्रशिक्षण दिल्या जाणाऱ्या व्यक्तींचा तपशिल

**तक्ता क्र.- ४.२.३**

| अ.क्र. | आपल्या भागातील कोणकोणत्या स्तरावरील व्यक्तींना प्रशिक्षण दिले जाते? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पेसा मोबिलायझर | ५१ | ९८.०८ |
| २ | ग्रामसभा कोष समिती सदस्य | ४९ | ९४.२३ |
| ३ | गाव स्तरीय कर्मचारी | ४९ | ९४.२३ |
| ४ | ग्रामपंचायत सदस्य | ४८ | ९२.३१ |
| ५ | पेसा नियम १० नुसार स्थापन केलेल्या सर्व समिती सदस्यांना | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणकोणत्या स्तरावरील व्यक्तींना दिले जाते याचा तपशिल उपरोक्त तक्त्यात दिलेला आहे. उपरोक्त माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, सर्वात जास्त प्रशिक्षण पेसा मोबिलायझर यांना दिले जाते. तद्नंतर ग्रामसभाकोष समिती सदस्य व गावस्तरीय कर्मचारी यांना दिले जाते.

### ४.२.४) प्रशिक्षण घेण्यात आलेल्या समित्यांची माहिती

**तक्ता क्र.- ४.२.४**

| अ.क्र. | प्रशिक्षण घेण्यात आलेल्या समित्या | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा कोष समिती | ४८ | ९२.३१ |
| २ | साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती | १२ | २३.०८ |
| ३ | शांतता समिती | ६ | ११.५४ |
| ४ | बाजार समिती | ६ | ११.५४ |
| ५ | मादक द्रव्य नियंत्रण समिती | ६ | ११.५४ |
| ६ | ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती | ४ | ७.६९ |
| ७ | न्याय समिती | ५ | ९.६२ |
| ८ | कर्ज नियंत्रण समिती | ६ | ११.५४ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यानुसार सर्वात जास्त ग्रामसभा कोष समितीचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे असे निर्दशनास येते. पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे प्रशिक्षण झाल्याचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

### ४.२.५) शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण करणेसंबंधीची माहिती

**तक्ता क्र.-४.२.५**

| अ.क्र. | शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण केले जाते का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | ८६.५४ |
| २ | नाही | ७ | १३.४६ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध स्तरांवरील व्यक्तींचे प्रशिक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. ४५(८६.५४%) तालुका समन्वयकांनी शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण केले जाते असे नमूद केले आहे. तर ७(१३.४६%) तालुका समन्वयकांनी सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पुर्ण केले जात नाही असे नमूद केले आहे.

### ४.२.६) शासनामार्फत दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती देणेबाबत तपशिल

**तक्ता क्र.-४.२.६**

| अ.क्र. | शासनामार्फत आपणास दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपुर्ण माहिती दिली जाते का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ९०.३९ |
| २ | नाही | ४ | ७.६९ |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, ४७(९०.३९%) तालुका समन्वयकांनी शासनामार्फत त्यांना दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपुर्ण माहिती दिली जाते तर ४(७.६९%) तालुका समन्वयकांनी शासनामार्फत त्यांना दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपुर्ण माहिती दिली जात नाही असे नमूद केले आहे.

### ४.२.७) तालुका पेसा समन्वयक यांच्या पेसा प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेल्या विषयासंबंधीची माहिती

**तक्ता क्र. - ४.२.७**

| अ.क्र. | पेसा प्रशिक्षणामध्ये घेण्यात आलेले विषय | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पेसा कायदा | ५१ | ९८.०८ |
| २ | पेसा ग्रामसभेचे अधिकार | ५२ | १०० |
| ३ | वनहक्क कायदा | ५१ | ९८.०८ |
| ४ | गौण वनउपज | ४९ | ९४.२३ |
| ५ | बाजार व सावकारी | ४४ | ८४.६२ |
| ६ | गौण जलसाठे | ४८ | ९२.३१ |
| ७ | जमीन हस्तांतरण | ४० | ७६.९२ |
| ८ | आदिवासी समाजाची ओळख | ४६ | ८८.४६ |
| ९ | इतर (जैव विविधता कायदा, आदिवासी विकासासंदर्भात शासनाच्या योजना, गौण खनिजे व पेसा नियमानुसार स्थापन समित्यांचे कार्य नवीन पेसा गाव निर्मिती) | ४ | ७.६९ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.- ४.२.३**




पेसा समन्वयक यांच्या प्रशिक्षणामध्ये कोणकोणते विषय घेण्यात आलेले आहेत याबाबत माहिती घेतली असता असे निदर्शनास येते की, सर्वात जास्त ५२ (१००%) तालुका समन्वयकांनी पेसा ग्रामसभेचे अधिकार, ५१ (९८.०८%) तालुका समन्वयकांनी अनुक्रमे पेसा कायदा व वनहक्क कायदा तर सर्वात कमी ४० (७६.९२%) तालुका समन्वयकांनी जमीन हस्तांतरण हे विषय घेण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.२.८) पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी येणाऱ्या अडचणी -

पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी कोणकोणत्या अडचणी येतात याबाबत तालुका समन्वयक यांचेकडून माहिती घेतली असता त्यांनी खालील अडचणी येत असल्याचे नमूद केले आहे.

१. प्रशिक्षणासाठी हॉल, लाईट, इंटरनेट, संगणक इ. सुविधा नसणे.

२. प्रवीण प्रशिक्षक, प्रशिक्षण साहित्य, निवास व्यवस्था नसणे.

३. प्रशिक्षणामध्ये लोकांचा सहभाग कमी असणे, प्रशिक्षणार्थींची वेळेत उपस्थिती नसणे, प्रशिक्षणार्थींना प्रवासासाठी वाहने उपलब्ध नसणे तसेच भाषेची अडचण इ. अडचणी येतात.

### ४.२.९) शासनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नव्याने कोणत्या बाबींचा समावेश करणे गरजेचे वाटते याबाबत तपशिल -

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता शासनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नव्याने कोणत्या बाबींचा समावेश करणे गरजेचे वाटते याबबात पेसा समन्वयकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१. GPDP प्रशिक्षणाचा समावेश करण्यात यावा.

२. वित्तीय बाबी व दफ्तर व्यवस्थापन (रेकॉर्ड मनेजमेंट), माहितीचा अधिकार, प्रशासकीय बाबी इ. समावेश करावा.

३. सुधारित शासन निर्णयांचा समावेश करणे, शासन निर्णयाच्या अनुरुप कायद्याची कशी अंमलबजावणी असावी याचा समावेश असावा.

४. परिपूर्ण वाचन साहीत्य शासनामार्फत देण्यात यावे.

५. आदर्श पेसा गाव अभ्यास भेट आयोजित करण्यात यावी.

६. गाव निहाय एक दिवसीय प्रशिक्षण ठेवणे खूप गरजेचे आहे.

७. पेसा कायद्या बरोबरच कौशल्य विकास प्रशिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे.



**ग्रामस्थांकडून माहिती घेताना अन्वेषक**

### ४.२.१०) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत

**तक्ता क्र. -४.२.८**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | २३.०८ |
| २ | नाही | ८ | १५.३८ |
| ३ | काही प्रमाणात | ३२ | ६१.५४ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना इ.) सहकार्य मिळते का याबाबत माहिती घेण्यात आली आहे. १२(२३.०८%) तालुका समन्वयकांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत असल्याचे तर ८(१५.३८%) तालुका समन्वयकांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत नसल्याचे मत नोंदवले आहे. ३२(६१.५४%) तालुका समन्वयकांनी काही प्रमाणात या यंत्रणांचे सहकार्य मिळते असे मत नोंदवले आहे.

### ४.२.११) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.२.९**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९ | ३६.५४ |
| २ | नाही | २६ | ५०.०० |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ७ | १३.४६ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

मूल्यमापनाअंतर्गत माहिती नोंदविलेल्या ५२ तालुका पेसा समन्वयकांपैकी, १९(३६.५४%) तालुका समन्वयकांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे असा प्रतिसाद दिलेला आहे तर २६(५०%) तालुका समन्वयकांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही असा प्रतिसाद दिलेला आहे.

### ४.२.१२) पेसा कायदा विषयक अडचणी व समस्या उद्धवल्यास घेत असलेल्या मार्गदर्शनाविषयी

पेसा कायद्याविषयक अडचणी उद्धवल्यास तालुका समन्वयक मुख्यत्वे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, राज्य व जिल्हा पेसा समन्वयक यांचेकडून मार्गदर्शन घेतात असे नमूद केले आहे.

### ४.२.१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.२.१०**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२ | ४२.३१ |
| २ | नाही | २२ | ४२.३१ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ८ | १५.३८ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार, २२(४२.३१%) तालुका समन्वयकांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध असल्याचे तसेच शासकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. ८(१५.३८%) तालुका समन्वयक या माहितीबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.२.१४) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत

**तक्ता क्र. - ४.२.११**

| अ.क्र. | पेसा कायदा व नियमाला अनुसरून शासनाने काढलेले शासन निर्णय व परिपत्रके यांचेमध्ये तफावत असल्याचे दिसून येते का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ७१.१५ |
| २ | नाही | १४ | २६.९२ |
| ३ | प्रतिसाद नाही | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

मूल्यमापनाअंतर्गत संकलित केलेल्या एकूण ५२ तालुका समन्वयकांच्या माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसुन येते की, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये तफावत असल्याचे ३७(७१.१५%) तालुका समन्वयकांनी नमूद केले आहे तर १४(२६.९२%) तालुका समन्वयकांनी विविध शासन निर्णयामध्ये तफावत नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.२.१५) शासन निर्णयामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे तालुका समन्वयकांनी नमूद केले आहे.

१.ग्रामसभा कोष समितीच्या कार्यकाळाबाबत तफावत आहे.
२.पेसा नियमामध्ये स्थायी समितीच्या सविस्तर सूचना नाहीत.
३.वन विभाग व महसूल विभागाच्या शासन निर्णयामध्ये पेसा कायद्याच्या नियमानुसार सुसंगती दिसत नाही.
४.गौण वनोत्पादन व जलसाठे याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शन नाही.

### ४.२.१६) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत कोणकोणत्या बाबतीत शासन निर्णय व परिपत्रके काढणे आवश्यक वाटते याबाबत माहिती -

१. ग्रामसभेला सर्व विभागांची उपस्थिती अनिवार्य करणेबाबत सर्वच विभागांनी शासन निर्णय काढणे आवश्यक वाटते.
२. ग्रामसभा कोष समिती व सर्व स्थायी समित्यांच्या कार्यकाळाबाबत सुधारित शासन निर्णय काढणे आवश्यक वाटते.
३. सर्व स्थायी समित्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निश्चित करण्यात यावे.
४. गौण वनउपजाच्या व्यवस्थापनाबाबत स्पष्ट मार्गदर्शिका काढणे.

५. अनुसुचित क्षेत्रातील तेंदुपत्ता/ गौण वनोपज संकलन व विक्रीबाबत स्पष्ट व सोप्या भाषेत शासन निर्णय काढावे.

६. अनुसूचित क्षेत्रातील जमीन हस्तांतरणाबाबत स्पष्ट सूचनांचे परिपत्रक काढणे आवश्यक वाटते.

७. पेसा क्षेत्रामध्ये पेसा कायदा व नियम यांच्याशी संबंधीत सर्व परिपत्रक व शासन निर्णय सुसंगत असावे.

८. गौण वनौपज, जलसाठे, ग्रामसभा कोष समिती यांच्या शासन निर्णयात परिपत्रके काढणे आवश्यक वाटते.

९. ग्रामसभेची मुदत संपल्यानंतर ग्रामसभा कोष समितीच्या मुदतीबाबत परिपत्रक काढणे आवश्यक वाटते.

१०. गौण वन उपजबाबत पेसा कायदा व वन हक्क कायदा यामधील अधिकाराबाबत परिपत्रक काढणे तसेच निधीच्या व्यवस्थापनाबाबत शासन निर्णय/परिपत्रक काढणे आवश्यक वाटते.

११. अनुसुचित क्षेत्रात गौण वनोपजांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार ग्रामसभेमार्फत फक्त साधन संपत्ती व नियोजन व व्यवस्थापन समिती किंवा सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती यापैकी एकाच समितीला देण्यात यावे.

१२. गौण वन उपजासाठी ग्रामसभेचे स्वतंत्र खाते व मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत बिज भांडवल करीता स्वतंत्र खाते उघडण्या संदर्भात स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे.

१३. पेसा मोबिलायझर यांची निवड व मानधनाबाबत परिपत्रक काढणे आवश्यक वाटते.

### ४.२.१७) पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी जास्त वापर झालेल्या अधिकारांबाबत

**तक्ता क्र. - ४.२.१२**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर आपल्या गटामध्ये जास्त झालेला आहे ? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | १२ | २३.०८ |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ४२ | ८०.७७ |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | १० | १९.२३ |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | ६ | ११.५४ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवन | १२ | २३.०८ |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | ३२ | ६१.५४ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | ६ | ११.५४ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | १८ | ३४.६२ |
| ९ | सावकारी करण्यावर नियंत्रण | २ | ३.८५ |
| १० | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | ३ | ५.७७ |
| | **एकूण** | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

आलेख क्र. - ४.२.४




पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर तालुका समन्वयक कार्यरत असलेल्या गटामध्ये जास्त प्रमाणात झाला आहे याबाबतची माहिती उपरोक्त तक्त्यात दिली आहे. उपरोक्त तक्त्यानुसार सर्वात जास्त ४२(८०.७७%) तालुका समन्वयकांनी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन, ३२(६१.५४%) तालुका समन्वयकांनी गौण वन उत्पादन मालकी तर सर्वात कमी २(३.८५%) तालुका समन्वयकांनी सावकारी करण्यावर नियंत्रण या विशेष अधिकारांचा वापर झाल्याचे नमूद केले आहे.

### ४.२.१८) प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी तालुका समन्वयकांकडून केले जाणारे प्रयत्न

तक्ता क्र. - ४.२.१३

| अ.क्र. | प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी आपल्या स्तरावरून कोणते प्रयत्न केले जातात ? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पत्रव्यवहार | ४५ | ८६.५४ |
| २ | ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे | ३७ | ७१.१५ |
| ३ | बैठक घेऊन माहिती देणे | २९ | ५५.७७ |
| ४ | ग्रामसेवकांना मासिक बैठकीमध्ये सूचना | १ | १.९२ |
| ५ | प्रशिक्षणाच्या माध्यमातुन | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी ४५(८६.५४%) तालुका समन्वयकांनी पत्रव्यवहार करणे, ३७(७१.१५%) तालुका समन्वयकांनी ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे तर २९(५५.७७%) तालुका समन्वयकांनी विविध बैठका घेऊन माहिती देणे इत्यादी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

### ४.२.१९) आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी तालुका समन्वयकांकडून केलेले प्रयत्न

**तक्ता क्र. - ४.२.१४**

| अ.क्र. | आपल्या गटामध्ये आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले आहेत? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करण्यात आला | २६ | ५०.०० |
| २ | माहिती पुस्तिका तयार केली | १४ | २६.९२ |
| ३ | व्हिडिओ फिल्म तयार केल्या | ३ | ५.७७ |
| ४ | माहिती फलक लावण्यात आले | ३७ | ७१.१५ |
| ५ | अद्याप केलेली नाही | ७ | १३.४६ |
| ६ | प्रशिक्षणे व IEC चे माध्यमातून जाणीवजागृती | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

आदिवासी समाजाच्या रूढी/ परंपरांचे जतन व संवर्धन करणे हे पेसा कायद्याचा महत्वाचा उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. उपरोक्त तक्त्यात आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी तालुका समन्वयकांकडून कोणकोणते प्रयत्न केले आहेत याची माहिती दिलेली आहे. उपरोक्त माहितीच्या विश्लेषणानुसार असे आढळून येते की, सर्वात जास्त ३७(७१.१५%) तालुका समन्वयकांनी याबाबत माहिती फलक लावणे, २६(५०%) तालुका समन्वयकांनी रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. ७(१३.४६%) तालुका समन्वयकांनी याबबात अद्यापही प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

### ४.२.२०) लहान जलस्त्रोतांच्या उपयोगाबाबत

**तक्ता क्र. - ४.२.१५**

| अ.क्र. | आपल्या गटामध्ये लहान जलस्त्रोतांचा उपयोग कशा प्रकारे करण्यात येतो ? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी | ४० | ७६.९२ |
| २ | शेतीला पाण्यासाठी | ३२ | ६१.५४ |
| ३ | पिण्याच्या पाण्यासाठी | २४ | ४६.१५ |
| ४ | जनावरांना पाणी | ३५ | ६७.३१ |
| ५ | कारखान्यांना पाणी | २ | ३.८५ |
| ६ | अद्याप उपयोग झालेला नाही | ३ | ५.७७ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यानुसार लहान जलस्त्रोतांचा उपयोग विविध कामांसाठी करण्यात आल्याचे दिसुन येते. सर्वात जास्त उपयोग मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी तर सर्वात कमी उपयोग कारखान्यांना पाणी पुविण्यासाठी केल्याचे तालुका समन्वयक यांनी नमूद केले आहे.



**लहान जलस्त्रोंतांचा मासेमारीसाठी वापर करताना ग्रामस्थ**

## ४.२.२१) पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेबाबत

**तक्ता क्र. - ४.२.१६**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणती प्रक्रिया राबविली जाते? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गौण वनउपज गोळा करणे | ३४ | ६५.३८ |
| २ | लिलाव करणे | २६ | ५०.०० |
| ३ | गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे | १४ | २६.९२ |
| ४ | गौण वनउपजा बाबत कार्यवाही करण्यात येत नाही | १० | १९.२३ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणकोणत्या प्रक्रिया राबविण्यात येतात याबाबत माहिती घेतली असता असे आढळून येते की, सर्वात जास्त ३४(६५.३८%) तालुका समन्वयकांनी गौण वनउपज गोळा करणे २६(५०%) तालुका समन्वयकांनी त्यांचा लिलाव करणे तर १४(२६.९२%) तालुका समन्वयकांनी गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे इ. प्रक्रिया राबविण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.२.२२) गौण वनउपज विक्रीच्या प्रक्रियेबाबत

**तक्ता क्र. - ४.२.१७**

| अ.क्र. | गौण वनउपज विक्रीची प्रक्रिया कोणती ? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लिलावाद्वारे | २७ | ५१.९२ |
| २ | खाजगी ठेकेदार | ८ | १५.३८ |
| ३ | बाजारामध्ये | १५ | २८.८५ |
| ४ | आदिवासी विकास महामंडळामार्फत हमीभावाद्वारे खरेदी | १ | १.९२ |
| ५ | सर्व वैयक्तिक गौण वनउपज गोळा केले जाते | ३ | ५.७७ |
| ६ | कोणतीच प्रक्रिया राबविली जात नाही | १० | १९.२३ |
| ७ | प्रतिसाद नाही | ३ | ५.७७ |
| **एकूण** | | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.-४.२.५**




उपरोक्त तक्त्यात गौण वनउपज विक्रीबाबतच्या प्रक्रियेचा आढावा घेतला असता असे दिसुन येते की, गौण वनउपजांची विक्री सर्वात जास्त लिलावाद्वारे तद्नंतर बाजारामध्ये तसेच खाजगी ठेकेदारांकडे केली जात असल्याचे तालुका समन्वयक यांनी नमूद केले आहे.

## ४.२.२३) विकास गटामधील मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती

**तक्ता क्र. - ४.२.१८**

| अ.क्र. | विकास गटामध्ये मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहेत | २७ | ५१.९२ |
| २ | मादक द्रव्यांचे सेवन होत नाही | ३ | ५.७७ |
| ३ | मादक द्रव्यांच्या दुकानावर बंदी | १६ | ३०.७७ |
| ४ | याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही | २१ | ४०.३८ |
| | **एकूण** | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

पेसा कायद्यानुसार पेसा गावातील ग्रामसभांना देण्यात आलेल्या विशेष अधिकारांपैकी मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन हा एक महत्वाचा अधिकार आहे. तालुका समन्वयक कार्यरत असलेल्या विकास गटांमध्ये मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबत असलेली सद्यस्थिती उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली आहे. वरील तक्त्यानुसार २७(५१.९२%) तालुका समन्वयकांनी ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहेत तर ३(५.७७%) तालुका समन्वयकांनी त्यांच्या विकास गटात मादक द्रव्यांचे सेवन होत नाही असे नमूद केले आहे. २१(४०.३८%) तालुका समन्वयकांनी याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे नमूद केले आहे.

## ४.२.२४) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.२.१९**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | ५२ | १०० |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | ४८ | ९२.३१ |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | ५२ | १०० |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | ४३ | ८२.६९ |
| | **एकूण** | **५२** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये सर्वात जास्त पायाभुत सुविधा तसेच आरोग्य, स्वच्छता व शिक्षण या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत.

### ४.२.२५) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.२.२०**

| अ.क्र. | आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का ? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध होऊ शकला असता | २५ | ४८.०८ |
| २ | उपलब्ध होऊ शकला नसता | १८ | ३४.६२ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ८ | १५.३८ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | १.९२ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

**आलेख क्र.-४.२.६**




पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का याबाबत तालुका समन्वयकांचे अभिप्राय घेतले असता २५(४८.०८%) तालुका समन्वयकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला असता असे अभिप्राय दिले आहेत तर १८(३४.६२%) तालुका समन्वयकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला नसता असे अभिप्राय दिले आहेत. १५.३८% तालुका समन्वयक सदर माहितीबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.२.२६) पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत

**तक्ता क्र. - ४.२.२१**

| अ.क्र. | आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे डुप्लीकेशन झाले आहे/होत आहे? असे आपणास वाटते का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ३८.४६ |
| २ | नाही | ३२ | ६१.५४ |
| | **एकूण** | **५२** | **१००** |

एकूण ५२ तालुका समन्वयकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २० (३८.४६%) तालुका समन्वयकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत आहे असे नमूद केले आहे तर ३२ (६१.५४%) तालुका समन्वयकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत नाही असे नमूद केले आहे.

### ४.२.२७) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत

**तक्ता क्र. - ४.२.२२**

| अ.क्र. | आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २७ | ५१.९२ |
| २ | नाही | २३ | ४४.२३ |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | ३.८५ |
| | **एकूण** | **५२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे २७(५१.९२%) तालुका समन्वयकांनी अभिप्राय दिले आहेत तर २३(४४.२३%) तालुका समन्वयकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

जास्तीत जास्त मूल्यमापन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आल्याचे दिसून येते.




**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून जनावारांसाठी पिण्याचे पाण्याचा हौद**

### ४.२.२८) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत

**तक्ता क्र. - ४.२.२३**

| अ.क्र. | आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का? | तालुका समन्वयक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ६७.३१ |
| २ | नाही | १५ | २८.८४ |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | ३.८५ |
| **एकूण** | | **५२** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे ३५(६७.३१%) तालुका समन्वयकांनी अभिप्राय दिले आहेत तर १५(२८.८४%) तालुका समन्वयकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

जास्तीत जास्त कामांचे सनियंत्रण गट विकास अधिकारी तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### ४.२.२९) पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील याबाबत पेसा तालुका समन्वयक यांनी खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

१ पेसा कायद्यासाठी स्वतंत्र यंत्रणा/कक्ष असावा व त्यांना पेसा कायद्याच्या अंमलबजावणी विषयी सर्व अधिकार देण्यात यावेत. तालुका व जिल्हा स्तरावर स्वतंत्र यंत्रणा असावी.

२ पेसा कायद्याची स्थानिक पातळीवर प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३ स्थानिक पातळीवर पेसा कायद्याची जनजागृती करावी.

४ ग्रामसभेत लोकांनी सुचविलेल्या कामांची अंमलबजावणी व्हावी .

५ किमान १० पेसा गावांना तांत्रिक मार्गदर्शनासाठी स्वतंत्र अभियंत्यांची नियुक्ती असावी.

६ एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात पेसा ५ % अबंध निधी मिळावा.

७ ग्रामपंचायतीचे दर तीन महिन्यातून एकदा दफ्तर तपासणी करण्यासाठी कायम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

८ पेसा समन्वयकांमार्फत ५% अबंध निधीचे सनियंत्रण करण्यात यावे.

९ शासन निर्णय व परिपत्रके यांमध्ये सुधारणा कराव्यात.

१० पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभांचे सक्षमीकरण झाले पाहिजे.

११ पेसा ५% अबंध निधी खर्च करतांना PFMS या पद्धतीचा अवलंब करावा.

१२ स्थानिक पातळीवर गावातील ग्रामस्थांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण/कार्यशाळा घेण्यात याव्यात.

१३ पेसा कायद्याअंतर्गत प्राप्त होणारा ५ % अबंध निधीबाबत गावात कार्यशाळा किंवा माहिती फलक लावावे. प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

१४ पेसा ५ % अबंध निधी आर्थिक वर्षाच्या सुरुवातील उपलब्ध व्हावा.

१५ स्वतंत्र संगणक प्रणाली निर्माण करावी.

१६ पेसा ५ % अबंध निधीचे दरवर्षी लेखा परीक्षण करण्यात यावे.

१७ पेसा ५ % अबंध निधीसाठी स्वतंत्र संगणक परिचालक यांची नियुक्ती करावी.

१८ जिल्हयातील किंवा जिल्ह्याबाहेरील आदर्श पेसा गावांना भेटी देण्यात याव्यात.

१९ सर्व स्तरावर पेसा कायद्याविषयी पुरेपूर प्रशिक्षण मिळावे.

२० पेसा ५% अबंध निधीची पंधराव्या वित्त आयोगाप्रमाणे पूर्ण प्रक्रिया ऑनलाईन व्हावी.

२१ गावस्तरावरील सर्व समित्या स्थापन करून त्यांची भूमिका व कार्य निश्चित करण्यात यावे.

२२ पेसा ५ % अबंध निधीतून करण्यात आलेल्या कामांचे संनियंत्रण, निरीक्षण व मूल्यमापन करण्यात यावे.

२३ पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे.

### **४.२.३०) तालुक्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी** -

पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना तालुका समन्वयक यांना विविध अडचणी येत असल्याचे नमूद केले आहे. पेसा समन्वयकांना येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

१. पेसा कायदा १९९६ मधील तरतुदी व इतर शासन निर्णयांत / परिपत्रकात स्पष्टता नसल्याने बऱ्याच अडचणी निर्माण होत आहेत.
२. तालुका समन्वयकांना कार्यालयीन कामकाज जास्त असल्याने पेसा कायदा अंमलबजावणीसाठी जास्त वेळ देता येत नाही.
३. तालुका समन्वयक यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात.
४. क्षेत्र स्तरावर भेटी देण्यासाठी वाहतुकीचे साधन नाही.
५. गाव स्तरावर पेसा विषयक प्रशिक्षण/कार्यशाळेस लोकांचा सहभाग कमी असतो.
६. ग्रामस्थांचे ग्रामसभेमध्ये उपस्थितीचे प्रमाण कमी असते.
७. इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांची पेसा कायद्याविषयक उदासिनता दिसून येते.
८. आदिवासी आणि बिगर आदिवासींमध्ये गैरसमज निर्माण झाल्यामुळे अडचणी येतात.
९. तालुका स्तरावर मनुष्यबळाची कमतरता आहे.
१०. पेसा समन्वयक यांना तालुका स्तरावर बैठक व्यवस्था, संगणक, स्टेशनरी व वार्षिक साधील खर्च इ. उपलब्ध नाही.
११. गावातील लोकांच्या मनामध्ये फक्त पेसाचा निधी आपणास मिळतो असा समज झाल्यामुळे कायदा समजावुन सांगण्यास अडचणी येतात.
१२. गाव स्तरावर लोकांना पेसा कायद्याविषयी माहिती नाही.
१३. वाडी - वस्ती पर्यंत पेसा कायदा अंमलबजावणीसाठी निधी कमी पडतो.
१४. तालुका समन्वयक यांचे मानधन कमी असल्याने आर्थिक अडचणी निर्माण होतात.
१५. राजकीय हस्तक्षेप होत असल्यामुळे अडचणी येतात.
१६. वरीष्ठ पातळीवरुन पेसा कायद्याविषयी योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात.

### **४.२.३१) पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना तालुका पेसा समन्वयक यांना येणाऱ्या अडचणी** -

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुका पेसा समन्वयक यांची नेमणुक करण्यात आली आहे. तालुका समन्वयक यांना सदर कायद्याची अंमलबजावणी करताना त्यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या अडचणी खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

१ तालुका स्तरावर एकच कर्मचारी असल्याने कार्यालयीन कामकाज जास्त आहे त्यामुळे क्षेत्र स्तरावर भेट देणे शक्य होत नाही.
२ स्थानिक पातळीवर वाहतुकीस अडचण, गावांना भेटी देण्यासाठी प्रवास भत्ता नाही.

३ तालुका समन्वयक यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने निश्चित केल्या नसल्या कारणाने कामकाज करताना अनेक अडचणी येतात.

४ तालुका स्तरावर इतर विभाग प्रमुखांकडून सहकार्य मिळत नाही.

५ तालुकास्तरावर निधी उपलब्ध नसल्याने मोबीलायझर यांच्या बैठका घेता येत नाहीत.

६ ग्रामपंचायतींना भेटी देताना तेथील सरपंच अथवा ग्रामस्थ एकत्र येत नाहीत.

७ कार्यालयीन साधन सामग्री नाही (लॅपटॉप, प्रिंटर, इतर साहित्य)

८ ग्रामसेवक त्यांच्याकडून वेळेवर माहिती मिळण्यास अडचणी येतात.

९ पेसा व्यतिरीक्त अतिरीक्त व इतर विभागाचे कामकाज करावे लागते.

१० आदिवासी समुदायात काम करताना लोकसहभाग वाढविताना अडचणी निर्माण होतात.

११ ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देताना ग्रामस्थ प्रतिसाद देत नाहीत.

१२ वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचे वेळेत सहकार्य मिळत नाही.

१३ ग्रामपंचायतीची संख्या अधिक आहे म्हणून सहाय्यक तालुका समन्वयक पद निर्माण केले पाहिजे.

१४ काही गाव स्तरावरील समुदाय व राजकीय व्यक्तींमुळे पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यास अडचणी येतात.

१५ त्रयस्थ संस्था/ यंत्रणा यांचा हस्तक्षेप होत असल्याने अडचणी येतात.

१६ स्थानिक लोकांचे सहकार्य मिळत नाही.

१७ ५ % पेसा निधी व पेसा नियमाप्रमाणे कामे होत नसल्याने पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करता येत नाही.

१८ तालुका पेसा समन्वयक यांचे मानधन खूप कमी आहे.

१९ तालुका पेसा समन्वयक म्हणून काम करताना ग्रामविकास विभाग तसेच महसूल विभाग यांनी दिलेल्या इतर जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागत असल्याने पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावयाचे असल्यास तालुका स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करून मनुष्यबळ उपलब्ध करून देणे गरजेचे वाटते.

## ४.३ सरपंचांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

पेसा कायद्याअंतर्गत पेसा गावांमधील ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये पहिली ग्रामसभा हि संरपंचाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येते. पेसा कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये संरपंचांची महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे सदर मुल्यमापनासाठी संरपंचांकडून माहिती संकलित करण्यात आली आहे.

पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापन अंतर्गत एकूण २९३ ग्रामपंचायतींच्या सरपंचांकडून माहिती संकलित केली आहे. पेसा कायद्याबाबत ग्रामस्थांमध्ये असलेली जागरुकता, पेसा कायद्याचे मिळालेले प्रशिक्षण, सदर कायद्याबाबत प्रचार-प्रसार, ५% अबंध निधीबाबत माहिती, अबंध निधीअंतर्गत गावात राबविण्यात आलेले उपक्रम, पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता उपयोजना इ. विविध मुद्दयांवर माहिती संकलित केली आहे. एकूण २९३ सरपंचांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

### ४.३.१) सरपंचांना पेसा कायदा - १९९६ ची माहिती मिळाल्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. -४.३.१**

| अ.क्र. | माहितीचा स्त्रोत | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कायदा वाचून | १२५ | ४२.६६ |
| २ | प्रशिक्षणाद्वारे | १८६ | ६३.४८ |
| ३ | स्वयंसेवी संस्था | ५ | १.७१ |
| ४ | शासनाचे अधिकारी | ४६ | १५.७० |
| ५ | प्रसिद्धी माध्यमांद्वारे | ३३ | ११.२६ |
| ६ | अद्याप माहिती नाही | ४१ | १३.९९ |
| ७ | काही प्रमाणात माहिती आहे | २ | ०.६८ |
| ८ | इतर (नमूद करावे) | ३ | १.०२ |
| ९ | प्रतिसाद नाही | १ | ०.३४ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत )**

उपरोक्त तक्त्यानुसार पेसा कायदा - १९९६ ची माहिती सरपंचांना विविध स्त्रोतांव्दारे मिळाल्याचे दिसून येते. सर्वात जास्त माहिती प्रशिक्षणाव्दारे मिळाल्याचे १८६(६३.४८%) सरपंचांनी नमूद केले आहे. १२५(४२.६६ %) सरपंचांनी कायदा वाचुन, ४६(१५.७०%) सरपंचांनी शासनाचे अधिकारी तर ३३(११.२६ %) सरपंचांनी प्रसिध्दी माध्यमांव्दारे पेसा कायदा १९९६ बाबत माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. ४१(१३.९९%) सरपंचांनी सदर कायद्याची त्यांना अद्याप माहिती नाही तसेच २(०.६८%) सरपंचांना काही प्रमाणात माहिती असल्याचे नमूद केले आहे.

पेसा कायदा — १९९६ ची माहिती सरपंचांना होणेसाठी शासनामार्फत अधिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### ४.३.२ ) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.२**

| अ.क्र. | ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७७ | ६०.४१ |
| २ | नाही | ५४ | १८.४३ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ५८ | १९.८० |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.३६ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

**आलेख क्र. - ४.३.१**




वरील तक्त्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणीबाबत एकूण २९३ सरपंचांकडून माहिती घेतली आहे. माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, एकुण २९३ सरपंचांपैकी १७७ (६०.४१%) सरपंचांनी ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाले असल्याचे सांगितले आहे तर ५४ (१८.४३%) सरपंचांनी ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाले नसल्याचे सांगितले आहे. ५८(१९.८०%) सरपंच याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते तर ४(१.३६ %) सरपंचांनी याबाबत प्रतिसाद नोंदविलेला नाही.

सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती देणे आवश्यक आहे तथापि अद्यापही सर्व ग्रामसभांमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाल्याचे दिसून येत नाही.

### ४.३.३ ) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३**

| अ.क्र. | जिल्हा | ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का? | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | माहिती नाही | माहितीबाबत अनभिज्ञ | एकूण |
| १ | अहमदनगर | ६ | १ | ० | १ | ८ |
| २ | पुणे | ९ | ० | ० | ० | ९ |
| ३ | ठाणे | ६ | २ | १२ | १ | २१ |
| ४ | पालघर | ३९ | १ | १ | १ | ४२ |
| ५ | नाशिक | ३९ | ३ | १३ | १ | ५६ |
| ६ | जळगाव | २ | ० | १ | ० | ३ |
| ७ | धुळे | ८ | ६ | १ | ० | १५ |
| ८ | नंदुरबार | २४ | १६ | १२ | ० | ५२ |
| ९ | अमरावती | ० | ८ | ३ | ० | ११ |
| १० | यवतमाळ | ७ | ५ | ५ | ० | १७ |
| ११ | नांदेड | ९ | ३ | ० | ० | १२ |
| १२ | चंद्रपूर | ५ | २ | २ | ० | ९ |
| १३ | गडचिरोली | २३ | ७ | ८ | ० | ३८ |
| **एकूण** | | **१७७** | **५४** | **५८** | **४** | **२९३** |

उपरोक्त तक्त्यात ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत जिल्हानिहाय तपशिल देण्यात आला आहे. सरपंचांनी नमूद केल्यानुसार पुणे, पालघर, अहमदनगर, नाशिक व जळगाव या जिल्ह्यांमधील ग्रामसभांमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाल्याचे प्रमाण जास्त आढळून येते तर अमरावती जिल्ह्यामधील ग्रामसभांमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाले नसल्याचे प्रमाण जास्त आढळून येते.

### ४.३.४) ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती देण्याचे माध्यम

**तक्ता क्र. - ४.३.४**

| अ.क्र. | माध्यम | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ५४ | १८.४३ |
| २ | ग्रामसेवक | १७७ | ६०.४१ |
| ३ | पेसा समन्वयक | ८१ | २७.६५ |
| ४ | जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी | ५४ | १८.४३ |
| ५ | स्वयंसेवी संस्था | ९ | ३.०७ |
| ६ | माहिती अद्याप पर्यंत दिली नाही | ४१ | १३.९९ |
| ७ | अन्य (नमूद करावे) | ९ | ३.०७ |
| ८ | माहितीबाबत अनभिज्ञ | ९ | ३.०७ |
| ९ | सांगता येत नाही | ५ | १.७१ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत )**

उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली याबाबतचा तपशिल देण्यात आला आहे.  जास्तीत जास्त माहिती ग्रामसेवकांच्या माध्यमातुन दिली गेल्याचे १७७ (६०.४१%) सरपंचांनी नमूद केले आहे. त्याखालोखाल ८१ (२७.६५%) सरपंचांनी पेसा समन्वयक यांचे माध्यमातुन, ५४(१८.४३%)  सरपंचांनी जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी तसेच स्वत: त्यांचेमार्फत ग्रामसभेत माहिती दिल्याचे नमूद केले आहे. ४१ (१३.९९%) सरपंचांनी पेसा कायद्याबाबत ग्रासभेला अद्यापही माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

## ४.३.५) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.५**

| अ.क्र. | आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९४ | ६६.२१ |
| २ | नाही | ९५ | ३२.४२ |
| ३ | प्रतिसाद नाही | ४ | १.३७ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १९४ (६६.२१%) सरपंचांनी त्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाल्याचे नमूद केले आहे तर ९५ (३२.४२%) सरपंचांनी त्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाले नसल्याचे नमूद केले आहे.

## ४.३.६ ) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाबाबत सरपंचांचा जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.६**

| अ.क्र. | जिल्हा | आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अहमदनगर | ४ | ४ | ० | ८ |
| २ | पुणे | ८ | १ | ० | ९ |
| ३ | ठाणे | ११ | १० | ० | २१ |
| ४ | पालघर | ३६ | ५ | १ | ४२ |
| ५ | नाशिक | ३३ | २१ | २ | ५६ |
| ६ | जळगाव | १ | २ | ० | ३ |
| ७ | धुळे | ८ | ७ | ० | १५ |
| ८ | नंदुरबार | ४८ | ३ | १ | ५२ |
| ९ | अमरावती | ० | ११ | ० | ११ |
| १० | यवतमाळ | ५ | १२ | ० | १७ |
| ११ | नांदेड | ६ | ६ | ० | १२ |
| १२ | चंद्रपूर | ६ | ३ | ० | ९ |
| १३ | गडचिरोली | २८ | १० | ० | ३८ |
| **एकूण** | | **१९४** | **९५** | **४** | **२९३** |

आलेख क्र.- ४.३.२




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी ९५ सरपंचांनी त्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाले नसल्याचे नमूद केले आहे. सर्वात जास्त अमरावती जिल्ह्यामधील १००% सरपंचांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळालेले नाही. त्याखालोखाल यवतमाळ व जळगाव जिल्ह्यामधील सरपंचांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाले नसल्याचे दिसून येते. तर नंदूरबार, पुणे व पालघर जिल्हयांतील जास्तीत जास्त सरपंचांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून येते.

### ४.३.७ ) पेसा कायद्याचे प्रशिक्षणाचा स्त्रोत

**तक्ता क्र. - ४.३.७**

| अ.क्र. | स्त्रोत | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | ७६ | ३९.१८ |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिती | १४७ | ७५.७७ |
| ३ | पंचायत राज प्रशिक्षण केंद्र | २८ | १४.४३ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | ३ | १.५५ |
| ५ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | २ | १.०३ |
| ६ | इतर | १ | ०.५२ |
| ७ | प्रतिसाद नाही | २ | १.०३ |
| **एकूण** | | **१९४** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत )**

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १९४ सरपंचांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाल्याचे नमूद केले आहे. ज्या १९४ सरपंचांना प्रशिक्षण मिळाले आहे त्यांना सदर प्रशिक्षण हे कोणामार्फत मिळाले याबाबतचा तपशिल उपरोक्त तक्त्यात नमूद केला आहे.

उपरोक्त तक्त्यानुसार जास्तीत जास्त १४७ (७५.७७%) सरपंचांना जिल्हा परिषद/पंचायत समिती यांचेमार्फत प्रशिक्षण मिळाल्याचे दिसुन येते. त्याखालोखाल ७६ (३९.१८%) सरपंचांना यशदा, पुणेमार्फत तर २८ (१४.४३%) सरपंचांना पंचायत राज प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून येते.

### ४.३.८) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धी बाबत

**तक्ता क्र. - ४.३.८**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेला आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०२ | ६८.९४ |
| २ | नाही | ४० | १३.६५ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ५० | १७.०७ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ०.३४ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यातील सरपंचांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २०२(६८.९४%) सरपंचांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये  पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली आहे असे नमूद केले आहे तर ४०(१३.६५%) सरपंचांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये  पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. ५०(१७.०७%) सरपंचांनी याबाबत माहिती नाही असे मत नोंदविलेले आहे.

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी होणे आवश्यक आहे तथापि १३.६५ %  ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नाही हि महत्वाची त्रुटी दिसून येते.



**मासेमारीसाठी लहान जलस्त्रोतांचा वापर करताना ग्रामस्थ**

### ४.३.९ ) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.९**

| अ.क्र. | जिल्हा | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली आहे का? | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | माहितीबाबत अनभिज्ञ | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अहमदनगर | ७ | ० | १ | ० | ८ |
| २ | पुणे | ८ | ० | १ | ० | ९ |
| ३ | ठाणे | १० | २ | ९ | ० | २१ |
| ४ | पालघर | ३८ | ० | ३ | १ | ४२ |
| ५ | नाशिक | ४१ | २ | १३ | ० | ५६ |
| ६ | जळगाव | ३ | ० | ० | ० | ३ |
| ७ | धुळे | ६ | ७ | २ | ० | १५ |
| ८ | नंदुरबार | ३७ | ९ | ६ | ० | ५२ |
| ९ | अमरावती | २ | ९ | ० | ० | ११ |
| १० | यवतमाळ | १२ | १ | ४ | ० | १७ |
| ११ | नांदेड | ८ | ३ | १ | ० | १२ |
| १२ | चंद्रपूर | ४ | २ | ३ | ० | ९ |
| १३ | गडचिरोली | २६ | ५ | ७ | ० | ३८ |
| **एकूण** | | **२०२** | **४०** | **५०** | **१** | **२९३** |

वरील तक्त्यात नमूद २९३ सरपंचांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, जळगाव, पालघर, पुणे, अहमदनगर जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आल्याचे प्रमाण जास्त असल्याचे सरपंचांनी नमूद केलेले आहे तर अमरावती, धुळे जिल्हयांतील ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दीचे प्रमाण कमी असल्याचे सरपंचांनी नमूद केले आहे.

### ४.३.१० ) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम

**तक्ता क्र. - ४.३.१०**

| अ.क्र. | माध्यम | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासन | ५२ | २५.७४ |
| २ | स्वयंसेवी संस्था | १० | ४.९५ |
| ३ | सामाजिक कार्यकर्ते | २ | ०.९९ |
| ४ | शैक्षणिक संस्था | १ | ०.५० |
| ५ | ग्रामपंचायत | १७६ | ८७.१३ |
| ६ | इतर | ३ | १.४९ |
| ७ | प्रतिसाद नाही | २ | ०.९९ |
| **एकूण** | | **२०२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी २०२ सरपंचांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली आहे असे नमूद केले आहे. या २०२ सरपंचांकडून सदर प्रचार व प्रसिध्दी कोणामार्फत केली याबाबत माहिती घेतली असता १७६(८७.१३%) सरपंचांनी ग्रामपंचायतीमार्फत, ५२(२५.७४%) सरपंचांनी शासनामार्फत, १०(४.९५%) सरपंचांनी स्वयंसेवी संस्थांमार्फत तर सर्वात कमी १(०.५०%) सरपंचांनी शैक्षणिक संस्थांमार्फत पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.११ ) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने

**तक्ता क्र. - ४.३.११**

| अ.क्र. | माध्यम/साधन | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चित्ररथ | १५ | ७.४३ |
| २ | माहिती फलक | १४७ | ७२.७७ |
| ३ | गावपातळीवर कार्यशाळा | ५६ | २७.७२ |
| ४ | ग्रामसभेमध्ये माहिती | १०९ | ५३.९६ |
| ५ | प्रचार फेरी | २६ | १२.८७ |
| ६ | कलापथक/पथनाट्य | ३२ | १५.८४ |
| ७ | व्हिडिओ फिल्म सादरीकरण | ९ | ४.४६ |
| ८ | पेसा दिनदर्शिका | ६४ | ३१.६८ |
| ९ | लाउड स्पीकर | १४ | ६.९३ |
| १० | दवंडी | १ | ०.५० |
| ११ | प्रतिसाद नाही | १ | ०.५० |
| **एकूण** | | **२०२** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत )**

**आलेख क्र.- ४.३.३**



उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी कोणकोणते उपक्रम/साधने वापरली आहेत याचा तपशिल दिला आहे. वरील माहितीच्या विश्लेषणानुसार १४७(७२.७७%) सरपंचांनी सदर कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती फलक हा उपक्रम राबवला असे सांगितले. १०९(५३.९६%) सरपंचांनी सदर कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी ग्रामसभेमध्ये माहिती दिल्याचे सांगितले. ६४(३१.६८%) सरपंचांनी पेसा कॅलेंडर, ५६(२७.७२%) सरपंचांनी गावपातळीवर कार्यशाळा, ३२(१५.८४%) सरपंचांनी कलापथक/पथनाट्य, २६(१२.८७%) सरपंचांनी प्रचार फेरी, १५(७.४३%) सरपंचांनी चित्ररथ इत्यादी उपक्रम पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.१२ ) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.३.१२**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १३९ | ४७.४४ |
| २ | नाही | १०७ | ३६.५२ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ४३ | १४.६८ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.३६ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

**आलेख क्र.-४.३.४**




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार असे आढळून येते की, माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १३९ (४७.४४% ) सरपंचांनी त्यांना पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाले असे नमूद केले आहे तर १०७ (३६.५२%) सरपंचांनी त्यांना पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाले नाही असे नमूद केले आहे. ४३ (१४.६८%) सरपंच प्रचार व प्रसिध्दीसाठी साहित्य मिळाले किंवा कसे याबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.३.१३ ) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून उपलब्ध साहित्याचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.१३**

| अ.क्र. | उपलब्ध साहित्य | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | माहिती फलक | ७६ | ५४.६८ |
| २ | माहिती पत्रिका | ५९ | ४२.४५ |
| ३ | पुस्तके व माहिती पुस्तिका | ६२ | ४४.६० |
| ४ | दिनदर्शिका | ७० | ५०.३६ |
| ५ | विविध तक्ते | १४ | १०.०७ |
| ६ | व्हिडिओ फिल्म | ३ | २.१६ |
| ७ | आदिवासी क्रांतीवीर यांचे फोटो | १ | ०.७२ |
| ८ | प्रतिसाद नाही | ५ | ३.५९ |
| **एकूण** | | **१३९** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत )**

उपरोक्त तक्त्यात पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे कोणकोणते साहित्य उपलब्ध झाले याबाबत तपशिल नोंदविलेला आहे. साहित्य उपलब्ध झाले असे नमूद केलेल्या १३९ सरपंचांपैकी, ७६ (५४.६८%) सरपंचांनी माहिती फलक, ७० (५०.३६%) सरपंचांनी दिनदर्शिका, ६२ (४४.६०%) सरपंचांनी पुस्तके व माहिती पुस्तिका तर ५९ (४२.४५%) सरपंचांनी माहिती पत्रिका शासनाकडून उपलब्ध झाल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.१४) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.१४**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७७ | ६०.४१ |
| २ | नाही | ८० | २७.३० |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३२ | १०.९२ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.३७ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १७७ (६०.४१%) सरपंचांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतुद केली असल्याचे सांगितले आहे. तर ८०(२७.३०%) सरपंचांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतुद केली नसल्याचे सांगितले आहे.

### ४.३.१५) पेसा कायद्याची प्रचार व प्रसिद्धीसाठी  राबविलेल्या उपक्रमांचा  तपशिल

पेसा कायद्याची प्रचार व प्रसिद्धीसाठी  खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आल्याचे सरपंचांनी नमूद केले आहे.

- ग्रामसभेद्वारे माहिती देणे.
- गावस्तरावर कार्यशाळेचे आयोजन करणे.
- गावातील भिंती म्हणींद्वारे  बोलक्या करणे, भिंतीवर स्लोगन लिहिणे.
- भिंतीवर पेसा कायद्याची माहिती लिहिणे.
- बचत गट, युवक इत्यादिंना प्रशिक्षण देणे.
- ग्रामसभेत तसेच गृहभेटींव्दारे पेसा मोबिलिझर यांचेमार्फत प्रचार- प्रसिद्धी करणे.
- गाव वाड्या-वस्त्यांवर पेसा संदेश फलक लावणे.
- कलापथक, पथनाट्य यांचेमार्फत प्रसिद्धी करणे.
- कॅलेंडर, माहिती पुस्तिका इत्यादीमार्फत प्रचार प्रसार करणे.
- गाव,पाडा, वस्ती मध्ये प्रचार व प्रसिद्धी करणे.
- प्रचार फेरी काढणे.
- गावात दवंडी देणे.

### ४.३.१६ ) सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.१५**

| अ.क्र. | सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठका होतात का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२५ | ४२.६६ |
| २ | नाही | १५८ | ५३.९२ |
| ३ | प्रतिसाद नाही | १० | ३.४२ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की,  १२५ (४२.६६%) सरपंचांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होतात असे नमूद केले आहे तर १५८(५३.९२%) सरपंचांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होत नाहीत असे नमूद केले आहे. १०(३.४२%) सरपंचांनी याबाबत काहिही प्रतिसाद दिलेला नाही.

### ४.३.१७ ) सर्व समित्यांच्या कामकाजातील सरपंचांच्या सहभागाबाबत

**तक्ता क्र. - ४.३.१६**

| अ.क्र. | सर्व समित्यांच्या कामकाजात आपण सहभागी होतात का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १६७ | ५७.०० |
| २ | नाही | १२० | ४०.९५ |
| ३ | प्रतिसाद नाही | ६ | २.०५ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १६७ (५७%) सरपंचांनी सर्व समित्यांच्या कामकाजात ते सहभागी होत असल्याचे सांगितले तर १२०(४०.९५%) सरपंचांनी सर्व समित्यांच्या कामकाजात ते सहभागी होत नसल्याचे सांगितले आहे.

### ४.३.१८ ) समितीचे अभिलेखे व दस्तऐवजांच्या तपासणीबाबत तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.१७**

| अ.क्र. | समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०३ | ६९.२८ |
| २ | नाही | ८४ | २८.६७ |
| ३ | प्रतिसाद नाही | ६ | २.०५ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी २०३ (६९.२८%) सरपंचांनी समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते असा अभिप्राय नोंदविलेला आहे तर ८४ (२८.६७%) सरपंचांनी समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जात नाही असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

### ४.३.१९ ) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरच्या निवडीबाबत

**तक्ता क्र. - ४.३.१८**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आलेली आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २६६ | ९०.७९ |
| २ | नाही | २५ | ८.५३ |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त  तक्त्यानुसार असे आढळून येते की २६६ (९०.७९%) सरपंचांनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आली आहे तर २५ (८.५३%) सरपंचांनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आली नाही असा प्रतिसाद नोंदविलेला आहे.

### ४.३.२०) पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होणाऱ्या उपयोगाचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.१९**

| अ.क्र. | पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी उपयोग होत आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २१६ | ८१.२० |
| २ | नाही | १७ | ६.३९ |
| ३ | तटस्थ | २९ | १०.९० |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.५१ |
| **एकूण** | | **२६६** | **१००** |

एकूण २६६ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आली आहे. पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा उपयोग होत आहे असे २१६ (८१.२०%) सरपंचांनी नमूद केले आहे तर पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा उपयोग होत नाही असे १७ (६.३९%) सरपंचांनी नमूद केले आहे. २९(१०.९०%) सरपंचांनी याबाबत तटस्थ भूमिका नोंदविलेली आहे.

### ४.३.२१) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२०**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे सहकार्य मिळते का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०४ | ३५.५० |
| २ | नाही | ७३ | २४.९१ |
| ३ | काही प्रमाणात | ११४ | ३८.९१ |
| ४ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणीसाठी सरपंचांना इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना इ.) सहकार्य मिळते का याबाबत माहिती घेण्यात आली आहे. २९३ सरपंचांपैकी १०४(३५.५०%) सरपंचांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत असल्याचे तर ७३(२४.९१%)

सरपंचांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत नसल्याचे मत नोंदविलेले आहे. ११४(३८.९१%) सरपंचांनी काही प्रमाणात या यंत्रणांचे सहकार्य मिळते असे मत नोंदविलेले आहे.

### ४.३.२२) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२१**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५३ | ५२.२२ |
| २ | नाही | ८५ | २९.०१ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ५३ | १८.०९ |
| ४ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी १५३(५२.२२%) सरपंचांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे असा प्रतिसाद दिला आहे तर ८५(२९.०१%) सरपंचांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही असा प्रतिसाद दिला आहे.

### ४.३.२३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२२**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७ | ३६.५२ |
| २ | नाही | ८४ | २८.६७ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ९८ | ३३.४५ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.३६ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार, १०७(३६.५२%) सरपंचांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे तर ८४(२८.६७%) सरपंचांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. ९८(३३.४५%) सरपंच याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.३.२४) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२३**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये तफावत असल्याचे आपणास आढळून आले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५५ | १८.७७ |
| २ | नाही | २२४ | ७६.४५ |
| ३ | प्रतिसाद नाही | १४ | ४.७८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

मूल्यमापनाअंतर्गत संकलित केलेल्या एकूण २९३ सरपंचांच्या माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसुन येते की, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये तफावत असल्याचे ५५(१८.७७%) सरपंचांनी नमूद केले आहे तर २२४(७६.४५%) सरपंचांनी विविध शासन निर्णयामध्ये तफावत नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.२५) शासन निर्णयामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत

१. ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ - पेसा कायदा मध्ये ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ २ वर्ष आहे तर आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रकात ५ वर्ष आहे.
२. तेंदूपत्ता संकलन व व्यवस्थापन - तेंदूपत्ता संकलन व व्यवस्थापन पेसा क्षेत्रात पेसा कायदा अंतर्गत आहे तर दुसरीकडे वनहक्क कायदा अंतर्गतही आहे त्यामुळे दोन्ही कायद्यांतर्गत कसे व्यवस्थापन करावे याबाबत संभ्रम आहे.
३. गौण खनिजांबाबत पेसा कायद्याने आदेश दिले आहेत परंतु महसूल यंत्रणांचे तसे आदेश नाहीत.

### ४.३.२६) ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२४**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११६ | ३९.५९ |
| २ | नाही | १६ | ५.४६ |
| ३ | काही प्रमाणात | १२५ | ४२.६६ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३० | १०.२४ |
| ५ | प्रतिसाद नाही | ६ | २.०५ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

**आलेख क्र.- ४.३.५**




पेसा कायद्यानुसार पेसा गावातील ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त तक्त्यानुसार या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जातो असे ११६(३९.५९%) सरपंचांनी नमूद केले आहे तर १६(५.४६%) सरपंचांनी या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जात नाही असे नमूद केले आहे. ३०(१०.२४%) सरपंच सदर माहितीबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.३.२७) पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांनी पूर्णपणे वापर केलेल्या विशेष अधिकारांचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.२५**

| अ.क्र. | विशेष अधिकार | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | ४६ | ३९.६६ |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ५६ | ४८.२८ |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | ४० | ३४.४८ |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | ३३ | २८.४५ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन | ५० | ४३.१० |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | ४७ | ४०.५२ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | २४ | २०.६९ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | २१ | १८.१० |
| ९ | सावकारी करण्यावर नियंत्रण | ३० | २५.८६ |
| १० | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | १९ | १६.३८ |
| ११ | प्रतिसाद नाही | ४ | ३.४५ |
| **एकूण** | | **११६** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

**आलेख क्र.-४.३.६**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात असल्यास कोणते अधिकार पूर्णपणे वापरण्यात येतात याबाबत माहिती दिलेली आहे. उपरोक्त माहितीच्या विश्लेषणानुसार सर्वात जास्त ५६(४८.२८%) सरपंचांनी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन या विशेष अधिकाराचा वापर केल्याचे नमूद केले आहे. ५०(४३.१०%) सरपंचांनी मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन या विशेष अधिकाराचा वापर केल्याचे नमूद केले आहे. सर्वात कमी वापर केलेला विशेष अधिकार, संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण हा असल्याचे दिसून येते.



**ग्रामस्थांकडून माहिती घेताना अन्वेषक**

### ४.३.२८) पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पूर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी आवश्यक उपाययोजना

**तक्ता क्र. - ४.३.२६**

| अ.क्र. | पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पुर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी कोणत्या उपाय योजना करणे आपणास आवश्यक वाटतात? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कायद्यात सुधारणा | ५३ | १८.०९ |
| २ | नियमात सुधारणा | ५६ | १९.११ |
| ३ | शासन निर्णयात सुधारणा | ९८ | ३३.४५ |
| ४ | आवश्यकता वाटत नाही | १४३ | ४८.८१ |
| ५ | प्रतिसाद नाही | १५ | ५.१२ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पुर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना करणे आवश्यक वाटतात याबाबतचे सरपंचांचे अभिप्राय दिले आहेत. उपरोक्तनुसार ९८(३३.४५%) सरपंचांनी यासाठी शासन निर्णयात सुधारणा होणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिले आहेत. कायद्यात तसेच नियमांत सुधारणा आवश्यक आहेत असे अनुक्रमे १८.०९ % व १९.११% सरपंचांनी अभिप्राय दिले आहेत. जास्तीत जास्त १४३ (४८.८१%) सरपंचांनी याबाबत कोणत्याही उपाययोजना करण्याची आवश्यकता नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.३.२९ ) पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२७**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गावनिहाय करण्यात आला आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २३५ | ८०.२० |
| २ | नाही | ३० | १०.२४ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | १५ | ५.१२ |
| ५ | प्रतिसाद नाही | १३ | ४.४४ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

एकूण २९३ सरपंचांनी दिलेल्या माहितीचे  विश्लेषण केले असता असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गावनिहाय करण्यात आला आहे असे २३५ (८०.२०%) सरपंचांनी नमूद केले आहे तर ३० (१०.२४%) सरपंचांनी पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गावनिहाय करण्यात आलेला नाही असे नमूद केले आहे.

### ४.३.३० ) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.२८**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | २७१ | ९२.४९ |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | २०३ | ६९.२८ |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | २७१ | ९२.४९ |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | १७० | ५८.०२ |
| ५ | प्रतिसाद नाही | ८ | २.७३ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

उपरोक्त तक्त्यात पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत याबाबत माहिती दिलेली आहे. जास्तीत जास्त २७१ (९२.४९%) संरपंचांनी अनुक्रमे पायाभुत सुविधा आणि आरोग्य, स्वच्छता व शिक्षण हि कामे घेतल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.३१ ) पेसा ५% अबंध निधीमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा तपशिल -

पेसा ५% अबंध निधीमधुन गावांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आल्याचे सरपंचांनी नमूद केलेले आहे.

**१. शैक्षणिक उपक्रम** - जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी केंद्र डिजिटल करण्यात आले. अंगणवाडी करीता साहित्य खरेदी (फर्निचर- बेंच, कपाट, ग्रँथालय साहित्य, साउंड सिस्टीम, गणवेश, खेळणी इ.), संगणक खरेदी, शाळा, अंगणवाडी दुरूस्ती, शाळा रंगरंगोटी, शाळेभोवती संरक्षण भिंत बांधणे.

**२. पाणीपुरवठा** - पाणीपुरवठा देखभाल-दुरुस्ती, पाईपलाईन दुरूस्ती, पाण्याची टाकी बांधणे, जलशुध्दीकरण प्रकल्प, तलाव व विहिर खोलीकरण, सार्वजनिक विहीर बांधकाम, ग्रामपंचायत, अंगणवाडी, सार्वजनिक मंदिर येथे RO संच बसविणे.

**३. आरोग्य** - औषधे वाटप, कोरोना प्रतिबंधासाठी साहित्य खरेदी करणे, अमृत आहार स्वयंपाकी महिला यांना मानधन देणे.

**४. रस्ते/ गटारे** - रस्ता काँक्रीटीकरण, गटारे सफाई करणे, नाली बांधकाम करणे.

**५. विद्युतीकरण** - सौरपथ दिवे बसविणे, सौर उर्जेवर आधारित जिल्हा परिषद शाळेचे विद्युतीकरण करणे.

**६. वृक्षारोपण** - वृक्षारोपण करणे, जैववैविधता उद्यान तयार करणे.

**७. सार्वजनिक स्वच्छता** - घंटागाडी, कचराकुंडी खरेदी, शौचालय बांधकाम करणे.

**८. प्रशिक्षण** - कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे.

**९. पेसा कायदा प्रचार व प्रसिद्धी** - विविध माध्यमांव्दारे पेसा कायद्याचा प्रचार- प्रसार करणे.

**१०.इतर उपक्रम** — अ.स्मशानभूमी बांधकाम
आ.गावात चौरस्त्यावर बसण्याकरीता सिमेंट बेंच खरेदी करणे.
इ.आदीवासी वाद्य खरेदी, भजनी साहित्य खरेदी.
ई.ग्रामसभेकरीता साहित्य खरेदी करणे.
उ.पेव्हर ब्लॉक बांधणे.
ऊ. समाज मंदिर दुरुस्ती

**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत -**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का याबाबत सरपंचांचे अभिप्राय घेतले असता ४६.७६% सरपंचांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला असता असे अभिप्राय दिले आहेत तर २०.४८% सरपंचांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला नसता असे अभिप्राय दिले आहेत. ३०.०३ % सरपंच सदर माहितीबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.३.३२) पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत

**तक्ता क्र. - ४.३.२९**

| अ.क्र. | पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रम/कामांची पुनरावृत्ती झाली आहे/होत आहे? असे आपणास वाटते का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | १५.३६ |
| २ | नाही | २३५ | ८०.२० |
| ३ | प्रतिसाद नाही | १३ | ४.४४ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती संकलित केलेल्या २९३ सरपंचांच्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, ४५(१५.३६%) संरपंचांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत आहे असे नमूद केले आहे तर २३५(८०.२०%) संरपंचांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत नाही असे नमूद केले आहे.

### ४.३.३३) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत

**तक्ता क्र. - ४.३.३०**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २३२ | ७९.१८ |
| २ | नाही | ५३ | १८.०९ |
| ३ | प्रतिसाद नाही | ८ | २.७३ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले असल्याचे २३२(७९.१८%) संरपंचांनी नमूद केले आहे तर ५३(१८.०९%) संरपंचांनी उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.३४) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३१**

| अ.क्र. | जिल्हा | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले आहे का? | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | |
| १ | अमरावती | १० | १ | ० | ११ |
| २ | अहमदनगर | ६ | २ | ० | ८ |
| ३ | गडचिरोली | १७ | १९ | २ | ३८ |
| ४ | चंद्रपूर | ५ | ४ | ० | ९ |
| ५ | जळगाव | ३ | ० | ० | ३ |
| ६ | ठाणे | १८ | २ | १ | २१ |
| ७ | धुळे | ० | १३ | २ | १५ |
| ८ | नंदुरबार | ५० | १ | १ | ५२ |
| ९ | नांदेड | ११ | १ | ० | १२ |
| १० | नाशिक | ४८ | ८ | ० | ५६ |
| ११ | पालघर | ३८ | २ | २ | ४२ |
| १२ | पुणे | ९ | ० | ० | ९ |
| १३ | यवतमाळ | १७ | ० | ० | १७ |
| **एकूण** | | **२३२** | **५३** | **८** | **२९३** |

**आलेख क्र.- ४.३.७**




वरील तक्त्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल दिला आहे. उपरोक्त माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, जळगाव, नंदूरबार, अमरावती, पालघर व नाशिक या जिल्ह्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाल्याचे प्रमाण जास्त दिसुन येते तर धुळे, गडचिरोली व चंद्रपुर या जिल्ह्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाल्याचे प्रमाण कमी दिसून येते.

### ४.३.३५) लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३२**

| अ.क्र. | यंत्रणा | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक निधी लेखापरीक्षक | २२८ | ९८.२८ |
| २ | सनदी लेखापाल | २ | ०.८६ |
| ३ | स्थानिक निधी लेखापरीक्षक, सनदी लेखापाल | १ | ०.४३ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ०.४३ |
| **एकूण** | | **२३२** | **१००** |

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे लेखापरीक्षण झाले आहे असे नमूद केलेल्या २३२ सरपंचांपैकी जास्तीत जास्त लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षक यांचेमार्फत केले असल्याचे सरपंचांनी नमूद केले आहे.

### ४.३.३६) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत

**तक्ता क्र. - ४.३.३३**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १४० | ४७.७८ |
| २ | नाही | १४९ | ५०.८५ |
| ३ | प्रतिसाद नाही | ४ | १.३७ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे १४०(४७.७८%) सरपंचांनी अभिप्राय दिले आहेत तर १४९(५०.८५%) सरपंचांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.३.३७) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३४**

| अ.क्र. | जिल्हा | पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | १ | १० | ० | ११ |
| २ | अहमदनगर | १ | ७ | ० | ८ |
| ३ | गडचिरोली | ११ | २६ | १ | ३८ |
| ४ | चंद्रपूर | २ | ७ | ० | ९ |
| ५ | जळगाव | १ | २ | ० | ३ |
| ६ | ठाणे | ८ | १३ | ० | २१ |
| ७ | धुळे | ३ | १० | २ | १५ |
| ८ | नंदुरबार | ३२ | १९ | १ | ५२ |
| ९ | नांदेड | ८ | ४ | ० | १२ |
| १० | नाशिक | २५ | ३१ | ० | ५६ |
| ११ | पालघर | ३५ | ७ | ० | ४२ |
| १२ | पुणे | ७ | २ | ० | ९ |
| १३ | यवतमाळ | ६ | ११ | ० | १७ |
| | **एकूण** | **१४०** | **१४९** | **४** | **२९३** |

वरील तक्त्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे मूल्यमापनाबाबत जिल्हानिहाय तपशिल दिला आहे. उपरोक्त माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, पालघर,

पुणे  व नांदेड या जिल्ह्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे मूल्यमापन  झाले आहे असे जास्तीत जास्त सरपंचांनी नमूद केलेले आहे. तर अमरावती, अहमदनगर, चंद्रपुर व गडचिरोली या जिल्ह्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे मूल्यमापन झाले नसल्याचे प्रमाण जास्त आहे असे सरपंचांनी नमूद केले आहे.

### ४.३.३८)    मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३५**

| अ.क्र. | यंत्रणा | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | १२२ | ८७.१४ |
| २ | ग्राम विकास विभाग | ११ | ७.८६ |
| ३ | आदिवासी विकास विभाग | १० | ७.१४ |
| ४ | त्रयस्थ यंत्रणा | ११ | ७.८६ |
| ५ | प्रतिसाद नाही | २ | १.४३ |
| **एकूण** | | **१४०** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे अभिप्राय दिलेल्या १४० सरपंचांपैकी, जास्तीत जास्त १२२(८७.१४%) सरपंचांनी सदर मूल्यमापन जिल्हा परिषदेमार्फत, ११(७.८६%) सरपंचांनी ग्राम विकास तसेच त्रयस्थ यंत्रणेमार्फत, १० (७.१४%) सरपंचांनी आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.३९) पेसा ५% अबंध निधी योजनेमधुन राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत

**तक्ता क्र. - ४.३.३६**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का? | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९५ | ६६.५५ |
| २ | नाही | ८८ | ३०.०४ |
| ३ | प्रतिसाद नाही | १० | ३.४१ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे १९५(६६.५५%) सरपंचांनी अभिप्राय दिले आहेत तर ८८(३०.०४%) सरपंचांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.३.४०) सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. - ४.३.३७**

| अ.क्र. | यंत्रणा | सरपंच | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | १७३ | ८८.७२ |
| २ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | ३६ | १८.४६ |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | २५ | १२.८२ |
| ४ | राज्यस्तरीय अधिकारी | २ | १.०३ |
| ५ | शाखा अभियंता | ३३ | १६.९२ |
| ६ | विस्तार अधिकारी | ६१ | ३१.२८ |
| **एकूण** | | **१९५** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे अभिप्राय दिलेल्या १९५ सरपंचांपैकी जास्तीत जास्त १७३(८८.७२%) सरपंचांनी सदर सनियंत्रण गट विकास अधिकारी यांचेमार्फत, ६१(३१.२८%) सरपंचांनी विस्तार अधिकारी यांचेमार्फत तर सर्वात कमी २ (१.०३%) सरपंचांनी राज्यस्तरीय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.

### ४.३.४१) पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सरपंचांनी सुचविलेल्या उपाय योजना

१ जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र पेसा कक्ष निर्माण करून कक्षामार्फत ५% अबंध निधीचे व्यवस्थापन करावे. पंचायत समिती स्तरावर पेसा कक्ष स्थापन करण्यात यावा. जिल्हा व तालुका स्तरावर परीपूर्ण कर्मचारींसह यंत्रणा असणे आवश्यक वाटते.

२ निधीच्या कामकाजा करिता स्वतंत्र सॉफ्टवेअर प्रणाली निर्माण करण्यात यावी.

३ पेसा ५% निधी गावाच्या लोकसंख्याच्या प्रमाणात मिळावा.

४ निधी वेळेवर उपलब्ध व्हावा व त्यामध्ये वाढ व्हावी.

५ ५% अबंध निधी बाबत प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी सर्वप्रथम ग्रामसभा सक्षम करणे, गावातील वस्तीमध्ये त्याबद्दल जाणीव-जागृती व गृहभेटीद्वारे प्रचार प्रसिद्धी करणे आवश्यक आहे.

६ ग्रामसभा सदस्यांना पेसा कायद्याबाबत प्रवीण प्रशिक्षकाच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे आवश्यक वाटते.

७ पेसा कायद्याची जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. पेसा ५% निधीबाबत सविस्तर प्रशिक्षण मिळावे. ५ % निधीबाबत गावातील ग्रामस्थांना माहिती देणे, कार्यशाळा घेणे, वाडी - वस्तीनिहाय कार्यशाळेचे आयोजन करणे, पेसा कायद्याचे वाचन होणे, प्रचार प्रसिध्दी साहित्य वाटप होणे आवश्यक आहे.

८ ५% निधी प्रभावी अंमलबजावणीसाठी गाव निहाय ग्रामसभा कोष समित्या व इतर पेसा अंतर्गत सर्व समित्यांना प्रशिक्षण देणे.

९ तालुका स्तरावर सरपंच, सचिव, ग्रामकोष समिती यांचे वेळोवेळी कार्यशाळा व प्रशिक्षण सत्र घेऊन पेसा कायद्याच्या तरतुदी बाबत जनजागृती केल्यास याबाबतची प्रभावी अंमलबजावणी करणे ग्रामस्तरांवर शक्य होईल

१०  ५% अबंध निधी गावाच्या विकासासाठी उपयुक्त आहे. मात्र १५ वा वित्त आयोग प्रमाणे निधी वितरण करताना PFMS प्रणाली मार्फत सेवा पुरवठादारांना निधी वितरीत केल्यास खरेदी केलेल्या साहित्याची गुणवत्ता राहील. पेसा अंमलबजावणी खर्चाचे मार्गदर्शन व्हावे.

११  गावांचा आराखडा तयार करतांना लोकांचा सक्रीय सहभाग असावा.

१२  आराखडा ऑनलाईन असावा. आराखड्याची छाननी व्हावी.

१३  ग्रामसभेला पुर्ण अधिकार प्रदान करावे, इतर विभागाच्या परवानगीची आवश्यकता नसावी.

१४  कामाचे मूल्यमापन होणे अनिवार्य व्हावे.

१५  ई-ग्राम स्वराज प्रणाली प्रमाणे ॲप असावे.

१६  कायद्यात बदल/ सुधारणा होणे आवश्यक आहे.

१७  गावाची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार कामाची निवड करणे, गौणवण उपज करिता लोकांना माहिती द्यावी.

१८  योजनेसाठी गटानुसार अभियंता व लेखापाल असावा.

१९  तालुका स्तरावर स्वतंत्र पेसा कर्मचारी यांची नेमणूक करून सदर निधीवर त्यांचे नियंत्रण व समन्वय साधणे गरजेचे आहे.

२०  पेसा कायदा अंमलबजाणीसाठी सर्व विभागाना सहभागी करून घेतले पाहिजे. पेसा कायद्याची अमंलबजावणी करणे बंधनकारक करावे.

२१  पेसा ५% अबंध निधीच्या नियमावली मध्ये बदल करावा.

२२  ग्रामसभा कोष समिती अंतर्गत व्यवहार होतात त्यावर सरपंचांचे नियंत्रण असायला पाहिजे.

२३  ग्रामसभा कोष समितीकडे पेसा निधींबाबत अंमलबजावणीची सर्व जबाबदारी द्यावी.

२४  वितरीत होणारा निधी संपूर्ण लोकसंखेच्या प्रमाणात वितरीत करण्यात यावा.

२५  मोबीलायझर यांचे मानधन वाढवावे.



**वृक्षारोपन करताना ग्रामस्थ**

## ४.४ ग्रामसेवकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये, ग्रामस्थांना ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देणे, ग्रामसभा कोषामार्फत अबंध निधीचे नियोजन इत्यादीबाबत ग्रामसेवकांची महत्वाची भूमिका आहे.

पेसा कायदा अंमलबजावणी मूल्यमापनाअंतर्गत निवडलेल्या एकूण २९३ ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकांकडून मुलाखत अनुसूचीमध्ये माहिती संकलित केली आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे देण्यात आले आहे.

### ४.४.१) पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. -४.४.१**

| अ.क्र. | पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कायदा वाचून | १६७ | ५७.०० |
| २ | प्रशिक्षणाव्दारे | २३५ | ८०.२० |
| ३ | स्वयंसेवी संस्था | ११ | ३.७५ |
| ४ | शासनाचे अधिकारी | ७८ | २६.६२ |
| ५ | प्रसिध्दी माध्यमांव्दारे | ५१ | १७.४१ |
| ६ | अद्याप माहिती नाही | १६ | ५.४६ |
| ७ | त्रोटक माहिती आहे | १ | ०.३४ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.४.१**



पेसा कायदा अंमलबजावणीबाबत एकूण २९३ ग्रामसेवकांकडून माहिती घेतली आहे. उपरोक्त तक्त्यात पेसा कायदा - १९९६ ची माहिती ग्रामसेवकांना कोणामार्फत मिळाली याचा तपशिल देण्यात आला आहे. सर्वात जास्त २३५(८०.२०%) ग्रामसेवकांनी प्रशिक्षणाव्दारे, १६७(५७.००%) ग्रामसेवकांनी कायदा वाचुन, ७८(२६.६२%) ग्रामसेवकांनी शासनाचे अधिकाऱ्यांमार्फत तर ५१(१७.४१%) ग्रामसेवकांनी प्रसिध्दी माध्यमांव्दारे पेसा कायदा १९९६ बाबत माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. १६(५.४६%) ग्रामसेवकांनी सदर कायद्याची त्यांना अद्याप माहिती नाही तसेच १(०.३४%) ग्रामसेवकांना सदर कायद्याची त्रोटक माहिती असल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.२) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबत माहिती

**तक्ता क्र. -४.४.२**

| अ.क्र. | ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२५ | ७६.७९ |
| २ | नाही | ४५ | १५.३६ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १८ | ६.१४ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५ | १.७१ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

**आलेख क्र.-४.४.२**




वरील तक्त्यामध्ये नमूद २९३ ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, एकूण २९३ ग्रामसेवकांपैकी २२५ (७६.७९%) ग्रामसेवकांनी ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाले असल्याचे सांगितले आहे तर ४५(१५.३६%) ग्रामसेवकांनी ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाले नसल्याचे सांगितले आहे. १८(६.१४%) ग्रामसेवक याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते तर ५(१.७१ %) ग्रामसेवकांनी याबाबत प्रतिसाद नोंदविलेला नाही.

### ४.४.३) ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. -४.४.३**

| अ.क्र. | ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती देण्याचा स्त्रोत | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ९० | ४०.०० |
| २ | पेसा समन्वयक | १३३ | ५९.११ |
| ३ | जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी | १०७ | ४७.५६ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | १७ | ७.५६ |
| ५ | ग्रामसेवक | १६ | ७.११ |
| ६ | प्रतिसाद नाही | ६ | २.६७ |
| **एकूण** | | **२२५** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.४.३**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली याबाबतचा तपशिल देण्यात आला आहे. जास्तीत जास्त माहिती पेसा समन्वयकाच्या माध्यमातुन दिली गेल्याचे १३३ (५९.११%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे. त्याखालोखाल १०७ (४७.५६%) ग्रामसेवकांनी जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी यांचेमार्फत, ९० (४०%) ग्रामसेवकांनी सरपंचांमार्फत तर १६(७.११%) ग्रामसेवकांनी स्वत: त्यांचेमार्फत पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला देण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.४) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.४**

| अ.क्र. | आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४२ | ८२.६० |
| २ | नाही | ४९ | १६.७२ |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ ग्रामसेवकांपैकी २४२(८२.६०%) ग्रामसेवकांनी त्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाल्याचे नमूद केले आहे तर ४९ (१६.७२%) ग्रामसेवकांनी त्यांना पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.५) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाबाबत ग्रामसेवकांचा जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.४.५**

| अ.क्र. | जिल्हा | आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाले आहे का ? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | १ | १० | ० | ११ |
| २ | अहमदनगर | ६ | २ | ० | ८ |
| ३ | गडचिरोली | ३७ | ० | १ | ३८ |
| ४ | चंद्रपूर | १ | ८ | ० | ९ |
| ५ | जळगाव | १ | २ | ० | ३ |
| ६ | ठाणे | १९ | २ | ० | २१ |
| ७ | धुळे | ११ | ४ | ० | १५ |
| ८ | नंदुरबार | ४८ | ३ | १ | ५२ |
| ९ | नांदेड | ५ | ७ | ० | १२ |
| १० | नाशिक | ५५ | १ | ० | ५६ |
| ११ | पालघर | ४० | २ | ० | ४२ |
| १२ | पुणे | ९ | ० | ० | ९ |
| १३ | यवतमाळ | ९ | ८ | ० | १७ |
| **एकूण** | | **२४२** | **४९** | **२** | **२९३** |

**आलेख क्र.- ४.४.४**




उपरोक्त तक्त्यात ग्रामसभेत पेसा कायद्याचे प्रशिक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल देण्यात आला आहे. ग्रामसेवकांनी नमूद केल्यानुसार पुणे, नाशिक, गडचिरोली, पालघर, नंदूरबार व ठाणे या जिल्ह्यांमधील ग्रामसेवकांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळण्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसुन येते तर अमरावती, चंद्रपुर व जळगाव जिल्ह्यामधील ग्रामसेवकांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

### ४.४.६) पेसा कायद्याचे प्रशिक्षण देणाऱ्या यंत्रणाबाबतची माहिती

**तक्ता क्र. -४.४.६**

| अ.क्र. | पेसा कायद्याचे प्रशिक्षण देणारी यंत्रणा | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | ३७ | १५.२९ |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी | २१० | ८६.७८ |
| ३ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | ८५ | ३५.१२ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | १४ | ५.७९ |
| ५ | पंचायत राज प्रशिक्षण केंद्र | १ | ०.४१ |
| **एकूण** | | **२४२** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली याबाबतचा तपशिल देण्यात आला आहे. जास्तीत जास्त माहिती जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकाऱ्यांच्या मार्फत दिली गेल्याचे २१० (८६.७८%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे. ८५ (३५.१२%) ग्रामसेवकांनी ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रामार्फत तर १४(५.७९%) ग्रामसेवकांनी स्वयंसेवी संस्थांमार्फत ग्रामसभेत माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.७) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत

**तक्ता क्र. -४.४.७**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याची प्रचार प्रसिध्दी करण्यात आलेली आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २११ | ७२.०१ |
| २ | नाही | २१ | ७.१७ |
| ३ | काही प्रमाणात | ५३ | १८.०९ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ६ | २.०५ |
| ५ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

**आलेख क्र.- ४.४.५**




उपरोक्त तक्त्यातील ग्रामसेवकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २११(७२.०१%) ग्रामसेवकांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली आहे असे नमूद केले आहे तर २१(७.१७%) ग्रामसेवकांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नाही असे नमूद केले आहे. ५३(१८.०९%) ग्रामसेवकांनी काही प्रमाणात प्रचार प्रसिध्दी करण्यात आली आहे असे मत नोंदविलेले आहे.

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी होणे आवश्यक आहे तथापि काही ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नाही तसेच याबाबत ग्रामसेवकांना माहिती नसणे या महत्वाच्या त्रुटी दिसून येतात.



**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून पिण्याचे पाण्याची सुविधा**

### ४.४.८) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.४.८**

| अ.क्र. | जिल्हा | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार प्रसिध्दी करण्यात आलेली आहे का? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | काही प्रमाणात | माहितीबाबत अनभिज्ञ | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | २ | ५ | ३ | १ | ० | ११ |
| २ | अहमदनगर | ७ | ० | १ | ० | ० | ८ |
| ३ | गडचिरोली | २३ | १ | १४ | ० | ० | ३८ |
| ४ | चंद्रपूर | २ | २ | ५ | ० | ० | ९ |
| ५ | जळगाव | ३ | ० | ० | ० | ० | ३ |
| ६ | ठाणे | ११ | ० | ९ | १ | ० | २१ |
| ७ | धुळे | ११ | ० | ३ | ० | १ | १५ |
| ८ | नंदुरबार | ३७ | ६ | ८ | १ | ० | ५२ |
| ९ | नांदेड | ८ | ३ | १ | ० | ० | १२ |
| १० | नाशिक | ५५ | १ | ० | ० | ० | ५६ |
| ११ | पालघर | ३८ | ० | २ | २ | ० | ४२ |
| १२ | पुणे | ५ | १ | ३ | ० | ० | ९ |
| १३ | यवतमाळ | ९ | २ | ४ | १ | १ | १७ |
| **एकूण** | | २११ | २१ | ५३ | ६ | २ | २९३ |

ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीनुसार जळगाव, नाशिक, पालघर, अहमदनगर जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार प्रसिध्दी झाल्याचे प्रमाण जास्त आहे. तर अमरावती व नांदेड या जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार प्रसिध्दी झाल्याचे प्रमाण कमी आहे.

### ४.४.९) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम

**तक्ता क्र. -४.४.९**

| अ.क्र. | प्रचार व प्रसिध्दीचे माध्यम | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासनामार्फत | ७२ | २७.२७ |
| २ | स्वयंसेवी संस्था | १८ | ६.८२ |
| ३ | सामाजिक कार्यकर्ते | ८ | ३.०३ |
| ४ | शैक्षणिक संस्था | ४ | १.५२ |
| ५ | ग्रामपंचायत | २३० | ८७.१२ |
| ६ | पंचायत समिती | १ | ०.३८ |
| **एकूण** | | **२६४** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

माहिती नोंदविलेल्या २९३ ग्रामसेवकांपैकी २६४ ग्रामसेवकांनी त्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली असे नमूद केले आहे. या २६४ ग्रामसेवकांकडून सदर प्रचार व प्रसिध्दी कोणामार्फत केली याबाबत माहिती घेतली असता २३०(८७.१२%) ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतीमार्फत, ७२(२७.२७%) ग्रामसेवकांनी शासनामार्फत, १८(६.८२%) ग्रामसेवकांनी स्वयंसेवी संस्थांमार्फत तर सर्वात कमी १(०.३८%) ग्रामसेवकांनी पंचायत समितीमार्फत पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली असे नमूद केले आहे.

### ४.४.१०) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी उपक्रम/साधने

**तक्ता क्र. -४.४.१०**

| अ.क्र. | प्रचार व प्रसिध्दीसाठीचे उपक्रम/साधने | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चित्ररथ | १५ | ५.६८ |
| २ | माहिती फलक | १८९ | ७१.५९ |
| ३ | गावपातळीवरील कार्यशाळा | ९४ | ३५.६१ |
| ४ | ग्रामसभेमध्ये माहिती देणे | १४३ | ५४.१७ |
| ५ | प्रचार फेरी | ३६ | १३.६४ |
| ६ | कलापथक/पथनाट्य | ३६ | १३.६४ |
| ७ | व्हिडीओ फिल्म सादरीकरण | १२ | ४.५५ |
| ८ | पेसा कॅलेंडर | ६८ | २५.७६ |
| ९ | प्रतिसाद नाही | २ | ०.७६ |
| **एकूण** | | **२६४** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.४.६**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी कोणकोणते उपक्रम/साधने वापरली आहेत याचा तपशिल दिला आहे. वरील माहितीच्या विश्लेषणानुसार १८९(७१.५९%) ग्रामसेवकांनी सदर कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती फलक हा उपक्रम राबविलेला आहे असे नमूद केले आहे. १४३(५४.१७%) ग्रामसेवकांनी ग्रामसभेमध्ये माहिती देणे, ९४(३५.६१%) ग्रामसेवकांनी गावपातळीवर कार्यशाळा तर १२(४.५५%) ग्रामसेवकांनी व्हिडीओ फिल्म सादरीकरण इत्यादी उपक्रम पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आल्याचे सांगितले.

### ४.४.११) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. -४.४.११**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिध्दीचे साहित्य उपलब्ध झाले आहे का ? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १६८ | ५७.३४ |
| २ | नाही | १०३ | ३५.१५ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १९ | ६.४९ |
| ४ | प्रतिसाद नाही | ३ | १.०२ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे आढळून येते की, माहिती नोंदविलेल्या २९३ ग्रामसेवकांपैकी १६८ (५७.३४% ) ग्रामसेवकांनी त्यांना पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाले असे नमूद केले आहे तर १०३ (३५.१५%) ग्रामसेवकांनी त्यांना पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाले नाही असे नमूद केले आहे.

### ४.४.१२) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून उपलब्ध साहित्याचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.१२**

| अ.क्र. | शासनाकडून उपलब्ध साहित्य | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | माहिती फलक | ८३ | ४९.४० |
| २ | माहिती पत्रिका | ७१ | ४२.२६ |
| ३ | पुस्तके व माहिती पुस्तिका | ९८ | ५८.३३ |
| ४ | कॅलेंडर | ७५ | ४४.६४ |
| ५ | विविध तक्ते | २३ | १३.६९ |
| ६ | व्हिडीओ फिल्म | ८ | ४.७६ |
| | **एकूण** | **१६८** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.४.७**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे कोणकोणते साहित्य उपलब्ध झाले याबाबत तपशिल नोंदविलेला आहे. ९८ (५८.३३%) ग्रामसेवकांनी त्यांना पुस्तके व माहिती पुस्तिका, ८३ (४९.४०%) ग्रामसेवकांनी त्यांना माहिती फलक तर सर्वात कमी ८ (४.७६%) ग्रामसेवकांनी त्यांना शासनाकडून व्हिडीओ फिल्म उपलब्ध झाल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.१३) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.४.१३**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०५ | ६९.९७ |
| २ | नाही | ८१ | २७.६४ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ६ | २.०५ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ०.३४ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ ग्रामसेवकांपैकी २०५ (६९.९७%) ग्रामसेवकांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतुद केली आहे तर ८१(२७.६४%) ग्रामसेवकांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतुद केली नाही असे नमूद केले आहे.

### ४.४.१४) पेसा कायद्याची प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविलेल्या उपक्रमांचा तपशिल

पेसा कायद्याची प्रचार व प्रसिद्धीसाठी खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले आहे.

१. ग्रामसभा आयोजित करुन त्यामध्ये माहिती देणे.
२. मोबिलायझर यांच्या मार्फत प्रचार प्रसिद्धी करणे.
३. माहिती पुस्तिका, पेसा कॅलेंडर यांचे वाटप करणे.
४. स्थानिक बोली भाषेत स्थनिक लोकांकडून प्रचार प्रसिद्धी करणे.
५. माहिती फलक लावणे, कार्यशाळांचे आयोजन करणे, चित्रफीत/ डॉक्यूमेंट्री दाखविणे, कलापथक, पथनाट्य, प्रभात फेरी इ. उपक्रम.
६. गृह भेटी, गावात दवंडी देणे.
७. पेसाविषयक प्रशिक्षण देणे.
८. स्कूल बॅगवर पेसा कायद्याची माहिती छापणे, मोबाईल ग्रृप तयार करून त्याव्दारे माहिती देणे.

### ४.४.१५) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये पेसा विषयक स्थापन केलेल्या सामित्यांची माहिती

**तक्ता क्र. -४.४.१४**

| अ.क्र. | ग्रामपंचायतीमध्ये पेसा विषयक स्थापन केलेल्या समित्या | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा कोष समिती | २८६ | ९७.६१ |
| २ | साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती | १४८ | ५०.५१ |
| ३ | शांतता समिती | १४१ | ४८.१२ |
| ४ | बाजार समिती | ६६ | २२.५३ |
| ५ | मादक द्रव्य नियंत्रण समिती | १३५ | ४६.०८ |
| ६ | ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती | १२५ | ४२.६६ |
| ७ | न्याय समिती | ९३ | ३१.७४ |
| ८ | कर्ज नियंत्रण समिती | ७३ | २४.९१ |
| ९ | माहितीबाबत अनभिज्ञ | १ | ०.३४ |
| १० | प्रतिसाद नाही | ३ | १.०२ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.४.८**



पेसा कायद्याअंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये विविध समित्या स्थापन करण्यात येतात. ग्रामसेवकांनी नमूद केल्यानुसार जास्तीत जास्त २८६(९७.६१%) ग्रामसभाकोष समिती, १४८(५०.५१%) साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती, १४१(४८.१२%) शांतता समिती  तर सर्वात कमी ६६(२२.५३%) बाजार समिती या समित्यांची स्थापना झाल्याचे आढळून येते.




**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून बांधलेले सार्वजनिक वाचनालय**

### ४.४.१६) सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.४.१५**

| अ.क्र. | सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठका होतात का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १३३ | ४५.३९ |
| २ | नाही | १४५ | ४९.४९ |
| ३ | लागू नाही | ६ | २.०५ |
| ४ | प्रतिसाद नाही | ९ | ३.०७ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, १३३ (४५.३९%) ग्रामसेवकांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होतात असे नमूद केले आहे तर १४५(४९.४९%) ग्रामसेवकांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होत नाहीत असे नमूद केले आहे.

### ४.४.१७) सर्व समित्यांच्या कामकाजातील ग्रामसेवकांच्या सहभागाबाबत

**तक्ता क्र. -४.४.१६**

| अ.क्र. | सर्व समित्यांच्या कामकाजात आपण सहभागी होतात का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०१ | ६८.६० |
| २ | नाही | ४० | १३.६५ |
| ३ | काही प्रमाणात | ४६ | १५.७० |
| ४ | प्रतिसाद नाही | ६ | २.०५ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २०१ (६८.६०%) ग्रामसेवक सर्व समित्यांच्या कामकाजात सहभागी होतात तर ४०(१३.६५%) ग्रामसेवक सर्व समित्यांच्या कामकाजात सहभागी होत नाहीत. ४६(१५.७०%) ग्रामसेवक सर्व समित्यांच्या कामकाजात काही प्रमाणात सहभागी होतात.

### ४.४.१८) समितीचे अभिलेखे व दस्तऐवजांच्या तपासणीबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.४.१७**

| अ.क्र. | समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२४ | ७६.४५ |
| २ | नाही | ६२ | २१.१६ |
| ३ | प्रतिसाद नाही | ७ | २.३९ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ सरपंचांपैकी २२४(७६.४५%) ग्रामसेवकांनी समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते असा अभिप्राय नोंदविलेला आहे तर ६२(२१.१६%) ग्रामसेवकांनी समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जात नाही असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

### ४.४.१९) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरच्या निवडीबाबत

**तक्ता क्र. -४.४.१८**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आलेली आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८० | ९५.५६ |
| २ | नाही | ११ | ३.७६ |
| ३ | प्रतिसाद नाही | २ | ०.६८ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे आढळून येते की २८० (९५.५६%) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आली आहे तर ११ (३.७६%) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायझरची निवड करण्यात आली नाही.

### ४.४.२०) पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी होणाऱ्या उपयोगाचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.१९**

| अ.क्र. | पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी उपयोग होत आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२१ | ७८.९३ |
| २ | नाही | १८ | ६.४३ |
| ३ | तटस्थ | ४० | १४.२८ |
| ४ | प्रतिसाद नाही | १ | ०.३६ |
| **एकूण** | | **२८०** | **१००** |

**आलेख क्र.- ४.४.९**




पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा उपयोग होत आहे किंवा कसे याबाबत ग्रामसेवकांकडून माहिती घेतली असता असे निर्दशनास येते की, २२१(७८.९३%) ग्रामसेवकांनी पेसा मोबिलायझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा उपयोग होत आहे तर १८(६.४३%) ग्रामसेवकांनी पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा उपयोग होत नाही मत नोंदविलेले आहे. ४०(१४.२८%) ग्रामसेवकांनी याबाबत तटस्थ भूमिका नोंदविलेली आहे.

### **४.४.२१) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे मिळणाऱ्या सहकार्याबाबत**

**तक्ता क्र. - ४.४.२०**

| **अ.क्र.** | **पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का?** | **ग्रामसेवक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १०५ | ३५.८३ |
| २ | नाही | ७६ | २५.९४ |
| ३ | काही प्रमाणात | १०७ | ३६.५२ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५ | १.७१ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना इ.) सहकार्य मिळते का याबाबत माहिती घेण्यात आली आहे. १०५(३५.८३%) ग्रामसेवकांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत असल्याचे तर ७६(२५.९४%) ग्रामसेवकांनी त्यांना सदर यंत्रणांचे सहकार्य मिळत नसल्याचे मत नोंदविलेले आहे. १०७(३६.५२%) ग्रामसेवकांनी काही प्रमाणात या यंत्रणांचे सहकार्य मिळते असे मत नोंदविलेले आहे.

### **४.४.२२) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत**

**तक्ता क्र. -४.४.२१**

| **अ.क्र.** | **पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का?** | **ग्रामसेवक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १७६ | ६०.०७ |
| २ | नाही | ८९ | ३०.३८ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | २४ | ८.१९ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.३६ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या २९३ ग्रामसेवकांपैकी १७६(६०.०७%) ग्रामसेवकांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे असा प्रतिसाद दिला आहे तर ८९(३०.३८%) ग्रामसेवकांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही असा प्रतिसाद दिला आहे.

### ४.४.२३) पेसा कायदा विषयक अडचणी व समस्या उद्भवल्यास घेत असलेल्या मार्गदर्शनाविषयी

पेसा कायद्याविषयक अडचणी उद्भवल्यास ग्रामसेवक मुख्यत्वे  उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, पंचायत समिती, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा पेसा समन्वयक, तालुका पेसा समन्वयक व मोबिलायझर यांचेकडून मार्गदर्शन घेतात असे नमूद केले आहे. ५ ग्रामसेवकांनी तज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाहीत तसेच मार्गदर्शन मिळत नाही असे नमूद केले आहे.

### ४.४.२४) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. -४.४.२२**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२२ | ४१.६४ |
| २ | नाही | ९३ | ३१.७४ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ७३ | २४.९१ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५ | १.७१ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार, १२२(४१.६४%) ग्रामसेवकांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे तर ९३(३१.३४%) ग्रामसेवकांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. ७३(२४.९१%) ग्रामसेवक या माहितीबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.४.२५) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामधील तफावतीबाबत

**तक्ता क्र. -४.४.२३**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये तफावत असल्याचे आपणास आढळून आले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६३ | २१.५० |
| २ | नाही | २२१ | ७५.४३ |
| ३ | प्रतिसाद नाही | ९ | ३.०७ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

मूल्यमापनाअंतर्गत एकूण २९३ ग्रामसेवकांकडून  संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसुन येते की, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये

तफावत असल्याचे ६३(२१.५०%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे तर २२१(७५.४३%) ग्रामसेवकांनी विविध शासन निर्णयामध्ये तफावत नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.२६) शासन निर्णयामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे ग्रामसेवकांनी नमूद केले आहे.

१. ग्रामसभा कोष समितीच्या कार्यकालबाबत तफावत आहे (२ वर्ष कि ५ वर्ष)
२. स्थायी समित्यांचा कार्यकाळ.
३. अनुसूचित क्षेत्रात गौण वन उपज अधिकार पेसा कायदा अंतर्गत व वनहक्क कायदा अंतर्गतही आहे त्यामुळे यात संभ्रम निर्माण होतो.
४. गौण खजिन बाबत ग्रामसभेस पेसा कायद्यान्वये अधिकार दिले आहेत परंतु महसूल यंत्रणा म्हणून तसे आदेश नाहीत.
५. तंटामुक्त समिती व पेसाच्या शांतता समिती मध्ये नेमका फरक.
६. इतर विभाग यांना कायदा लागू आहे का नाही याविषयी संभ्रम.
७. अनुसूचित क्षेत्रातील नव्याने तयार झालेल्या गावांची नावे समाविष्ट असणारी सुधारित यादी निर्गमित होणे आवश्यक आहे.
८. निधीचे व्यवस्थापन.

### ४.४.२७) ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत

**तक्ता क्र. -४.४.२४**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२७ | ४३.३४ |
| २ | नाही | १५ | ५.१२ |
| ३ | काही प्रमाणात | १३६ | ४६.४२ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ७ | २.३९ |
| ५ | प्रतिसाद नाही | ८ | २.७३ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

पेसा कायद्यानुसार पेसा गावातील ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त तक्त्यानुसार या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जातो असे १२७(४३.३४%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे तर १५(५.१२%) ग्रामसेवकांनी या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जात नाही असे नमूद केले आहे. १३६(४६.४२%) ग्रामसेवकांनी या विशेष अधिकारांचा काही प्रमाणात वापर केला जातो असे नमूद केले आहे.

### ४.४.२८) पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांनी पूर्णपणे वापर केलेल्या विशेष अधिकारांचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.२५**

| अ.क्र. | पूर्णपणे वापरत असलेले विशेष अधिकार | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | ४० | ३१.५० |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ६१ | ४८.०३ |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | ४० | ३१.५० |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | ४३ | ३३.८६ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन | ५० | ३९.३७ |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | ५४ | ४२.५२ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | ३३ | २५.९८ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | २६ | २०.४७ |
| ९ | सावकारी करण्यावर नियंत्रण | ३१ | २४.४१ |
| १० | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | १८ | १४.१७ |
| ११ | कोणत्याच नाही | २ | १.५७ |
| १२ | माहितीबाबत अनभिज्ञ | २ | १.५७ |
| १३ | प्रतिसाद नाही | ४ | ३.१५ |
| **एकूण** | | **१२७** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

**आलेख क्र.- ४.४.१०**



उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात असल्यास कोणते अधिकार पूर्णपणे वापरण्यात येतात याबाबत माहिती दिली आहे.

उपरोक्त माहितीच्या विश्लेषणानुसार, सर्वात जास्त ६१(४८.०३%) ग्रामसेवकांनी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन, ५४(४२.५२%) ग्रामसेवकांनी गौण वन उत्पादन मालकी, ५०(३९.३७%) ग्रामसेवकांनी मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन या विशेष अधिकारांचा वापर केल्याचे नमूद केले आहे.

सर्वात कमी वापर केलेला विशेष अधिकार, संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण हा असल्याचे दिसून येते.

### ४.४.२९) पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पूर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी आवश्यक उपाययोजना

**तक्ता क्र. -४.४.२६**

| अ.क्र. | उपाययोजना | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कायद्यात सुधारणा | ४९ | १६.७२ |
| २ | नियमात सुधारणा | ७८ | २६.६२ |
| ३ | शासन निर्णयात सुधारणा | ९७ | ३३.११ |
| ४ | आवश्यकता वाटत नाही | १३४ | ४५.७३ |
| ५ | प्रतिसाद नाही | १४ | ४.७८ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याने बहाल केलेले अधिकार पुर्ण क्षमतेने पेसा गावांनी वापरण्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना करणे आवश्यक वाटतात याबाबतचे ग्रामसेवकांचे अभिप्राय नमूद केले आहेत. उपरोक्तनुसार ९७(३३.११%) ग्रामसेवकांनी यासाठी शासन निर्णयात सुधारणा होणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिले आहेत. कायद्यात तसेच नियमांत सुधारणा आवश्यक आहेत असे अनुक्रमे १६.७२% व २६.६२% ग्रामसेवकांनी अभिप्राय दिले आहेत. जास्तीत जास्त १३४ (४५.७३%) ग्रामसेवकांनी याबाबत कोणत्याही उपाययोजना करण्याची आवश्यकता वाटत नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.४.३०) पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत

**तक्ता क्र. - ४.४.२७**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गाव निहाय करण्यात आला आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २५० | ८५.३३ |
| २ | नाही | ३१ | १०.५८ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३ | १.०२ |
| ४ | प्रतिसाद नाही | ९ | ३.०७ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

एकूण २९३ ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गावनिहाय करण्यात आला आहे असे २५० (८५.३३%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे तर ३१ (१०.५८%) ग्रामसेवकांनी पेसा ५% अबंध निधीचा वार्षिक आराखडा गावनिहाय करण्यात आला नाही असे नमूद केले आहे.



**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून सार्वजनिक विहीरीला संरक्षण जाळी**

### ४.४.३१) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्याचा समावेश ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आराखड्यात करणेबाबत

**तक्ता क्र. -४.४.२८**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्याचा समावेश ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आराखड्यात करण्यात आला आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४६ | ८३.९६ |
| २ | नाही | ४४ | १५.०२ |
| ३ | प्रतिसाद नाही | ३ | १.०२ |
| | **एकूण** | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, २४६ (८३.९६%) ग्रामसेवकांनी पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्याचा ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे तर ४४ (१५.०२%) ग्रामसेवकांनी पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्याचा ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आराखड्यात समावेश करण्यात आला नाही असे नमूद केले आहे.

**४.४.३२) पेसा ५% अबंध निधीचा समावेश ग्रामविकास आराखड्यामध्ये करण्यात आला असल्यास सदर आराखड्यात तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीच्या मंजुरीबाबत तपशिल**

**तक्ता क्र. -४.४.२९**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीचा समावेश ग्रामविकास आराखड्यामध्ये करण्यात आला असल्यास सदर आराखड्यात तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीची मंजुरी घेतली आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०४ | ८२.९३ |
| २ | नाही | ३७ | १५.०४ |
| ३ | प्रतिसाद नाही | ५ | २.०३ |
| **एकूण** | | **२४६** | **१००** |

वरील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणानुसार पेसा ५% अबंध निधीचा समावेश ग्रामविकास आराखड्यामध्ये करण्यात आला असल्यास सदर आराखड्यात तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीची मंजुरी घेतली आहे असे २०४ (८२.९३%) ग्रामसेवकांनी तर आराखड्यात तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीची मंजुरी घेतली नाही असे ३७ (१५.०४%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे.

**४.४.३३) पेसा ५% अबंध निधीचा समावेश असलेला ग्रामपंचायत विकास आराखडा इ. ग्रामस्वराज या वेबपोर्टलवर अपलोड करणेबाबत**

**तक्ता क्र. -४.४.३०**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीचा समावेश असलेला ग्रामपंचायत विकास आराखडा इ. ग्रामस्वराज या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आला आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२६ | ४३.०० |
| २ | नाही | १५४ | ५२.५६ |
| ३ | प्रतिसाद नाही | १३ | ४.४४ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

पेसा ५% अबंध निधीचा समावेश असलेला ग्रामपंचायत विकास आराखडा इ. ग्रामस्वराज या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आला आहे असे १२६ (४३%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे तर १५४ (५२.५६%) ग्रामसेवकांनी ग्रामपंचायत विकास आराखडा इ. ग्रामस्वराज या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेला नाही असे नमूद केले आहे.

## ४.४.३४) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेली कामे

**तक्ता क्र. -४.४.३१**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | २८६ | ९७.६१ |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | २१७ | ७४.०६ |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | २७७ | ९४.५४ |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | १८७ | ६३.८२ |
| ५ | प्रतिसाद नाही | १ | ०.३४ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

उपरोक्त तक्त्यात पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत याबाबत ग्रामसेवकांनी माहिती दिली आहे. जास्तीत जास्त २८६ (९७.६१%) ग्रामसेवकांनी पायाभुत सुविधा तर सर्वात कमी १८७ (६३.८२%) वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका या क्षेत्रातील कामे घेतल्याचे नमूद केले आहे.

## ४.४.३५) पेसा ५% अबंध निधीच्या विनियोगाबाबतची माहिती

**तक्ता क्र. -४.४.३२**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीचा विनियोग कोणामार्फत करण्यात आला आहे? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ३३ | ११.२६ |
| २ | ग्रामसभा कोष समिती | २६५ | ९०.४४ |
| ३ | प्रतिसाद नाही | ७ | २.३९ |
| **एकूण** | | **२९३** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

एकूण २९३ ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीनुसार असे आढळून येते की, पेसा ५% अबंध निधीचा विनियोग सर्वात जास्त ग्रामसभा कोष समितींमार्फत करण्यात आला आहे.

पेसा ५% अबंध निधीच्या विनियोगाची मंजुरी ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीमध्ये घेतली आहे असे २५४(८६.६९%) ग्रामसेवकांनी तर मंजुरी घेतली नसल्याचे २९(९.९०%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे.

### ४.४.३६) पेसा ५% अबंध निधीमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा तपशिल -

पेसा ५% अबंध निधीमधुन गावांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आल्याचे ग्रामसेवकांनी नमूद केले आहे.

**१. शैक्षणिक उपक्रम** - अंगणवाडी व शाळेतील साहित्य खरेदी, रंगरंगोटी, सजावट, डिजिटल शाळा, अंगणवाडी/शाळेला कुंपण /भिंत, अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, अंगणवाडी किचन शेड बांधकाम, वाचालानय बांधकाम इ.

**२. पाणीपुरवठा** – पाणीपुरवठा, हातपंप/पाण्याची टाकी, नळ योजना, पाणीपुरवठा दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची विहीर दुरुस्ती, तलाव खोलीकरण, पिण्याच्या पाण्याचा आरो प्लांट.

**३. आरोग्य** - आरोग्याशी संबंधित व्यवस्था, आरोग्य विषयक औषधे, कोविड कालावधीत मास्क व सॅनिटायझर वाटप, एक मुठ पोषण आहार, अमृत आहार योजना स्वयंपाकी मानधन.

**४. रस्ते/ गटारे** - रस्ते (सिमेंट/मुरूम) , नाली/गटार दुरुस्ती, भूमिगत गटारे बांधकाम.

**५. विद्युतीकरण** – पथदिवे, सौर दिवे बसविणे.

**६. वृक्षारोपण** - वृक्ष लागवड करणे.

**७. सार्वजनिक स्वच्छता** - कचरा कुंडी, सार्वजनिक मुतारी/शौचालय बांधकाम, स्वच्छता अभियान, कंपोस्ट खड्डे इ.

**८. प्रशिक्षण** - कौशल्य विकास प्रशिक्षण, मध संकलन प्रशिक्षण देणे.

**९. पेसा कायदा प्रचार व प्रसिद्धी** - पेसा कायदा अंमलबजावणी प्रशिक्षण/कार्यशाळा, पेसा कायदा विषयक माहिती फलक बसविणे

**१०. इतर उपक्रम** – अ.स्मशानभूमी बांधकाम
आ.गावात चौरस्त्यावर बसण्याकरीता सिमेंट बेंच खरेदी करणे.
इ.आदीवासी वाद्य खरेदी.
ई.व्यायाम शाळा साहित्य खरेदी
उ.स्पीकर खरेदी, भांडी खरेदी
ऊ. समाज मंदिर दुरुस्ती

### ४.४.३७) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे निधी उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. -४.४.३३**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उपलब्ध होऊ शकला असता | १४२ | ४८.४७ |
| २ | उपलब्ध होऊ शकला नसता | ८८ | ३०.०३ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ५५ | १८.७७ |
| ४ | प्रतिसाद नाही | ८ | २.७३ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का याबाबत ग्रामसेवकांचे अभिप्राय घेतले असता १४२(४८.४७%) ग्रामसेवकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला असता असे अभिप्राय दिले आहेत तर ८८(३०.०३%) ग्रामसेवकांनी सदरील उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांव्दारे निधी उपलब्ध होऊ शकला नसता असे अभिप्राय दिले आहेत. १८.७७ % ग्रामसेवक सदर माहितीबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.४.३८) पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांच्या पुनरावृत्तीबाबत

**तक्ता क्र. -४.४.३४**

| अ.क्र. | पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रम/कामांची पुनरावृत्ती झाली आहे/होत आहे? असे आपणास वाटते का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | १२.९७ |
| २ | नाही | २४८ | ८४.६४ |
| ३ | प्रतिसाद नाही | ७ | २.३९ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

एकूण २९३ ग्रामसेवकांच्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २४८(८४.६४%) ग्रामसेवकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत आहे असे नमूद केले आहे तर ३८(१२.९७%) ग्रामसेवकांनी पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम/कामांची पुनरावृत्ती होत नाही असे नमूद केलले आहे.

### ४.४.३९) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत

**तक्ता क्र. -४.४.३५**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २४६ | ८३.९६ |
| २ | नाही | ४३ | १४.६८ |
| ३ | प्रतिसाद नाही | ४ | १.३६ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

**आलेख क्र.- ४.४.११**




उपरोक्त तक्त्यानुसार पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले असल्याचे २४६(८३.९६%) ग्रामसेवकांनी नमूद केले आहे तर ४३(१४.६८%) ग्रामसेवकांनी सदर उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.४०) लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.३६**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे लेखापरिक्षण झाले असल्यास ते कोणी केले? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सनदी लेखापाल | ४ | १.६३ |
| २ | स्थानिक निधी लेखापरीक्षक | २४० | ९७.५६ |
| ३ | प्रतिसाद नाही | ३ | १.२२ |
| **एकूण** | | **२४६** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे लेखापरीक्षण झाले आहे असे नमूद केलेल्या २४६ ग्रामसेवकांपैकी जास्तीत जास्त लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षक यांचेमार्फत केले असल्याचे ग्रामसेवकांनी नमूद केले आहे.

### ४.४.४१) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत

**तक्ता क्र. -४.४.३७**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५५ | ५२.९० |
| २ | नाही | १३५ | ४६.०८ |
| ३ | प्रतिसाद नाही | ३ | १.०२ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे १५५(५२.९०%) ग्रामसेवकांनी अभिप्राय दिले आहेत तर १३५(४६.०८%) ग्रामसेवकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.४.४२) मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.३८**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन कोणामार्फत करण्यात आले? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | ११७ | ७५.४८ |
| २ | ग्राम विकास विभाग | १६ | १०.३२ |
| ३ | आदिवासी विकास विभाग | १२ | ७.७४ |
| ४ | त्रयस्थ यंत्रणा | १३ | ८.३९ |
| ५ | प्रतिसाद नाही | ८ | ५.१६ |
| **एकूण** | | **१५५** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे अभिप्राय दिलेल्या १५५ ग्रामसेवकांपैकी, जास्तीत जास्त ११७(७५.४८%) ग्रामसेवकांनी सदर मूल्यमापन जिल्हा परिषदेमार्फत, १६(१०.३२%) ग्रामसेवकांनी ग्राम विकास विभागामार्फत तर १३ (८.३९%) ग्रामसेवकांनी त्रयस्थ यंत्रणेमार्फत मूल्यमापन करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.४.४३) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत

**तक्ता क्र. -४.४.३९**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २१५ | ७३.३८ |
| २ | नाही | ७० | २३.८९ |
| ३ | प्रतिसाद नाही | ८ | २.७३ |
| **एकूण** | | **२९३** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे २१५(७३.३८%) ग्रामसेवकांनी अभिप्राय दिले आहेत तर ७०(२३.८९%) ग्रामसेवकांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.४.४४) सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.४.४०**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण कोणी केले? | ग्रामसेवक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | २०९ | ९७.२१ |
| २ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | ४० | १८.६० |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | ४० | १८.६० |
| ४ | राज्यस्तरीय अधिकारी | ४ | १.८६ |
| ५ | प्रतिसाद नाही | ५ | २.३३ |
| **एकूण** | | **२१५** | |

**आलेख क्र.- ४.४.१२**



पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे अभिप्राय दिलेल्या २१५ ग्रामसेवकांपैकी जास्तीत जास्त २०९(९७.२१%) ग्रामसेवकांनी सदर सनियंत्रण गट विकास अधिकारी यांचेमार्फत तर ४(१.८६%) ग्रामसेवकांनी राज्यस्तरीय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.

**४.४.४५) पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामसेवकांनी सुचविलेल्या उपाययोजना**

१. ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी/ग्रामपंचायत सदस्य यांचे प्रशिक्षण व्हावे.
२. पेसा ५ % अबंध निधीमध्ये वाढ करावी जेणेकरून गावांमध्ये मोठी कामे करता येतील.
३. पेसा कायद्याची अंमलबजावणी व ५ % अबंध निधीसाठी सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करावी.
४. पेसा ५% अबंध निधी आराखडे अपलोड करण्याची सुविधा मिळावी. जेणेकरून कामात पारदर्शकता निर्माण होऊन गतिमानता येईल व सनियंत्रणही होईल.
५. पेसा ५% अबंध निधी वेळेवर उपलब्ध व्हावा.
६. गावपातळीवर ग्रामस्थांसाठी पेसा कायद्याबाबत शिबीर/कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.
७. पेसा कायदा अंमलबजावणीसाठी राज्य पेसा कक्षाचा विस्तार व्हावा.
८. पेसा ५ % अबंध निधी खर्चाबाबत वर्गीकरण न करता निधी आवश्यक त्याठिकाणी खर्च करण्यास मुबा मिळावी.
९. पेसा कायदा अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र यंत्रणा/कक्षाची निर्मिती व्हावी.
१०. गावांमध्ये पेसा कायद्याची व्यापक स्वरूपात जनजागृतीसाठी प्रचार व प्रसिद्धी व्हावी. यासाठी शासनाकडून अतिरिक्त निधी, प्रचार व प्रसिद्धीसाठी साधने उपलब्ध व्हावीत.
११. प्रत्येक पेसा गाव निहाय स्वतंत्र निधीचे व्यवस्थापन व्हावे.
१२. विकास कामांचे आर्थिक नियोजन करणेसाठी पेसाची स्वतंत्र यंत्रणा उभारावी
१३. पेसा गावस्तरावर स्वतंत्र कार्यालय असावे.
१४.पेसा कायदाविषयक शासन निर्णयामध्ये बदल करावा.
१५.पेसा ५ % अबंध निधीचे वार्षिक लेखापरीक्षण करण्यात यावे.
१६. पेसा कायद्यांतर्गत स्थापन झालेल्या सर्व स्थायी समित्यांचे प्रशिक्षण घ्यावे.
१७.पेसा कायदा अंमलबजावणी व ५ % अबंध निधीचे संनियंत्रण राज्य पेसा कक्षामार्फत करण्यात यावे.
१८. जंगलातून मिळणारी वन औषधी यासाठी स्थानिक पातळीवर मार्केट उपलब्ध व्हावे.
१९. पेसा कायदा विषयक शासन निर्णयांचे संबंधित सर्व विभागाकडून काटेकोर पालन व्हावे.
२०.पेसा विषयक सर्व समित्यांमार्फत कामकाज व्हावे.
२१. शासन निर्णयामध्ये स्पष्टता असावी.





**क्षेत्रिय भेटीदरम्यान माहिती घेताना अन्वेषक**

## ४.५ ग्रामसभा कोष अध्यक्ष/सदस्य यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना विकास कामे करण्यासाठी ५% अबंध निधी देण्यात येतो. पेसा कायद्याला बळकटी देण्याच्या दृष्टीने हा एक महत्वाचा निर्णय आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध नियम १०१४ मधील १४ मध्ये ग्रामसभा कोष स्थापन करण्याची तरतुद केली आहे. प्रत्येक ग्रामसभेसाठी एक ग्रामसभा कोष व या ग्रामसभाकोषासाठी ग्रामसभा कोष समिती स्थापन करण्यात येते. ग्रामसभेमार्फत दोन ग्रामसभा सदस्यांची निवड ग्रामसभा कोष समितीसाठी करण्यात येते. ग्रामसेवक हा ग्रामसभा कोष समितीचा पदसिध्द सदस्य असतो. ग्रामसभा कोषामध्ये जमा झालेल्या निधीचा विनियोग ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली करण्यात येतो.

ग्रामसभा कोष समितीमधील सदस्यांना पेसा कायद्याबाबतची माहिती, समितीच्या कामकाजामधील त्यांचा सहभाग, पेसा कायदा अंमलबजावणी, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेले उपक्रम इ.मुद्यांवर माहिती संकलित केली आहे.

मूल्यमापनाअंतर्गत एकूण ८५२ गावांना भेटी देवुन विहीत प्रपत्रात माहिती संकलित केलेली आहे. त्यापैकी एकूण ११२ गावांमध्ये भेटीच्या दिवशी ग्रामसभा कोष समिती स्थापन नव्हती. चंद्रपुर, ठाणे, धुळे, नंदूरबार, नांदेड, पालघर, गडचिरोली व यवतमाळ या जिल्ह्यांतील ११२ गावांत माहिती संकलनाच्या वेळी ग्रामसभा कोष समिती स्थापन केलेली नव्हती तसेच समिती कार्यरत नव्हती त्यामुळे त्यांचेकडून माहिती संकलित करता आलेली नाही. माहिती अप्राप्त असलेल्या या ११२ गावांना वगळून उर्वरित ७४० गावातील ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष/सदस्य यांचेकडील प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

### ४.५.१) ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/ सदस्य यांचा जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.१**

| अ.क्र. | जिल्हा | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३२ | ४.३२ |
| २ | अहमदनगर | १७ | २.३० |
| ३ | गडचिरोली | १४० | १८.९२ |
| ४ | चंद्रपूर | १५ | २.०३ |
| ५ | जळगाव | ९ | १.२१ |
| ६ | ठाणे | ७० | ९.४६ |
| ७ | धुळे | ५४ | ७.३० |
| ८ | नंदुरबार | ५५ | ७.४३ |
| ९ | नांदेड | ११ | १.४९ |
| १० | नाशिक | १४८ | २०.०० |
| ११ | पालघर | १४४ | १९.४६ |
| १२ | पुणे | १२ | १.६२ |
| १३ | यवतमाळ | ३३ | ४.४६ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार माहिती संकलित केलेल्या ७४० ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/सदस्यांपैकी सर्वात जास्त १४८(२०%) अध्यक्ष/सदस्य नाशिक जिल्ह्यातील आहेत. तर सर्वात कमी ९(१.२१%) अध्यक्ष/सदस्य जळगाव जिल्ह्यातील आहेत.

### ४.५.२) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२**

| अ.क्र. | आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३३८ | ४५.६७ |
| २ | नाही | ३८९ | ५२.५७ |
| ३ | प्रतिसाद नाही | १३ | १.७६ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

एकूण ७४० ग्रामसभा कोष अध्यक्ष/ सदस्यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, ३३८(४५.६७%) अध्यक्ष/ सदस्यांना पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे तर ३८९(५२.५७%) अध्यक्ष/ सदस्यांना पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळालेले नाही.

५०% पेक्षा जास्त ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष /सदस्यांना अद्याप प्रशिक्षण मिळाले नाही. पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व ग्रामसभा कोष अध्यक्ष / सदस्यांना प्रशिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

### ४.५.३) पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.३**

| अ.क्र. | जिल्हा | आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का ? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | ० | ३२ | ० | ३२ |
| २ | अहमदनगर | १३ | ४ | ० | १७ |
| ३ | गडचिरोली | ७८ | ६१ | १ | १४० |
| ४ | चंद्रपूर | ५ | १० | ० | १५ |
| ५ | जळगाव | ३ | ५ | १ | ९ |
| ६ | ठाणे | २९ | ३९ | २ | ७० |
| ७ | धुळे | ७ | ४७ | ० | ५४ |
| ८ | नंदुरबार | ४३ | १२ | ० | ५५ |
| ९ | नांदेड | ५ | ६ | ० | ११ |
| १० | नाशिक | ६४ | ८३ | १ | १४८ |
| ११ | पालघर | ७२ | ६५ | ७ | १४४ |
| १२ | पुणे | ९ | ३ | ० | १२ |
| १३ | यवतमाळ | १० | २२ | १ | ३३ |
| **एकूण** | | **३३८** | **३८९** | **१३** | **७४०** |

उपरोक्त तक्त्यामध्ये ग्रामसभा कोष अध्यक्ष/सदस्यांना पेसा कायदा विषयक प्रशिक्षणाचा जिल्हानिहाय तपशिल देण्यात आला आहे. उपरोक्त तक्त्यानुसार जास्तीत जास्त अमरावती जिल्ह्यातील ३२ (१००%) अध्यक्ष/सदस्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाले नसल्याचे दिसून येते. त्याखालोखाल धुळे, यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यातील  अध्यक्ष/सदस्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण  न मिळण्याचे प्रमाण जास्त  दिसून येते.

नंदुरबार, अहमदनगर तसेच पुणे जिल्ह्यातील अध्यक्ष/सदस्यांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळाल्याचे प्रमाण जास्त  दिसून येते.

### ४.५.४) पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले याचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.४**

| अ.क्र. | स्त्रोत | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | २३ | ६.८० |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिती | २९३ | ८६.६९ |
| ३ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | १९ | ५.६२ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | १५ | ४.४४ |
| ५ | इतर (नमूद करावे) | ६ | १.७८ |
| ६ | प्रतिसाद नाही | १० | २.९६ |
| **एकूण** | | **३३८** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.- ४.५.१**




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार प्रशिक्षण मिळालेल्या ३३८ ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष/सदस्य यांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले याबाबत विश्लेषण केले असता असे आढळून येते की, जास्तीत जास्त २९३(८६.६९%) अध्यक्ष/सदस्यांना जिल्हा परिषद/पंचायत समिती यांचेमार्फत, २३(६.८०%) अध्यक्ष/ सदस्यांना यशदा पुणेमार्फत तर १९(५.६२%) अध्यक्ष/ सदस्यांना ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रामार्फत पेसा

कायद्याचे प्रशिक्षण मिळाले आहे. ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्षांना यशदा पुणे मार्फत प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून येते.

### ४.५.५) गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत

**तक्ता क्र. -४.५.५**

| अ.क्र. | आपल्या गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१६ | ५६.२२ |
| २ | नाही | १६९ | २२.८४ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १४१ | १९.०५ |
| ४ | प्रतिसाद नाही | १४ | १.८९ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार ४१६(५६.२२%) अध्यक्ष/ सदस्यांनी त्यांच्या गावात पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली तर १६९(२२.८४%) अध्यक्ष/ सदस्यांनी त्यांच्या गावात पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नाही असे नमूद केले आहे. १४१(१९.०५%) अध्यक्ष/सदस्य त्यांच्या गावात पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली किंवा कसे याबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.५.६) गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.६**

| अ.क्र. | जिल्हा | आपल्या गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे का? | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | माहितीबाबत अनभिज्ञ | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | १ | २९ | १ | १ | ३२ |
| २ | अहमदनगर | १४ | ० | ३ | ० | १७ |
| ३ | गडचिरोली | ९४ | २६ | २० | ० | १४० |
| ४ | चंद्रपूर | ७ | ६ | २ | ० | १५ |
| ५ | जळगाव | ९ | ० | ० | ० | ९ |
| ६ | ठाणे | ३५ | ९ | २३ | ३ | ७० |
| ७ | धुळे | १५ | ७ | २९ | ३ | ५४ |
| ८ | नंदुरबार | ३६ | ११ | ८ | ० | ५५ |
| ९ | नांदेड | ६ | ५ | ० | ० | ११ |
| १० | नाशिक | ७६ | ४५ | २६ | १ | १४८ |
| ११ | पालघर | ९१ | २२ | २५ | ६ | १४४ |
| १२ | पुणे | ११ | १ | ० | ० | १२ |
| १३ | यवतमाळ | २१ | ८ | ४ | ० | ३३ |
| **एकूण** | | **४१६** | **१६९** | **१४१** | **१४** | **७४०** |

**आलेख क्र.- ४.५.२**




ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/ सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार गावामध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबत जिल्हानिहाय विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, अमरावती, नाशिक जिल्ह्यातील गावांमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी जास्त प्रमाणात झाली नाही .

### ४.५.७) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम

**तक्ता क्र. -४.५.७**

| अ.क्र. | तपशिल | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासनामार्फत | ८१ | १९.४७ |
| २ | स्वयंसेवी संस्था | १८ | ४.३३ |
| ३ | सामाजिक कार्यकर्ते | ११ | २.६४ |
| ४ | शैक्षणिक संस्था | ७ | १.६८ |
| ५ | ग्रामपंचायत | ३६५ | ८७.७४ |
| ६ | इतर (ग्रामसभा कोष,पंचायत समिती इ.) | ५ | १.२० |
| ७ | ग्रामसभा | २ | ०.४८ |
| ८ | प्रतिसाद नाही | १ | ०.२४ |
| **एकूण** | | **४१६** | |

**टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी कोणकोणत्या माध्यमातुन करण्यात आलेली आहे याचे विश्लेषण केले असता, सर्वात जास्त ३६५(८७.७४%) अध्यक्ष/ सदस्यांनी ग्रामपंचायतीमार्फत, ८१(१९.४७%) अध्यक्ष/ सदस्यांनी शासनामार्फत, १८(४.३३%) अध्यक्ष/ सदस्यांनी स्वयंसेवी संस्थांमार्फत पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी केल्याचे दिसून येते.

### ४.५. ८) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे माध्यम/साधन

**तक्ता क्र. -४.५.८**

| अ.क्र. | माध्यम/साधन | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चित्ररथ | २१ | ५.०४८ |
| २ | माहिती फलक | २७७ | ६६.५९ |
| ३ | गावपातळीवर कार्यशाळा | १०३ | २४.७६ |
| ४ | ग्रामसभेमध्ये माहिती दिली | २५९ | ६२.२६ |
| ५ | प्रचार फेरी | ३४ | ८.१७ |
| ६ | कलापथक/पथनाट्य | ५२ | १२.५ |
| ७ | व्हिडिओ फिल्म सादरीकरण | १३ | ३.१२५ |
| ८ | पेसा दिनदर्शिका | ७७ | १८.५१ |
| ९ | भिंती फलक | १ | ०.२४ |
| १० | उपक्रम राबविण्यात आले नाही | १ | ०.२४ |
| ११ | प्रतिसाद नाही | २ | ०.४८१ |
| **एकूण** | | **४१६** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

**आलेख क्र.-४.५.३**




पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी केलेली आहे असे नमूद केलेल्या ४१६ ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/ सदस्यांपैकी २७७(६६.५९%) अध्यक्ष/ सदस्यांनी सदर कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती फलक हा उपक्रम राबविलेला आहे असे सांगितले. २५९(६२.२६%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभेमध्ये माहिती देणे,

१०३(२४.७६%) अध्यक्ष/सदस्यांनी गावपातळीवर कार्यशाळा, ७७(१८.५१%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा दिनदर्शिका, ५२(१२.५%) अध्यक्ष/ सदस्यांनी कलापथक/पथनाट्य तर ३४(८.१७%) अध्यक्ष/सदस्यांनी प्रचार फेरी इत्यादी उपक्रम पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आल्याचे सांगितले.




**पेसा कायद्याच्या प्रचार- प्रसारासाठी भिंतीवर लिहीलेली पेसा कायद्याची माहिती**

### ४.५.९) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यातील निधीच्या तरतूदीबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.५.९**

| अ.क्र. | पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी गावाच्या वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८६ | ५२.१६ |
| २ | नाही | १४७ | १९.८६ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १९४ | २६.२२ |
| ४ | प्रतिसाद नाही | १३ | १.७६ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार ३८६(५२.१६%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली असल्याचे तर १४७ (१९.८६%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.५.१०) ग्रामसभा कोष समितीची स्थापना कोणामार्फत करण्यात आली याबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.५.१०**

| अ.क्र. | तपशिल | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा | ६७४ | ९१.०८ |
| २ | ग्रामपंचायत | ५९ | ७.९७ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १९ | २.५७ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५ | ०.६८ |
| **एकूण** | | **७४०** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

मूल्यमापनाअंतर्गत माहिती संकलित केलेल्या ७४० ग्रामसभा कोष समिती अध्यक्ष/ सदस्यांपैकी ६७४(९१.०८%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष समितीची स्थापना ग्रामसभेमार्फत तर ५९(७.९७%) अध्यक्ष/ सदस्यांनी ग्रामपंचायतीमार्फत ग्रामसभा कोष समितीची स्थापना केल्याचे सांगितले.

### ४.५.११) ग्रामसभा कोष समितीचा कालावधी

**तक्ता क्र. -४.५.११**

| अ.क्र. | कालावधी | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एक वर्ष | ११ | १.४९ |
| २ | दोन वर्ष | १५२ | २०.५४ |
| ३ | पाच वर्ष | ४८९ | ६६.०८ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ८२ | ११.०८ |
| ५ | प्रतिसाद नाही | ६ | ०.८१ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात ग्रामसभा कोष समितीच्या कालावधीचा तपशिल दिलेला आहे. जास्तीत जास्त ४८९(६६.०८%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष समितीचा कालावधी पाच वर्षे, १५२(२०.५४%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष समितीचा कालावधी दोन वर्षे तर ११(१.४९%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष समितीचा कालावधी  एक वर्षे असल्याचे नमूद केले आहे. ८२(११.०८%) अध्यक्ष/सदस्य ग्रामसभा कोष समितीचा कालावधी किती वर्षे आहे याबाबत अनभिज्ञ आहेत.

**ग्रामसभा कोष समितीच्या अध्यक्ष/ सदस्यांनी सांगितलेल्या कालावधीमध्ये भिन्नता दिसून येत आहे.**

### ४.५.१२) ग्रामसभा कोष समिती कामकाजाच्या स्वतंत्र बैठकांबाबत

**तक्ता क्र. -४.५.१२**

| अ.क्र. | ग्रामसभा कोष समिती कामकाजाच्या स्वतंत्र बैठका होतात का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५१ | ४७.४३ |
| २ | नाही | ३६५ | ४९.३३ |
| ३ | प्रतिसाद नाही | २४ | ३.२४ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

एकूण ७४० अध्यक्ष/सदस्यांकडून सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होतात का याबाबत तपशिल घेतला असता ३५१ (४७.४३%) अध्यक्ष/सदस्यांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होतात असे नमूद केले आहे तर ३६५(४९.३३%) अध्यक्ष/सदस्यांनी सर्व समित्यांच्या स्वतंत्र बैठका होत नाहीत असे नमूद केले आहे. २४(३.२४%) अध्यक्ष/सदस्यांनी याबाबत काहिही प्रतिसाद दिला नाही.

### ४.५.१३) ग्रामसभा कोष समितीच्या कामकाजातील अध्यक्ष/सदस्यांचा सहभाग

**तक्ता क्र. -४.५.१३**

| अ.क्र. | ग्रामसभा कोष समितीच्या कामकाजात आपण सहभागी होतात का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५५५ | ७५.०० |
| २ | नाही | १७० | २२.९७ |
| ३ | प्रतिसाद नाही | १५ | २.०३ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार माहिती नोंदविलेल्या ७४० अध्यक्ष/सदस्यांपैकी ५५५ (७५%) अध्यक्ष/सदस्य ग्रामसभा कोष समितीच्या कामकाजात सहभागी होतात तर १७०(२२.९७%) अध्यक्ष/सदस्य ग्रामसभा कोष समितीच्या कामकाजात सहभागी होत नसल्याचे आढळून येते.

### ४.५.१४) ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्यांचा समितीच्या कामकाजातील सहभाग

**तक्ता क्र. -४.५.१४**

| अ.क्र. | ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्य समितीच्या कामकाजात सहभागी होतात का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१४ | ६९.४६ |
| २ | नाही | २१९ | २९.५९ |
| ३ | प्रतिसाद नाही | ७ | ०.९५ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्य समितीच्या कामकाजात सहभागी होतात असे ५१४(६९.४६%) अध्यक्ष/सदस्यांनी तर ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्य समितीच्या कामकाजात सहभागी होत नाहित असे २१९(२९.५९%) अध्यक्ष/सदस्यांनी नमूद केले आहे.

**४.५.१५) सर्व सदस्य समितीच्या कामकाजात सहभागी होत नसल्याची कारणे खालीलप्रमाणे देण्यात आलेली आहेत.**

१. पेसा कायद्याची पुर्ण माहिती नसल्यामुळे.
२. समितीच्या बैठकीबाबतीत महत्त्व सर्व सदस्यांना माहिती नसल्याने.
३. गावातील समितीचे सर्व सदस्य फारसे महत्व देत नाहीत. काही सदस्य इच्छुक राहत नाहीत. कामानिमित्त बाहेर गावी जावे लागते.
४. शेती कामे, उपजिविका भागवणे यामुळे वेळ मिळत नाही.
५. वैयक्तिक लाभाच्या योजना नसल्याने.
६. अजुनपर्यंत समितीने कोणतेही कामकाज केले नाही. त्यामुळे सदस्य सहभागी झाले नाहीत.
७. Covid-१९ मध्ये सभा घेण्यात आल्या नाहीत.
८. बैठका घ्याव्यात याची कल्पना नाही. बैठकीबाबत ग्रामसेवक सुचना देत नाहीत.

**४.५.१६) गावामध्ये ग्रामसभेचे स्वतंत्र कार्यालयाबाबत**

**तक्ता क्र. -४.५.१५**

| अ.क्र. | आपल्या गावामध्ये ग्रामसभेचे स्वतंत्र कार्यालय आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५३ | २०.६७ |
| २ | नाही | ५६८ | ७६.७६ |
| ३ | प्रतिसाद नाही | १९ | २.५७ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार १५३(२०.६७%) गावांमध्ये ग्रामसभेचे स्वतंत्र कार्यालय असल्याचे दिसून येते तर ५६८(७६.७६%) गावांमध्ये ग्रामसभेचे स्वतंत्र कार्यालय नसल्याचे दिसून येते.

**४.५.१७) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत**

**तक्ता क्र. -४.५.१६**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८७ | ३८.७९ |
| २ | नाही | १६४ | २२.१६ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | २८१ | ३७.९७ |
| ४ | प्रतिसाद नाही | ८ | १.०८ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

माहिती नोंदविलेल्या ७४० अध्यक्ष/सदस्यांपैकी २८७(३८.७९%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे असा प्रतिसाद नोंदविलेला आहे

तर १६४(२२.१६%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नाही  असा प्रतिसाद नोंदविलेला आहे.

### ४.५.१८) पेसा कायदा विषयक काही अडचणी व समस्या उद्भवल्यास मार्गदर्शनाबाबत

पेसा कायद्याविषयक अडचणी निर्माण झाल्यास ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष/सदस्य विविध स्तरावरील अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन घेतात असे आढळून येते. विस्तार अधिकरी, पंचायत समिती, गट विकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, जिल्हा पेसा समन्वयक, तालुका पेसा समन्वयक, संबंधित विभाग प्रमुख, मोबीलायझर इत्यादींकडून मार्गदर्शन घेतले जात असल्याचे दिसून येते.

### ४.५.१९) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणांच्या उपलब्धतेबाबत

**तक्ता क्र. -४.५.१७**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९४ | २६.२२ |
| २ | नाही | १५२ | २०.५४ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३८६ | ५२.१६ |
| ४ | प्रतिसाद नाही | ८ | १.०८ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार, १९४(२६.२२%) अध्यक्ष/सदस्यांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे तर १५२(२०.५४%) अध्यक्ष/सदस्यांनी, पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. ३८६ (५२.१६%) अध्यक्ष/सदस्य याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.५.२०) ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या वापराबाबत

**तक्ता क्र. -४.५.१८**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२९ | ३०.९५ |
| २ | नाही | ४७ | ६.३५ |
| ३ | काही प्रमाणात | ३१३ | ४२.३० |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | १४१ | १९.०५ |
| ५ | प्रतिसाद नाही | १० | १.३५ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

**आलेख क्र.- ४.५.४**




पेसा कायद्यानुसार पेसा गावातील ग्रामपंचायती व ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त तक्त्यानुसार २२९(३०.९५%) अध्यक्ष/सदस्यांनी या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जातो तर या ४७(६.३५%) अध्यक्ष/सदस्यांनी तर या विशेष अधिकारांचा पूर्णपणे वापर केला जात नाही असे नमूद केले आहे. ग्रामपंचायती व ग्रामसभांना दिलेल्या विशेष अधिकारांचा काही प्रमाणात वापर केला जातो असे जास्तीत जास्त ३१३(४२.३०%) अध्यक्ष/सदस्यांनी नमूद केले आहे.



**पेसा ५ % अबंध निधीमधुन गावासाठी सौरदिवे**

### ४.५.२१) ग्रामसभा कोष समितीला देण्यात आलेल्या अधिकारांचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.१९**

| अ.क्र. | अधिकार | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा कोषातील निधीचा ताळमेळ घालणे | ४९८ | ६७.३० |
| २ | बेकायदेशीर व्यवहार ग्रामसभेच्या निदर्शनास आणून देणे | ३३२ | ४४.८६ |
| ३ | आर्थिक व्यवहारांना ग्रामसभेची मान्यता घेणे | ४४५ | ६०.१४ |
| ४ | ग्रामकोष समितीच्या मासिक बैठका घेणे | ३७३ | ५०.४१ |
| ५ | अद्याप कोणतेच अधिकार माहिती नाही | १४१ | १९.०५ |
| ६ | प्रतिसाद नाही | ३८ | ५.१४ |
| **एकूण** | | **७४०** | |

**टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.**

वरील तक्त्यामध्ये ७४० ग्रामसभा कोष अध्यक्ष/सदस्यांकडून माहिती संकलित केली आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, जास्तीत जास्त ४९८(६७.३०%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोषातील निधीचा ताळमेळ घालणे, ४४५(६०.१४%) अध्यक्ष/सदस्यांनी आर्थिक व्यवहारांना ग्रामसभेची मान्यता घेणे, ३७३(५०.४१%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामकोष समितीच्या मासिक बैठका घेणे हे अधिकार ग्रामसभा कोष समितीला देण्यात आल्याचे नमूद केले आहे. १४१(१९.०५%) अध्यक्ष/सदस्यांना समितीला कोणते अधिकार मिळाले आहेत याबाबत माहिती नाही.

### ४.५.२२) पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत

**तक्ता क्र. -४.५.२०**

| अ.क्र. | पेसा ५ % अबंध निधीबाबत आपल्या गावाचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५४४ | ७३.५१ |
| २ | नाही | ८२ | ११.०८ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १०३ | १३.९२ |
| ४ | प्रतिसाद नाही | ११ | १.४९ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार  ५४४ (७३.५१%) गावांचा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे तर ८२(११.०८%) गावांचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार करण्यात आला नाही असे आढळुन येते. १०३(१३.९२%) अध्यक्ष/ सदस्य सदरील माहितीबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.५.२३) पेसा ५% अबंध निधीच्या गावनिहाय वार्षिक आराखड्याबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२१**

| अ.क्र | जिल्हा | पेसा ५ % अबंध निधीबाबत आपल्या गावाचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे का? | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | माहितीबाबत अनभिज्ञ | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | ३१ | ० | ० | १ | ३२ |
| २ | अहमदनगर | १३ | ३ | १ | ० | १७ |
| ३ | गडचिरोली | १०८ | १२ | १७ | ३ | १४० |
| ४ | चंद्रपूर | १० | २ | ३ | ० | १५ |
| ५ | जळगाव | ६ | ० | २ | १ | ९ |
| ६ | ठाणे | ३२ | ४ | ३१ | ३ | ७० |
| ७ | धुळे | ११ | ३३ | ९ | १ | ५४ |
| ८ | नंदुरबार | ३७ | ११ | ६ | १ | ५५ |
| ९ | नांदेड | १० | ० | १ | ० | ११ |
| १० | नाशिक | १२९ | ६ | १३ | ० | १४८ |
| ११ | पालघर | १२१ | ८ | १४ | १ | १४४ |
| १२ | पुणे | १० | १ | १ | ० | १२ |
| १३ | यवतमाळ | २६ | २ | ५ | ० | ३३ |
| | **एकूण** | **५४४** | **८२** | **१०३** | **११** | **७४०** |

उपरोक्त तक्त्यात पेसा ५ % अबंध निधीबाबत गावाचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार करण्यात आला किंवा कसे याचा जिल्हानिहाय तपशिल दिलेला आहे. अमरावती, नांदेड, नाशिक, पालघर, पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावांनी पेसा ५ % अबंध निधीबाबत गावाचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार केला असल्याचे दिसून येते. धुळे जिल्ह्यांतील गावांमध्ये पेसा ५ % अबंध निधीबाबत गावाचा स्वतंत्र वार्षिक आराखडा तयार केला नसल्याचे प्रमाण जास्त दिसून येते.

### ४.५.२४) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामधील कामांचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२२**

| अ.क्र. | कामकाज तपशिल | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | ६३३ | ८५.५४ |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | ४२७ | ५७.७० |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | ६१६ | ८३.२४ |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | ३५३ | ४७.७० |
| ५ | प्रतिसाद नाही | ५७ | ७.७० |
| **एकूण** | | **७४०** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

**आलेख क्र.- ४.५.५**




उपरोक्त तक्ता व आलेखामध्ये पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत याबाबत माहिती दिली आहे. जास्तीत जास्त ६३३ (८५.५४%) अध्यक्ष/सदस्यांनी पायाभूत सुविधा, ६१६ (८३.२४%) अध्यक्ष/सदस्यांनी आरोग्य, स्वच्छता व शिक्षण तर सर्वात कमी ३५३(४७.७०%) अध्यक्ष/ सदस्यांनी वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका या क्षेत्रातील कामे घेण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.५.२५) पेसा ५ % अबंध निधीसाठी ग्रामसभा कोष समितीचे स्वतंत्र बँक खात्याबाबत तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२३**

| अ.क्र. | पेसा ५ % अबंध निधीसाठी ग्रामसभा कोष समितीचे स्वतंत्र बँक खाते आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६४० | ८६.४९ |
| २ | नाही | ५१ | ६.८९ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३८ | ५.१३ |
| ४ | प्रतिसाद नाही | ११ | १.४९ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

एकूण ७४० अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५ % अबंध निधीसाठी ग्रामसभा कोष समितीचे स्वतंत्र बँक खाते आहे किंवा कसे याबाबत माहिती दिली आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण केले असता ६४० (८६.४९%) ग्रामसभा कोष समितींचे पेसा ५ % अबंध निधीसाठी स्वतंत्र बँक खाते आहे तर ५१ (६.८९%) ग्रामसभा कोष समितींचे पेसा ५ % अबंध निधीसाठी स्वतंत्र बँक खाते नसल्याचे दिसून येते.

### ४.५.२६) ग्रामसभा कोष समितीचे अभिलेखे व विविध रजिस्टर जतन तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२४**

| अ.क्र. | तपशिल | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ४२० | ५६.७६ |
| २ | ग्रामसभा कोष | २३६ | ३१.८९ |
| ३ | जतन केले जात नाही | १३ | १.७६ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ९७ | १३.११ |
| ५ | प्रतिसाद नाही | १४ | १.८९ |
| **एकूण** | | **७४०** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

उपरोक्त तक्त्यामध्ये ग्रामसभा कोष समितीचे अभिलेखे व विविध रजिस्टर कोणामार्फत जतन केले जाते याबाबत ग्रामसभा कोष अध्यक्ष/सदस्य यांचेकडून माहिती घेतली आहे. उपरोक्त माहितीचे विश्लेषण केले असता जास्तीत जास्त ४२०(५६.७६%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामपंचायतींमार्फत तर २३६(३१.८९%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोषमार्फत सर्व अभिलेखे व विविध रजिस्टर यांचे जतन केले जाते असे नमूद केले आहे. १३(१.७६%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष समितीचे अभिलेखे व विविध रजिस्टर यांचे जतन केले जात नाही असा अभिप्राय दिला आहे.

### ४.५.२७) अद्यावत ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२५**

| अ.क्र. | नोंदवह्या | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा हजेरी पत्रक | ५०१ | ६७.७० |
| २ | ग्रामसभा कार्यवृतांत नोंदवही | ३४७ | ४६.८९ |
| ३ | ग्रामसभा कोष रोकड नोंदवही | ४४३ | ५९.८६ |
| ४ | ग्रामसभा कोष सामान्य पावती | २९१ | ३९.३२ |
| ५ | गाव मालमत्ता नोंदवही | २४४ | ३२.९७ |
| ६ | कामाच्या मोजमापाची नोंदवही | २७२ | ३६.७६ |
| ७ | कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचे हजेरीपट | २५० | ३३.७८ |
| ८ | प्रमाणक (व्हावचर नोंदवही) | ३१२ | ४२.१६ |
| ९ | वस्तुसाठा नोंदवही | २२१ | २९.८६ |
| १० | आवक-जावक नोंदवही | १९२ | २५.९५ |
| ११ | प्रतिसाद नाही | १३५ | १८.२४ |
| **एकूण** | | **७४०** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

**आलेख क्र.- ४.५.६**




शासन निर्णय २१ ऑगस्ट २०१५ नुसार पेसा गावात ग्रामसभेच्या कामकाजासंबंधाने एकूण १० नोंदवह्या ठेवणेबाबत परिशिष्ट -१ मध्ये निर्देश दिले आहेत. उपरोक्त तक्त्यात अद्यावत ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांचा तपशिल देण्यात आला आहे. जास्तीत जास्त ५०१ (६७.७०%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा हजेरी पत्रक, ४४३ (५९.८६%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कोष रोकड नोंदवही, ३४७ (४६.८९%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्रामसभा कार्यवृतांत नोंदवही तर सर्वात कमी १९२ (२५.९५%) अध्यक्ष/सदस्यांनी आवक-जावक नोंदवही अद्यावत ठेवल्याचे नमूद केले आहे.

### ४.५.२८) खर्च केलेल्या अबंध निधीमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा तपशिल

पेसा गावासाठी प्राप्त झालेल्या ५% अबंध निधीमधुन खालील उपक्रम राबविण्यात आल्याचे ग्रामसभा कोष अध्यक्ष/सदस्य यांनी सांगितले आहे.

१. **शैक्षणिक उपक्रम** - शाळा/अंगणवाडी दुरुस्ती, रंगरंगोटी, सुशोभीकरण, अंगणवाडी वर्गखोल्यांचे, स्वच्छता गृह बांधकाम, अंगणवाडी संरक्षण भिंत/कुंपण/तार कंपाउंड करणे, अंगणवाडी करीता गॅस कनेक्शन, वजन काटे खरेदी, अंगणवाडी व शाळेकरीता साहित्य खरेदी, गणवेश वाटप, स्कुल बॅग वाटप, शाळेस डिजिटल साहित्य देणे, पोषण आहार, शाळेसाठी टीव्ही, संगणक, साउंड सिस्टीम खरेदी, ई-लर्निंग सुविधा, वाचनालय इत्यादी उपक्रम राबविण्यात आले आहेत.

२. **पाणीपुरवठा** - पाणी पुरवठा व्यवस्था, पाण्याची टाकी बांधणे, पाणी शुद्धीकरण, विहीर व तलाव

खोलीकरण, विंधन विहिर, विहिरीतील गाळ काढणे, टँकर खरेदी, हातपंप व इलेक्ट्रिक मोटार खरेदी, पाण्याचा हौद, वॉटर प्युरीफायर, मिनी पाईप लाईन पाणी पुरवठा योजना इ.

३. **आरोग्य** - उपकेंद्रासाठी औषधे खरेदी व अँटीजन किट देणे, सॅनिटायझर, मास्क वाटप, महिलांसाठी व किशोर मुलींसाठी पॅड, अमृत आहार मदतनीस मानधन, आशा वर्कर मानधन इ.

४. **रस्ते/ गटारे** - रस्ते दुरुस्ती, रस्ता खडीकरण, रस्ता काँक्रीटीकरण, पेव्हर ब्लॉक बसविणे, स्मशानभूमी साठी रस्ता, स्मशानभूमीत पेव्हर ब्लॉक बसविणे, स्मशान घाट दुरुस्ती, भूमिगत गटार बांधणे, नाली बांधकाम करणे.

५. **विद्युतीकरण** – पथदीवे, सोलर पथदिवे, एल ई डी लाईट खरेदी, जि.प. शाळेला विद्युतीकरण व फिटिंग, इनर्व्हटर खरेदी, सोलर दुरुस्ती इ.

६. **वृक्षारोपण** - वृक्ष लागवड करणे, झाडांना कटळे करणे, गौणवनउपज लागवड, जैवविविधता गार्डन तयार करणे.

७. **सार्वजनिक स्वच्छता** - कंपोस्ट खड्डे तयार करणे, कचराकुंडी, घंटागाडी खरेदी, मुतारी बांधकाम इ.

८. **प्रशिक्षण** - महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण राबविणे.

९. **पेसा कायदा प्रचार व प्रसिद्धी** - विविध माध्यमांव्दारे पेसा कायद्याचा प्रचार- प्रसार करणे.

१०.**इतर उपक्रम** – अ. गावात बाकडे बसविणे, पार, ओटा बांधणे, सभामंडप, सभेकरिता खुर्ची खरेदी.
आ. आदीवासी वाद्य खरेदी, भजनी साहित्य, बँज्यो साहित्य खरेदी.
इ. गावासाठी ध्वनी प्रक्षेपक, सार्वजनिक साऊंड सिस्टीम खरेदी.
ई. जनावरांसाठी हौद, मत्स्यबीज, शेतकऱ्यांना पूरक अवजारे देणे.
उ. समाज मंदिर दुरुस्ती



**पेसा ५% अबंध निधी योजनेमधून गावासाठी पिण्याचे पाण्याची टाकी**

### ४.५.२९) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत

**तक्ता क्र. -४.५.२६**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४९० | ६६.२२ |
| २ | नाही | २२६ | ३०.५४ |
| ३ | प्रतिसाद नाही | २४ | ३.२४ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले असल्याचे ४९०(६६.२२%) अध्यक्ष/सदस्यांनी नमूद केले आहे तर २२६(३०.५४%) अध्यक्ष/सदस्यांनी लेखापरीक्षण झाले नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.५.३०) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२७**

| अ.क्र. | जिल्हा | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण झाले आहे का? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | ३१ | ० | १ | ३२ |
| २ | अहमदनगर | १३ | ४ | ० | १७ |
| ३ | गडचिरोली | ४२ | ९७ | १ | १४० |
| ४ | चंद्रपूर | ७ | ८ | ० | १५ |
| ५ | जळगाव | ७ | २ | ० | ९ |
| ६ | ठाणे | ५३ | ११ | ६ | ७० |
| ७ | धुळे | ६ | ४७ | १ | ५४ |
| ८ | नंदुरबार | ५३ | २ | ० | ५५ |
| ९ | नांदेड | ११ | ० | ० | ११ |
| १० | नाशिक | १२९ | १६ | ३ | १४८ |
| ११ | पालघर | ९७ | ३६ | ११ | १४४ |
| १२ | पुणे | ११ | १ | ० | १२ |
| १३ | यवतमाळ | ३० | २ | १ | ३३ |
| **एकूण** | | **४९०** | **२२६** | **२४** | **७४०** |

उपरोक्त तक्त्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षणाबाबत जिल्हानिहाय तपशिल दिला आहे. उपरोक्त तक्त्यानुसार अमरावती, नंदुरबार, पुणे, यवतमाळ व नाशिक या जिल्हयांमधील उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे तर

धुळे, गडचिरोली, चंद्रपुर या जिल्हयांतील उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण होण्याचे प्रमाण कमी असल्याचे निर्दशनास येते.

### ४.५.३१) लेखापरीक्षण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.२८**

| अ.क्र. | तपशिल | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक निधी लेखापरीक्षक | ४७१ | ९६.१२ |
| २ | सनदी लेखापाल | ८ | १.६३ |
| ३ | स्थानिक निधी लेखापरीक्षक व सनदी लेखापाल | २ | ०.४१ |
| ४ | प्रतिसाद नाही | ९ | १.८४ |
| **एकूण** | | **४९०** | **१००** |

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे लेखापरीक्षण झाल्याचे ४९० अध्यक्ष/सदस्यांनी नमूद केले आहे. जास्तीत जास्त ४७१(९६.१२%) लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षक यांचेमार्फत झाल्याचे दिसुन येते.

### ४.५.३२) पेसा ५% अबंध निधीच्या नोंदवह्यांबाबत

**तक्ता क्र. -४.५.२९**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१३ | ६९.३३ |
| २ | नाही | १९७ | २६.६२ |
| ३ | प्रतिसाद नाही | ३० | ४.०५ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार ५१३(६९.३३%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५% अबंध निधीच्या नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत तर १९७(२६.६२%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५% अबंध निधीच्या नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या नाहित असे नमूद केले आहे.

### ४.५.३३) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापनाबाबत

**तक्ता क्र. -४.५.३०**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का? | अध्यक्ष/ सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८५ | ३८.५२ |
| २ | नाही | ४३३ | ५८.५१ |
| ३ | प्रतिसाद नाही | २२ | २.९७ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

**आलेख क्र. - ४.५.७**




उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे असे २८५(३८.५२%) अध्यक्ष/सदस्यांनी तर ४३३(५८.५१%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

### ४.५.३४) मूल्यमापन केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.३१**

| अ.क्र. | यंत्रणा | अध्यक्ष/सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | २३३ | ८१.७५ |
| २ | ग्राम विकास विभाग | ३५ | १२.२८ |
| ३ | आदिवासी विकास विभाग | २८ | ९.८२ |
| ४ | त्रयस्थ यंत्रणा | २० | ७.०२ |
| ५ | लागू नाही | ९ | ३.१६ |
| ६ | प्रतिसाद नाही | ७ | २.४६ |
| **एकूण** | | **२८५** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

वरील तक्त्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन कोणामार्फत झाले आहे याचा तपशिल दिला आहे. जास्तीत जास्त २३३(८१.७५%) अध्यक्ष/सदस्यांनी सदर मूल्यमापन जिल्हा परिषदेमार्फत, ३५(१२.२८%) अध्यक्ष/सदस्यांनी ग्राम विकास विभागामार्फत, २८ (९.८२%) अध्यक्ष/सदस्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत तर २० (७.०२%) अध्यक्ष/सदस्यांनी त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

## ४.५.३५) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत

**तक्ता क्र. -४.५.३२**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का? | अध्यक्ष/सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८३ | ५१.७६ |
| २ | नाही | ३२९ | ४४.४६ |
| ३ | प्रतिसाद नाही | २८ | ३.७८ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यानुसार असे निर्देशनास येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असे ३८३(५१.७६%) अध्यक्ष/सदस्यांनी अभिप्राय दिले आहेत तर ३२९(४४.४६%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले नाही असे अभिप्राय दिले आहेत.

## ४.५.३६) पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रणाबाबत जिल्हानिहाय तपशिल

**तक्ता क्र. -४.५.३३**

| अ.क्र. | जिल्हा | पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | १ | २९ | २ | ३२ |
| २ | अहमदनगर | ५ | ११ | १ | १७ |
| ३ | गडचिरोली | ५५ | ८३ | २ | १४० |
| ४ | चंद्रपूर | ३ | १२ | ० | १५ |
| ५ | जळगाव | ६ | ३ | ० | ९ |
| ६ | ठाणे | ४६ | १५ | ९ | ७० |
| ७ | धुळे | ७ | ४५ | २ | ५४ |
| ८ | नंदुरबार | ३० | २४ | १ | ५५ |
| ९ | नांदेड | ९ | २ | ० | ११ |
| १० | नाशिक | ९७ | ४६ | ५ | १४८ |
| ११ | पालघर | ९६ | ४२ | ६ | १४४ |
| १२ | पुणे | ८ | ४ | ० | १२ |
| १३ | यवतमाळ | २० | १३ | ० | ३३ |
| **एकूण** | | **३८३** | **३२९** | **२८** | **७४०** |

**आलेख क्र. - ४.५.८**




उपरोक्त तक्त्यात पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविलेल्या उपक्रमांचे/ कामांचे संनियंत्रणाबाबत जिल्हानिहाय तपशिल दिला आहे. उपरोक्त तक्त्यानुसार नांदेड, जळगाव, पालघर, पुणे व ठाणे या जिल्हयांमधील उपक्रमांचे/ कामांचे संनियंत्रण जास्त प्रमाणात झाल्याचे तर अमरावती, धुळे व चंद्रपुर या जिल्हयांतील उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण कमी प्रमाणात झाल्याचे निर्दशनास येते.

### ४.५.३७) सनियंत्रण केलेल्या यंत्रणेचा तपशिल

**तक्ता क्र. -४.५.३४**

| अ.क्र. | यंत्रणा | अध्यक्ष/सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | ३७१ | ९६.८७ |
| २ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | ७० | १८.२८ |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | ३५ | ९.१४ |
| ४ | राज्यस्तरीय अधिकारी | ६ | १.५७ |
| ५ | प्रतिसाद नाही | १० | २.६१ |
| **एकूण** | | **३८३** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत)**

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे असा अभिप्राय दिलेल्या ३८३ अध्यक्ष/सदस्यांपैकी जास्तीत जास्त ३७१(९६.८७%) अध्यक्ष/सदस्यांनी उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण गट विकास अधिकारी यांचेमार्फत, ७०(१८.२८%) अध्यक्ष/सदस्यांनी, विस्तार

अधिकारी यांचेमार्फत तर सर्वात कमी ६ (१.५७%) अध्यक्ष/सदस्यांनी, राज्यस्तरीय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.५.३८) पेसा ५% अबंध निधी योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीबाबत

**तक्ता क्र. -४.५.३५**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधी योजनेतून आपल्या गावाला प्राप्त होणारा निधी पुरेसा आहे असे आपणास वाटते का? | अध्यक्ष/सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२७ | १७.१६ |
| २ | नाही | ३७९ | ५१.२२ |
| ३ | माहिती नाही | २१८ | २९.४६ |
| ४ | प्रतिसाद नाही | १६ | २.१६ |
| **एकूण** | | **७४०** | **१००** |

वरील तक्त्यामध्ये दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्देशनास येते की, १२७(१७.१६%) अध्यक्ष/सदस्यांनी पेसा ५% अबंध निधी योजनेतून गावाला प्राप्त होणारा निधी पुरेसा आहे तर ३७९(५१.२२%) अध्यक्ष/सदस्यांनी सदर निधी पुरेसा नाही असे नमूद केले आहे. २१८(२९.४६%) अध्यक्ष/सदस्य सदरील माहितीबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.५.३९) पेसा ५% अबंध निधी पुरेसा नसल्याची कारणे –

१. सदर निधी हा गावातल्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणात मिळतो तो पुरेसा नाही. त्या निधीमधून शैक्षणिक, सामाजिक सुरक्षेचे प्रश्न सुटत नाहीत.
२. मोठ्या स्वरूपातील कामे करता येत नाहीत.
३. लोकसंख्या खुप आहे तसेच घरे दूर अंतरावर (विखुरलेली) असल्यामुळे विकास कामे करण्यास निधी अपुरा पडतो.
४. गावातील समस्या जास्त असल्याने त्यासाठी निधी अपुरा पडतो.
५. लोकसंख्या कमी असल्याने व कार्यक्षेत्र जास्त असल्याने.
६. निधी अपुर्ण असल्याने विकासात्मक कामे सदरील आर्थिक वर्षात अपुर्ण ठेवुन पुढील वर्षात पुर्ण करावी लागतात.
७. उपलब्ध निधीत इमारती व विविध विकास बांधकामे पुर्ण करता येत नाहीत.
८. निधी गाव निहाय वाटप झाल्यानंतर कामे पुर्ण करता येत नाहीत.
९. निधी स्वतंत्र गावाना देण्यापेक्षा ग्रामपंचायतीस एकत्रित असल्यास, मोठ्या रक्कमेची कामे प्राधान्य क्रमानुसार घेण्यात येतील.
१०. गावाची विकासात्मक कामांची संख्या जास्त आहे त्याप्रमाणात निधी कमी पडतो.
११. अनुसूचित जमातीची लोकसंख्या फार कमी असल्यामुळे खुपच कमी निधी प्राप्त होतो. त्यामुळे कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी वेगळे नियोजन शासनाने करणे गरजेचे वाटते.

१२. लोकसंख्येचे वाढते प्रमाण, गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ, विखुरलेल्या वस्त्या, महागाई, निधीची विभागणी इत्यादीमुळे निधी अपुरा पडतो.

१३. पायाभूत सुविधेवरील बांधकाम करण्यास निधी अपुरा पडतो.

१४.गावातील पायाभूत सुविधा निधीअभावी पुर्ण होत नाहीत.

१५. शासन निर्णयानुसार कामे घेतल्यामुळे प्रत्येक बाबीवर पुरेसा खर्च करता येत नाही .



**ग्रामस्थांकडून माहिती घेताना अन्वेषक**

## ४.६ पेसा मोबिलायझर यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण :

पेसा अंतर्गत येणाऱ्या ग्रामसभांचे संसंगीकरण (Mobilisation) करण्यासाठी आणि पेसा अधिनियमांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने पेसा ग्रामपंचायतींमध्ये मोबिलायझरांची नियुक्ती केली आहे व त्यांची कर्तव्ये तसेच जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. शासकिय अधिकारी, आदिवासी विकास संस्था व ग्रामस्थ यांचेमधील दुवा बनुन मोबिलायझर यांना कामकाज करायचे आहे त्यामुळे त्यांचेकडील माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे.

मूल्यमापनाअंतर्गत एकूण २९३ ग्रामपंचायतींमधील पेसा मोबिलायझर यांचेकडून माहिती संकलित करण्याचे प्रस्तावित होते तथापि एकूण १९ ग्रामपंचायतींमधील मोबिलायझरची पदे रिक्त आहेत. गडचिरोली जिल्ह्यात ४, ठाणे, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात प्रत्येकी ३, पालघर जिल्ह्यात २ तर चंद्रपुर, जळगाव, पुणे व यवतमाळ या जिल्ह्यात प्रत्येकी १ अशी एकूण १९ पदे रिक्त आहेत. त्यामुळे एकूण २७४ पेसा मोबिलायझर यांचेकडून विहित प्रपत्रात माहिती संकलित केली आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

### ४.६.१) पेसा मोबिलायझर या पदावर निवड करणारी यंत्रणा

**तक्ता क्र.- ४.६.१**

| अ.क्र. | पेसा मोबिलायझर या पदावर आपली निवड कोणी केली? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ५ | १.८२ |
| २ | ग्रामपंचायत | १७ | ६.२० |
| ३ | ग्रामसेवक | ४ | १.४६ |
| ४ | ग्रामसभा | १४७ | ५३.६५ |
| ५ | महिला बचत गट | १२३ | ४४.८९ |
| ६ | प्रतिसाद नाही | २ | ०.७३ |
| | **एकूण** | **२७४** | |

**(टिप – उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. - ४.६.१**



उपरोक्त तक्त्यामध्ये पेसा मोबिलायझर यांची निवड कोणामार्फत करण्यात आली याबाबत तपशिल दिला आहे. जास्तीत जास्त १४७(५३.६५%) मोबिलायझरची निवड ग्रामसभेमार्फत, १२३(४४.८९%) मोबिलायझरची निवड महिला बचत गटामार्फत तर सर्वात कमी ४ (१.४६%) मोबिलायझरची निवड ग्रामसेवकांमार्फत झाल्याचे दिसून येते.

### ४.६.२) पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाबाबतची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.२**

| अ.क्र. | पेसा व वनहक्क कायद्याबाबतचे आपले प्रशिक्षण झाले आहे का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०६ | ७५.१८ |
| २ | नाही | ६१ | २२.२६ |
| ३ | प्रतिसाद नाही | ७ | २.५६ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

**आलेख क्र. - ४.६.२**




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार एकूण २७४ पेसा मोबिलायझर यांचे पेसा व वनहक्क कायद्याबाबतचे प्रशिक्षण झाले आहे का याबाबत माहिती घेतली असता २०६ (७५.१८%) मोबिलायझरचे प्रशिक्षण झाले आहे तसेच ६१ (२२.२६%) मोबिलायझरचे प्रशिक्षण झाले नाही असे आढळून येते. ७ (२.५६%) मोबिलायझरनी याबाबत काहिही प्रतिसाद दिलेला नाही.

### ४.६.३) पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाविषयी मोबिलायझर यांची जिल्हानिहाय माहिती

**तक्ता क्र.- ४.६.३**

| अ.क्र. | जिल्हा | पेसा व वनहक्क कायद्याबाबतचे आपले प्रशिक्षण झाले आहे का? | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | प्रतिसाद नाही | एकूण |
| १ | अमरावती | ७ | ३ | १ | ११ |
| २ | अहमदनगर | ८ | ० | ० | ८ |
| ३ | गडचिरोली | २८ | ४ | २ | ३४ |
| ४ | चंद्रपूर | ३ | ४ | १ | ८ |
| ५ | जळगाव | २ | ० | ० | २ |
| ६ | ठाणे | १५ | ३ | ० | १८ |
| ७ | धुळे | ९ | ३ | ० | १२ |
| ८ | नंदुरबार | ३७ | ११ | १ | ४९ |
| ९ | नांदेड | १ | ११ | ० | १२ |
| १० | नाशिक | ४८ | ८ | ० | ५६ |
| ११ | पालघर | ३४ | ५ | १ | ४० |
| १२ | पुणे | ८ | ० | ० | ८ |
| १३ | यवतमाळ | ६ | ९ | १ | १६ |
| **एकूण** | | **२०६** | **६१** | **७** | **२७४** |

उपरोक्त तक्त्यात पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रशिक्षणाविषयी मोबिलायझर यांचा जिल्हानिहाय तपशिल देण्यात आलेला आहे. अहमदनगर, पुणे, नाशिक व पालघर या जिल्ह्यांत प्रशिक्षण झालेल्या मोबिलायझरांचे प्रमाण जास्त आढळून येते तर नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यांत प्रशिक्षण न झालेल्या मोबिलायझरांचे प्रमाण जास्त आढळून येते.

### ४.६.४) पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामधून पेसा मोबिलायझर या पदाची कर्तव्ये व जबाबदारीच्या आकलनाबाबत माहिती

**तक्ता क्र.- ४.६.४**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामधून आपल्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी आपणास समजली आहे का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २२३ | ८१.३९ |
| २ | नाही | ४५ | १६.४२ |
| ३ | प्रतिसाद नाही | ६ | २.१९ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

पेसा कायद्याच्या प्रशिक्षणामधून पेसा मोबिलायझर या पदाची कर्तव्ये व जबाबदारी पेसा मोबिलायझर यांनी समजली आहे किंवा कसे याबाबत माहिती घेतली असता, २२३ (८१.३९%) मोबिलायझरनी त्यांना या पदाची कर्तव्ये व जबाबदारी समजली असल्याचे नमूद केले आहे तर ४५ (१६.४२%) मोबिलायझरनी त्यांना या पदाची कर्तव्ये व जबाबदारी समजली नसल्याचे नमूद केले आहे.

गाव स्तरावर पेसा मोबिलायझर पार पाडत असलेल्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. गावामध्ये घरोघरी प्रत्येक्ष गृहभेटी देऊन ग्रामसभेची माहिती देणे/ग्रामसभेच्या सूचना लोकांपर्यंत पोहचविणे.
२. ग्रामसभेत पेसा विषयक माहिती देणे.
३. ग्रामसभेत होणारे निर्णय गावातील लोकांपर्यंत पोहचविणे.
४. गावामध्ये पेसा कायदाविषयक जनजागृती करणे.
५. ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाला कामकाजामध्ये मदत करणे.
६. गृहभेटी देऊन आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, वनहक्क कायदा याविषयी माहिती देणे.
७. बालविवाह बंदी बाबत जनजागृती करणे.
८. बचत गटांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.
९. महिला ग्रामसभेचे आयोजन करणे.
१०. ग्रामसेवक व सरपंच यांनी दिलेली कामे करणे.
११. गावातील लोकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पुरविणे.
१२. ग्रामसभेच्या कार्यवृत्तांत तयार करणे व ग्रामसभेच्या ठरावानुसार कार्यवाही व पत्रव्यवहार करणे.
१३. गावामध्ये पेसा ५% अबंध निधीबाबत माहिती देणे.




**महिलांसाठी रोजगार प्रशिक्षण**

### ४.६.५) प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेच्या आयोजनाबाबतची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.५**

| अ.क्र. | प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन केले जाते का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७८ | ६४.९६ |
| २ | नाही | ४७ | १७.१५ |
| ३ | कधी-कधी | ४६ | १६.७९ |
| ४ | प्रतिसाद नाही | ३ | १.१० |
| | **एकूण** | **२७४** | **१००** |

**आलेख क्र. -४.६.३**




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार १७८ (६४.९६%) मोबिलायझरनी प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन केले जाते असे मत नोंदविलेले आहे. ४७ (१७.१५%) मोबिलायझरनी प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन केले जात नाही तर ४६ (१६.७९%) मोबिलायझरनी कधी कधीच ग्रामसभेचे आयोजन केले जाते असे मत नोंदविलेले आहे.

### ४.६.६) पेसा मोबिलयझरनी प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यात येत नसल्यास त्याची कारणे पुढीलप्रमाणे दिली आहेत.

१. सर्व लोकांना ग्रामपंचायत कार्यालय सोयीचे असल्याने तेथेच ग्रामसभा आयोजित होतात.

२. गावातील ग्रामस्थ ग्रामसभेस उपस्थित राहत नाहीत त्यामुळे कोरम पुर्ण होत नाही.

### ४.६.७) ग्रामसभेचे आयोजन करणेकरिता मोबिलायझरमार्फत करण्यात येणाऱ्या बाबी

**तक्ता क्र.- ४.६.६**

| अ.क्र. | प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करणेकरिता आपण काय करता? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गृहभेटी देणे | २१२ | ७७.३७ |
| २ | ग्रामसभेची नोटीस लोकांना देणे | १७९ | ६५.३३ |
| ३ | जनजागृती / प्रचार व प्रसिद्धी करणे | २ | ०.७३ |
| ४ | दवंडी देतो | ७ | २.५५ |
| ५ | इतर बाबी (दूरध्वनीव्दारे निरोप, वार्डमध्ये नोटीस लावणे इ.) | ४ | १.४६ |
| ६ | प्रतिसाद नाही | ७ | २.५५ |
| **एकूण** | | **२७४** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. -४.६.४**




उपरोक्त तक्त्यात प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करणेकरीता पेसा मोबिलायझर यांचेमार्फत कोणकोणत्या बाबी करण्यात येतात याचा तपशिल दिलेला आहे. जास्तीत जास्त २१२ (७७.३७%) मोबिलायझरनी गृहभेटी देणे, १७९ (६५.३३%) मोबिलायझरनी ग्रामसभेची नोटीस लोकांना देणे तर ७ (२.५५%) मोबिलायझरनी दवंडी देणे इत्यादी बाबी करण्यात येतात असे नमूद केले आहे.

### ४.६.८) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचनाबाबतची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.७**

| अ.क्र. | ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १८१ | ६६.०६ |
| २ | नाही | ५५ | २०.०७ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३४ | १२.४१ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४ | १.४६ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का याबाबत पेसा मोबिलायझर यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, १८१ (६६.०६%) मोबिलायझरनी ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे तर ५५ (२०.०७%) मोबिलायझरनी ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले नाही असे नमूद केले आहे. ३४ (१२.४१%) मोबिलायझरनी याबाबत काहीही माहिती नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.६.९) ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती दिलेला स्त्रोत

**तक्ता क्र.- ४.६.८**

| अ.क्र. | पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी | ७० | २५.५५ |
| २ | ग्रामसेवक | २७ | ९.८५ |
| ३ | सरपंच | ८४ | ३०.६६ |
| ४ | पेसा समन्वयक | १०९ | ३९.७८ |
| ५ | स्वयंसेवी संस्था | ६ | २.१९ |
| ६ | मोबिलायझर | ३ | १.०९ |
| ७ | माहिती अद्याप पर्यंत दिली नाही | ४६ | १६.७९ |
| ८ | माहितीबाबत अनभिज्ञ | ७ | २.५५ |
| ९ | प्रतिसाद नाही | ११ | ४.०१ |
| **एकूण** | | **२७४** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. -४.६.५**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली याबाबत तपशिल दिला आहे. सर्वात जास्त माहिती पेसा समन्वयक यांचेमार्फत दिल्याचे १०९(३९.७८%) मोबिलायझरनी नमूद केले आहे. ८४(३०.६६%) मोबिलायझरनी सरपंचामार्फत, ७०(२५.५५%) मोबिलायझरनी जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी यांचेमार्फत तर २७(९.८५%) मोबिलायझरनी ग्रामसेवकामार्फत पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला देण्यात आल्याचे नमूद केले आहे. ४६(१६.७९%) मोबिलायझरनी पेसा कायद्याची माहिती अद्यापही ग्रामसभेला दिली नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.६.१०) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीबाबतची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.९**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २०६ | ७५.१८ |
| २ | नाही | ४१ | १४.९६ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | २२ | ८.०३ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५ | १.८३ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

आलेख क्र. -४.६.६




पेसा मोबिलायझर कार्यरत क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबत पेसा मोबिलायझर यांचे अभिप्राय घेतले असता २०६(७५.१८%) मोबिलायझरनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली तर ४१(१४.९६%) मोबिलायझरनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली नाही असे नमूद केले आहे. २२(८.०३%) मोबिलायझरनी याबाबत काहिही माहिती नसल्याचे नमूद केले आहे.

### ४.६.११) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीचे माध्यम

**तक्ता क्र.- ४.६.१०**

| अ.क्र. | पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी झाली असल्यास कोणामार्फत करण्यात आली? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासनामार्फत | ४६ | २२.३३ |
| २ | स्वयंसेवी संस्था | १४ | ६.८० |
| ३ | सामाजिक कार्यकर्ते | ५ | २.४३ |
| ४ | शैक्षणिक संस्था | ४ | १.९४ |
| ५ | ग्रामपंचायत | १६५ | ८०.१० |
| ६ | पेसा मोबिलायझर | ११४ | ५५.३४ |
| ७ | तालुका पेसा समन्वयक | २ | ०.९७ |
| | **एकूण** | **२०६** | |

(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)

**आलेख क्र. - ४.६.७**




उपरोक्त तक्त्यानुसार पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी कोणकोणत्या माध्यमातुन करण्यात आली याचे विश्लेषण केले असता, सर्वात जास्त १६५(८०.१०%) मोबिलायझरनी ग्रामपंचायतीमार्फत, ११४(५५.३४%) मोबिलायझरनी स्वत: त्यांचेमार्फत तर ४६(२२.३३%) मोबिलायझरनी शासनामार्फत पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी केल्याचे दिसून येते.

### ४.६.१२) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांविषयीची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.११**

| अ.क्र. | प्रचार व प्रसिद्धीसाठीचे उपक्रम | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चित्ररथ | ११ | ५.३४ |
| २ | माहिती फलक | १३९ | ६७.४८ |
| ३ | गावपातळीवर कार्यशाळा | ५७ | २७.६७ |
| ४ | ग्रामसभेमध्ये माहिती मिळाली | ११६ | ५६.३१ |
| ५ | प्रचार फेरी | ३२ | १५.५३ |
| ६ | कलापथक/पथनाट्य | ३१ | १५.०५ |
| ७ | व्हिडिओ फिल्म सादरीकरण | १४ | ६.८० |
| ८ | पेसा कॅलेंडर | ५५ | २६.७० |
| ९ | गृहभेटी दिल्या | २ | ०.९७ |
| १२ | प्रतिसाद नाही | २ | ०.९७ |
| **एकूण** | | **२०६** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. - ४.६.८**




ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी केली आहे असे नमूद केलेल्या २०६ पेसा मोबिलायझरपैकी १३९(६७.४८%) मोबिलायझरनी सदर कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती फलक, ११६(५६.३१%) मोबिलायझरनी ग्रामसभेमध्ये माहिती देणे, ५७(२७.६७%) मोबिलायझरनी गावपातळीवर कार्यशाळा, ५५(२६.७०%) मोबिलायझरनी पेसा दिनदर्शिका इत्यादी उपक्रम पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आल्याचे नमूद केले आहे.



**पारंपारिक होळी सण साजरा करताना ग्रामस्थ**

**४.६.१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये स्थापन केलेल्या पेसा विषयक समित्यांची माहिती**

**तक्ता क्र.- ४.६.१२**

| अ.क्र. | पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये स्थापन केलेल्या समित्या | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा कोष समिती | २५३ | ९२.३४ |
| २ | साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती | १२७ | ४६.३५ |
| ३ | शांतता समिती | ११५ | ४१.९७ |
| ४ | बाजार समिती | ४७ | १७.१५ |
| ५ | मादक द्रव्य नियंत्रण समिती | १०० | ३६.५० |
| ६ | ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती | ९० | ३२.८५ |
| ७ | न्याय समिती | ७४ | २७.०१ |
| ८ | कर्ज नियंत्रण समिती | ५२ | १८.९८ |
| ९ | माहितीबाबत अनभिज्ञ | १० | ३.६५ |
| १० | प्रतिसाद नाही | ४ | १.४६ |
| **एकूण** | | **२७४** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. -४.६.९**




पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध समित्या स्थापन करण्यात येतात. उपरोक्त तक्त्यामध्ये ग्रामपंचायतीमध्ये स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचा तपशिल देण्यात आला आहे. जास्तीत

जास्त २५३ (९२.३४%) मोबिलायझरनी ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा कोष समिती, १२७(४६.३५%) मोबिलायझरनी साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती तर सर्वात कमी ४७(१७.१५%) मोबिलायझरनी बाजार समिती स्थापन केल्याचे नमूद केले आहे.

### ४.६.१४) ग्रामसभेच्या कामकाजातील सहभागाबाबत

**तक्ता क्र.- ४.६.१३**

| अ.क्र. | ग्रामसभेच्या कामकाजात आपण सहभागी होता का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २५६ | ९३.४३ |
| २ | नाही | १३ | ४.७४ |
| ३ | प्रतिसाद नाही | ५ | १.८३ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, २५६ (९३.४३%) पेसा मोबिलायझर ग्रामसभेच्या कामकाजात सहभागी होतात तर १३ (४.७४%) पेसा मोबिलायझर ग्रामसभेच्या कामकाजात सहभागी होत नाहीत.

### ४.६.१५) पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकारांच्या पूर्णपणे वापराबाबतची माहिती

**तक्ता क्र.- ४.६.१४**

| अ.क्र. | पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे का? | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२६ | ४५.९८ |
| २ | नाही | १४ | ५.११ |
| ३ | काही प्रमाणात | ११२ | ४०.८८ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | १६ | ५.८४ |
| ५ | प्रतिसाद नाही | ६ | २.१९ |
| **एकूण** | | **२७४** | **१००** |

पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे किंवा कसे याबाबत पेसा मोबिलायझर यांचेकडून माहिती घेतली असता असे आढळून येते की, १२६ (४५.९८%) मोबिलायझरनी पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात आहे असे मत नोंदविलेले आहे तर १४ (५.११%) मोबिलायझरनी या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जात नाही असे मत नोंदविलेले आहे. ११२ (४०.८८%) मोबिलायझरनी सदर विशेष अधिकाराचा वापर काही प्रमाणात केला जातो असे मत नोंदविलेले आहे.

### ४.६.१६) ग्रामपंचायती व ग्रामसभा यांचेमार्फत पूर्णपणे वापर करण्यात येणाऱ्या विशेष अधिकारांचा तपशिल

**तक्ता क्र.- ४.६.१५**

| अ.क्र. | पूर्णपणे वापरण्यात येणारे विशेष अधिकार | मोबिलायझर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | ४८ | ३८.१० |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ६० | ४७.६२ |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | ३१ | २४.६० |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | २९ | २३.०२ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध / नियमन | ४४ | ३४.९२ |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | ४६ | ३६.५१ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | २४ | १९.०५ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | १७ | १३.४९ |
| ९ | सावकारी करण्यावर नियंत्रण | २१ | १६.६७ |
| १० | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | ८ | ६.३५ |
| ११ | प्रतिसाद नाही | ६ | ४.७६ |
| | **एकूण** | **१२६** | |

**(टिप — उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. -४.६.१०**




एकूण १२६ मोबिलायझरनी पेसा कायद्यानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा यांना मिळालेल्या विशेष अधिकाराचा पूर्णपणे वापर केला जातो असे नमूद केले आहे. सर्वात जास्त ६०(४७.६२%) मोबिलायझरनी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन या विशेष अधिकाराचा, ४८(३८.१०%) मोबिलायझरनी विकास

प्रकल्पांसाठी जमीन संपादन या विशेष अधिकाराचा तर सर्वात कमी ८(६.३५%) मोबिलायझरनी संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण या विशेष अधिकाराचा वापर करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

**४.६.१७) पेसा कायद्याच्या जनजागृतीसाठी पेसा मोबिलायझर मार्फत करण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयीची माहिती**

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पेसा मोबिलायझर हा महत्वाचा घटक आहे. पेसा कायद्याच्या जनजागृतीसाठी पेसा मोबिलायझर यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. बचत गटाच्या महिलांना मासिक बैठकीच्या वेळी पेसा कायद्याची माहिती देणे.

२. गृहभेटी देऊन पेसा कायद्या बाबत माहिती देणे.

३. गावामध्ये पेसा कायदाविषयक माहिती फलक लावणे.

४. पाडा/वाडा/वस्तीवर जाऊन पेसा कायद्याची जनजागृती करणे.

५. गृहभेटी देऊन पेसा ५% अबंध निधीबाबत माहिती देणे.

६. ग्रामसभेत पेसा कायद्याची माहिती सांगणे.

७. गावातील चावडीवर पेसा कायद्याची माहिती सांगणे व चर्चा करणे.

८. पेसा कायद्याने मिळालेले अधिकार लोकांना समजावून सांगणे.

९. पाडा/वाडा/वस्ती वर जाऊन पेसा कायदा विषयक कार्यशाळा घेणे.

१०. आदिवासी भाषेत गावातील लोकांना पेसा कायद्याची माहिती सांगणे.

**४.६.१८) गावात काम करत असताना पेसा मोबिलायझर यांना येणाऱ्या अडचणींबाबत गावात काम करीत असताना पेसा मोबिलायझर यांना येणाऱ्या अडचणी पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या आहेत**.

१. मानधन कमी असल्याने पूर्ण वेळ काम करता येत नाही.

२. ग्रामपंचायती पासून पेसा गावे/वाडा/पाडा यांचे अंतर जास्त असल्याने क्षेत्रभेटीस अडचणी येतात.

३. पेसा ५ % अबंध निधी आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात गावाला प्राप्त होत असल्याने गैर आदिवासींचे पेसा कायद्याला विरोध केला जात आहे.

४. ग्रामसभा कोष समिती व्यतिरिक्त इतर स्थायी समितीचे शासन स्तरावरून प्रशिक्षण होणे अत्यावश्यक आहे.

५. प्रशिक्षण नसल्यामुळे पेसा कायदा अंमलबाजवणी कामकाज करण्यास अडचण निर्माण होते.

६. गावामध्ये लोकांचे सहकार्य मिळत नाही.

७. पेसा ५ % अबंध निधी कमी प्रमाणात मिळतो.

८. काही पेसा गावांमध्ये राजकीय अडचणींना सामोरे जावे लागते.

९. ग्रामस्थांना ग्रामसभेची माहिती देऊन देखील ते ग्रामसभेस उपस्थित राहत नाहीत.

१०. गावामध्ये पेसा कायद्याची माहिती देताना ग्रामस्थ प्रतिसाद देत नाहीत.



**ग्रामस्थांकडून मुलाखत अनुसूची भरून घेताना अन्वेषक**

## ४.७ ग्रामस्थ यांचेकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण

सदर मूल्यमापनासाठी एकूण ८५२ पेसा गावांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक गावामधुन यादृच्छिक पध्दतीचा (Simple random sampling) अवलंब करून ५ ग्रामस्थांची निवड केली आहे व त्यांचेकडून मुलाखत अनुसूचीमध्ये माहिती संकलित केली आहे. एकूण ४२६० ग्रामस्थांची माहिती संकलन करण्याचे प्रस्तावित होते तथापि ठाणे जिल्ह्यातील २ पेसा गावे ओसाड असल्यामुळे १० ग्रामस्थांची माहिती संकलित करता आली नाही. त्यामुळे एकूण ४२५० ग्रामस्थांकडील प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

### ४.७.१) ग्रामस्थांच्या पेसा कायद्याविषयक माहितीचा तपशिल

**तक्ता क्र. -४.७.१**

| अ.क्र. | पेसा कायद्याची आपणास माहिती आहे का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १४०२ | ३२.९९ |
| २ | नाही | १७७१ | ४१.६७ |
| ३ | थोडक्यात | १०५० | २४.७१ |
| ४ | प्रतिसाद नाही | २७ | ०.६३ |
| | **एकूण** | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र.- ४.७.१**




पेसा कायदा अंमलबजावणीमध्ये ग्रामसभा पर्यायाने ग्रामस्थांची महत्वाची भूमिका आहे. पेसा कायद्याविषयक ग्रामस्थांना कितपत माहिती आहे याबाबत विश्लेषण केले असता असे आढळून येते की, १४०२(३२.९९%) ग्रामस्थांना या कायद्याची माहिती आहे तर १७७१(४१.६७%) ग्रामस्थांना या कायद्याची माहिती नाही. १०५०(२४.७१%) ग्रामस्थांना या कायद्याची थोडक्यात माहिती आहे.

४०% पेक्षा जास्त ग्रामस्थांना या कायद्याची माहिती नसून पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने हि गंभीर बाब आहे.

## ४.७.२) पेसा कायद्याची माहिती मिळण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. - ४.७.२**

| अ.क्र. | माहिती मिळण्याचा स्त्रोत | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कायदा वाचून | २०५ | ८.३६ |
| २ | प्रशिक्षणाद्वारे | २४९ | १०.१५ |
| ३ | स्वयंसेवी संस्था | ४७ | १.९२ |
| ४ | शासनाचे अधिकारी | १६१ | ६.५७ |
| ५ | प्रसिद्धी माध्यमांद्वारे | १८१ | ७.३८ |
| ६ | गावातील व्यक्ती/मित्र | ३७२ | १५.१७ |
| ७ | सरपंच | ५६५ | २३.०४ |
| ८ | ग्रामसेवक | १२७३ | ५१.९२ |
| ९ | ग्रामपंचायत/ग्रामसभा | १०९० | ४४.४५ |
| १० | अद्याप माहिती नाही | ५१ | २.०८ |
| ११ | पेसा समनव्यक | २ | ०.०८ |
| १२ | मोबिलायझर | १ | ०.०४ |
| १३ | पुस्तकातून माहिती मिळाली | १ | ०.०४ |
| १४ | प्रतिसाद नाही | १ | ०.०४ |
| **एकूण** | | **२४५०** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

उपरोक्त तक्त्यात ग्रामस्थांना पेसा कायद्याची माहिती कोणामार्फत मिळाली याबाबत तपशिल दिला आहे. सर्वात जास्त १२७३(५१.९२%) ग्रामस्थांना पेसा कायद्याची माहिती ग्रामसेवकांच्या मार्फत मिळाल्याचे आढळून येते. १०९०(४४.४५%) ग्रामस्थांना ग्रामपंचायत/ग्रामसभांमार्फत, ५६५(२३.०४%) ग्रामस्थांना सरपंचांमार्फत तर सर्वात कमी १ (०.०४%) ग्रामस्थांना मोबिलायझर तसेच पुस्तकातुन पेसा कायद्याची माहिती मिळाल्याचे आढळून येते.

## ४.७.३) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस ग्रामस्थांच्या उपस्थितीबाबत माहिती

**तक्ता क्र. -४.७.३**

| अ.क्र. | ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस आपण उपस्थित होतात का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १८२८ | ४३.०१ |
| २ | नाही | १८५३ | ४३.६० |
| ३ | वाचन झाले नाही | ५२१ | १२.२६ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४८ | १.१३ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र.- ४.७.२**




ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करणेबाबत शासन निर्णयानुसार निर्देश दिलेले आहेत. माहिती संकलन केलेल्या एकूण ४२५० ग्रामस्थांपैकी १८२८(४३.०१%) ग्रामस्थांनी ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस ते उपस्थित होते तर १८५३(४३.६०%) ग्रामस्थांनी ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन करते वेळेस ते उपस्थित नव्हते असे नमूद केले आहे. ५२१(१२.२६%) ग्रामस्थांनी ग्रामसभेत पेसा कायद्याचे अद्याप वाचन झाले नसल्याचे नमूद केले आहे.

पेसा कायद्याबाबत ग्रामस्थांना माहिती होणेसाठी ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याचे वाचन होणे तसेच ग्रामस्थांची ग्रामसभेला उपस्थिती असणे अत्यंत आवश्यक आहे.

### ४.७.४) पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला देण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. -४.७.४**

| अ.क्र. | पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ५०८ | २७.७९ |
| २ | ग्रामसेवक | १५३३ | ८३.८६ |
| ३ | पेसा समन्वयक | ५१७ | २८.२८ |
| ४ | जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी | २२१ | १२.०९ |
| ५ | स्वयंसेवी संस्था | ४२ | २.३० |
| ६ | माहिती अद्याप पर्यंत दिली नाही | ९ | ०.४९ |
| ७ | माहितीबाबत अनभिज्ञ | ४ | ०.२२ |
| ८ | प्रतिसाद नाही | १४ | ०.७७ |
| **एकूण** | | **१८२८** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र.- ४.७.३**




उपरोक्त तक्त्यात पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली याबाबत ग्रामस्थांकडून माहिती घेतलेली आहे. सर्वात जास्त १५३३ (८३.८६%) ग्रामस्थांनी ग्रामसेवकांमार्फत, ५१७(२८.२८%) ग्रामस्थांनी पेसा समन्वयकांमार्फत, ५०८(२७.७९%) ग्रामस्थांनी सरपंचांमार्फत तर सर्वात कमी ४२(२.३०%) ग्रामस्थांनी स्वयंसेवी संस्थांमार्फत पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला दिल्याचे नमूद केले आहे.

### ४.७.५) पेसा कायद्याच्या प्रशिक्षणाविषयीची माहिती

**तक्ता क्र. -४.७.५**

| अ.क्र. | आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६३७ | १४.९९ |
| २ | नाही | ३५१० | ८२.५९ |
| ३ | प्रतिसाद नाही | १०३ | २.४२ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

वरील तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, ६३७(१४.९९%) ग्रामस्थांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळालेले आहे तर ३५१०(८२.५९%) ग्रामस्थांना पेसा कायदाविषयक प्रशिक्षण मिळालेले नाही.

### ४.७.६) पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. -४.७.६**

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा स्त्रोत | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशदा, पुणे | ४५ | ७.०६ |
| २ | जिल्हा परिषद/पंचायत समिती | ४०६ | ६३.७४ |
| ३ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | १०३ | १६.१७ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | ६० | ९.४२ |
| ५ | प्रतिसाद नाही | २५ | ३.९२ |
| **एकूण** | | **६३७** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

**आलेख क्र. - ४.७.४**




पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळालेले आहे असे नमूद केलेल्या ६३७ ग्रामस्थांपैकी सर्वात जास्त ४०६ (६३.७४%) ग्रामस्थांना जिल्हा परिषद/पंचायत समितीमार्फत, १०३ (१६.१७%) ग्रामस्थांना ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रामार्फत तर सर्वात कमी ४५(७.०६%) ग्रामस्थांना यशदा, पुणे मार्फत प्रशिक्षण मिळाले आहे.

### ४.७.७) ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीविषयीची माहिती

**तक्ता क्र. -४.७.७**

| अ.क्र. | आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेला आहे का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७५९ | ४१.३९ |
| २ | नाही | ९४४ | २२.२१ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १४७३ | ३४.६६ |
| ४ | प्रतिसाद नाही | ७४ | १.७४ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र. -४.७.५**




उपरोक्त तक्त्यात ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली किंवा कसे याबाबत माहिती दिली आहे. उपरोक्त माहितीनुसार १७५९ (४१.३९%) ग्रामस्थांनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली आहे तर ९४४ (२२.२१%) ग्रामस्थांनी त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली नाही असे नमूद केले आहे. १४७३ (३४.६६%) ग्रामस्थ या माहितीबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

### ४.७.८) पेसा कायद्याविषयी करण्यात आलेल्या प्रचार व प्रसिद्धीसंबंधीची माहिती

तक्ता क्र. -४.७.८

| अ.क्र. | पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी झाली असल्यास कोणामार्फत करण्यात आली ? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शासन/शासकीय कर्मचारी | २३४ | १३.३० |
| २ | स्वयंसेवी संस्था | ५८ | ३.३० |
| ३ | सामाजिक कार्यकर्ते | ६७ | ३.८१ |
| ४ | शैक्षणिक संस्था | ९ | ०.५१ |
| ५ | ग्रामपंचायत | १६४२ | ९३.३५ |
| ६ | माहितीबाबत अनभिज्ञ | ३० | १.७१ |
| ७ | तालुका पेसा समन्वयक | १ | ०.०६ |
| ८ | मोबिलायझर | १ | ०.०६ |
| ९ | प्रतिसाद नाही | २१ | १.१९ |
| | **एकूण** | **१७५९** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

एकूण १७५९ ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी विविध माध्यमांव्दारे झाल्याचे दिसुन येते. सर्वात जास्त १६४२ (९३.३५%) ग्रामस्थांनी ग्रामपंचायतींमार्फत, २३४ (१३.३०%) ग्रामस्थांनी शासन/शासकीय कर्मचारी यांचेमार्फत तर सर्वात कमी १(०.०६%) ग्रामस्थांनी तालुका पेसा समन्वयक तसेच मोबिलायझर यांचेमार्फत प्रचार प्रसिध्दी करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

### ४.७.९) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम

तक्ता क्र. -४.७.९

| अ.क्र. | प्रचार व प्रसिद्धीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चित्ररथ | ७० | ३.९८ |
| २ | माहिती फलक | ११९३ | ६७.८२ |
| ३ | गावपातळीवर कार्यशाळा | ३१७ | १८.०२ |
| ४ | ग्रामसभेमध्ये माहिती देणे | ९९३ | ५६.४५ |
| ५ | प्रचार फेरी | १४७ | ८.३६ |
| ६ | कलापथक/पथनाट्य | २४५ | १३.९३ |
| ७ | व्हिडिओ फिल्म सादरीकरण | ४५ | २.५६ |
| ८ | कोणतेच उपक्रम घेतले नाही | १३ | ०.७४ |
| ९ | पेसा कॅलेंडर | २९२ | १६.६० |
| १० | माहितीबाबत अनभिज्ञ | ३८ | २.१६ |
| ११ | तालुका पेसा समन्वयकव्दारे माहिती देणे | १ | ०.०६ |
| १२ | प्रतिसाद नाही | २८ | १.५९ |
| | **एकूण** | **१७५९** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात आलेली आहे असे नमूद केलेल्या एकूण १७५९ ग्रामस्थांपैकी सर्वात जास्त ११९३(६७.८२%) ग्रामस्थांनी माहिती फलक लावणे, ९९३(५६.४५%) ग्रामस्थांनी पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेमध्ये देणे, ३१७(१८.०२%) ग्रामस्थांनी गावपातळीवर कार्यशाळा घेणे तर सर्वात कमी १(०.०६%) ग्रामस्थांनी तालुकर पेसा समन्वयकव्दारे प्रचार प्रसार करणे इत्यादी उपक्रम पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी राबविण्यात आल्याचे नमूद केले आहे.




**पेसा ५% निधीअंतर्गत डिजीटल शाळा, गाव- अलवान, जि - नंदूरबार**

### ४.७.१०) ग्रामसभेच्या बैठकांच्या नियमित उपस्थितीबाबत

**तक्ता क्र. -४.७.१०**

| अ.क्र. | आपण ग्रामसभेच्या बैठकांना नियमितपणे उपस्थित राहता का ? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७८९ | ४२.०९ |
| २ | नाही | ७४४ | १७.५१ |
| ३ | कधी-कधी | १६८६ | ३९.६७ |
| ४ | प्रतिसाद नाही | ३१ | ०.७३ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात नमूद माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, १७८९(४२.०९%) ग्रामस्थ ग्रामसभेच्या बैठकांना नियमितपणे उपस्थित राहतात, ७४४(१७.५१%) ग्रामस्थ ग्रामसभेच्या बैठकांना नियमितपणे उपस्थित राहत नाहीत तर १६८६(३९.६७%) ग्रामस्थ ग्रामसभेच्या बैठकांना कधी-कधी उपस्थित राहतात.

**ग्रामसभेत अनुपस्थित राहण्याची खालील कारणे ग्रामस्थांनी दिलेली आहेत.**

१. शेतीची कामे/इतर कामे असतात.
२. वैयक्तिक लाभ होत नसल्यामुळे.
३. ग्रामसभा वेळेवर होत नाहीत.
४. खाजगी नोकरी असल्याने तसेच मजुरी/रोजगारासाठी बाहेर गावी जावे लागते.
५. ग्रामसभा कधी होते याबाबत माहिती मिळत नाही/पूर्व सूचना मिळत नाही.
६. ग्रामसभेचा अजेंडा मिळत नाही.
७. गावापासून ग्रामपंचायतीचे अंतर जास्त असल्याने.
८. ग्रामसभेस उपस्थित राहण्यास इच्छुक नाही.

### ४.७.११) पेसा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेणेबाबत माहिती

**तक्ता क्र. —४.७.११**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेण्यात येतात का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५४८ | ३६.४२ |
| २ | नाही | १३९३ | ३२.७८ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १२४२ | २९.२२ |
| ४ | प्रतिसाद नाही | ६७ | १.५८ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र. - ४.७.६**




पेसा ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेण्यात येतात का याबाबत माहिती घेतली असता असे निर्दशनास येते की, १५४८(३६.४२%) ग्रामस्थांनी ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेण्यात येतात असे नमूद केले आहे तर १३९३(३२.७८%) ग्रामस्थांनी ५% अबंध निधीबाबत स्वतंत्र ग्रामसभा घेण्यात येत नाहीत असे नमूद केले आहे.

### ४.७.१२) गावातील विविध विकास कामे ठरविण्यासाठी ग्रामसभेत सूचना करणेसंबंधीची माहिती

**तक्ता क्र. -४.७.१२**

| अ.क्र. | गावातील विविध विकास कामे ठरविण्यासाठी आपण ग्रामसभेत सूचना करता का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २६६६ | ६२.७३ |
| २ | नाही | १४६९ | ३४.५६ |
| ३ | प्रतिसाद नाही | ११५ | २.७१ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र.- ४.७.७**




पेसा गावाच्या विकासामध्ये ग्रामस्थांचा ग्रामसभेतील सक्रिय सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. गावातील विविध विकास कामे ठरविण्यासाठी ग्रामसभेत सुचना करणेबाबत ग्रामस्थांकडून अभिप्राय घेतले असता असे निर्दशनास येते की, २६६६(६२.७३%) ग्रामस्थांनी ते ग्रामसभेत सुचना करतात असा अभिप्राय दिला आहे तर १४६९(३४.५६%) ग्रामस्थांनी ते ग्रामसभेत सुचना करीत नाहीत असा अभिप्राय दिला आहे.

### ४.७.१३) ग्रामसभेत घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत तपशिल

**तक्ता क्र. - ४.७.१३**

| अ.क्र. | ग्रामसभेत सर्वानुमते निर्णय घेतले जातात का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २६३६ | ६२.०२ |
| २ | नाही | ३१९ | ७.५१ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १२३६ | २९.०८ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५९ | १.३९ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात गावामध्ये होणाऱ्या ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेतले जातात किंवा कसे याबाबत तपशिल दिला आहे. उपरोक्त तक्त्यानुसार २६३६(६२.०२%) ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेतले जातात तर ३१९(७.५१%) ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेतले जात नाहित असे मत नोंदविलेले आहे. १२३६(२९.०८%) ग्रामस्थ सदर माहितीबाबत अनभिज्ञ असून ५९(१.३९%) ग्रामस्थांनी याबाबत काहिही प्रतिसाद दिला नाही.

## ४.७.१४) पेसा कायद्यानुसार मिळालेले अधिकाराविषयीची माहिती

**तक्ता क्र. -४.७.१४**

| अ.क्र. | अधिकार | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन | ५०६ | ११.९१ |
| २ | लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन | ७७६ | १८.२६ |
| ३ | गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे | २६७ | ६.२८ |
| ४ | गौण खनिजांचे उत्खनन | ४५३ | १०.६६ |
| ५ | मादक द्रव्यांची विक्री व सेवनावर निर्बंध व विनियोग | ४४८ | १०.५४ |
| ६ | गौण वन उत्पादन मालकी | १२७२ | २९.९३ |
| ७ | जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध | ३७२ | ८.७५ |
| ८ | ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन | २६८ | ६.३१ |
| ९ | सावकारी करण्यावर नियंत्रण | २४३ | ५.७२ |
| १० | संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण | २१८ | ५.१३ |
| ११ | माहितीबाबत अनभिज्ञ | १९१३ | ४५.०१ |
| १२ | प्रतिसाद नाही | १६५ | ३.८८ |
| **एकूण** | | **४२५०** | |

**(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)**

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभेला दिलेल्या अधिकारांबाबत ग्रामस्थांना माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वात जास्त १९१३(४५.०१%) ग्रामस्थ त्यांना कोणते अधिकार प्राप्त आहेत याबाबत अनभिज्ञ आहेत. १२७२(२९.९३%) ग्रामस्थांनी त्यांना गौण वन उत्पादन मालकी या अधिकाराबाबत, ७७६(१८.२६%) ग्रामस्थांनी त्यांना लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन या अधिकाराबाबत तर सर्वात कमी २१८(५.१३%) ग्रामस्थांनी त्यांना संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण या अधिकाराबाबत माहिती असल्याचे नमूद केले आहे.

### ४.७.१५) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेल्या कामांविषयीची माहिती

**तक्ता क्र. -४.७.१५**

| अ.क्र. | पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये घेण्यात आलेली कामे | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पायाभूत सुविधा | २०८९ | ४९.१५ |
| २ | पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी | ११५० | २७.०६ |
| ३ | आरोग्य, स्वच्छता व शिक्षण | २०७६ | ४८.८५ |
| ४ | वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका | ९२९ | २१.८६ |
| ५ | माहितीबाबत अनभिज्ञ | १७८४ | ४१.९८ |
| ६ | प्रतिसाद नाही | ३६ | ०.८५ |
| **एकूण** | | **४२५०** | |

(टिप - उत्तरदात्याने एकापेक्षा जास्त प्रतिसाद नोंदविलेले आहेत.)

**आलेख क्र.-४.७.८**




उपरोक्त तक्त्यात पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणती कामे घेण्यात आली याबाबत तपशिल दिला आहे. वरील माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्दशनास येते की, पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये सर्वात जास्त २०८९ (४९.१५%) पायाभुत सुविधा, २०७६ (४८.८५%) आरोग्य, स्वच्छता व शिक्षण तर सर्वात कमी ९२९ (२१.८६%) वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

### ४.७.१६) पेसा निधी मधून मागील २ वर्षात गावामध्ये राबविण्यात आलेले उपक्रमांचा तपशिल

मागिल दोन वर्षात गावामध्ये पेसा निधीमधुन कोणकोणते उपक्रम राबविण्यात आले आहेत याबाबतची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**१. शैक्षणिक उपक्रम** - डिजिटल शाळा, अंगणवाडी/शाळेला कुंपण/भिंत बांधणे, अंगणवाडी व शाळेची रंगरंगोटी/सजावट, अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, अंगणवाडीसाठी साहित्य खरेदी, वाचालानय बांधकाम, अंगणवाडी किचन शेड बांधकाम इ. उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.

**२. पाणीपुरवठा** - पाण्याची टाकी बांधकाम, हातपंप, नळ योजना, पाणीपुरवठा दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची विहीर दुरुस्ती, तलाव खोलीकरण, पिण्याच्या पाण्याचा आरो प्लांट बसविणे इ.

**३. आरोग्य** - औषधे वाटप, कोव्हिड कालावधीत मास्क व सॅनिटायझर वाटप करणे, एक मुठ पोषण आहार इ.

**४. रस्ते/ गटारे** - रस्ते (सिमेंट/मुरूम), नाली/गटार दुरुस्ती, भूमिगत गटारी बांधकाम इ.

**५. विद्युतीकरण** - पथदिवे, सौर दिवे बसविणे.

**६. वृक्षारोपण** - वृक्ष लागवड करणे.

**७. सार्वजनिक स्वच्छता** - कचरा कुंडी, सार्वजनिक मुतारी/शौचालय बांधकाम, स्वच्छता अभियान राबविणे.

**८. प्रशिक्षण** - कौशल्य विकास प्रशिक्षण, मध संकलन प्रशिक्षण राबविणे.

**९. पेसा कायदा प्रचार व प्रसिद्धी** - पेसा कायदा विषयक माहिती फलक बसविणे, पेसा कायदा अंमलबजावणी प्रशिक्षण/कार्यशाळा राबविणे.

**१०. इतर उपक्रम** — अ. गावात सिमेंटची बेंच/बाकडे बसविणे, चावडी ओटा बांधकाम/दुरुस्ती
आ. आदिवासी परंपरा-संस्कृती जतन करणेसाठी कला साहित्य खरेदी
इ. स्मशानभूमी बांधकाम, समाज मंदिर दुरुस्ती
ई. सार्वजनिक स्वयंपाक भांडी खरेदी
उ. व्यायाम शाळा साहित्य खरेदी
ऊ. गोटूल दुरुस्ती




**पेसा ५% निधीअंतर्गत सार्वजनिक महिला शौचालय**

### ४.७.१७) पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला झालेल्या फायद्याविषयी माहिती

**तक्ता क्र. - ४.७.१६**

| अ.क्र. | पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला उपयोग झाला आहे का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २६६६ | ६२.७३ |
| २ | नाही | ३१९ | ७.५१ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १२१७ | २८.६३ |
| ४ | प्रतिसाद नाही | ४८ | १.१३ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

**आलेख क्र.-४.७.९**




उपरोक्त तक्ता व आलेखानुसार असे निर्दशनास येते की, २६६६(६२.७३%) ग्रामस्थांनी पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला उपयोग झाला आहे तर ३१९(७.५१%) ग्रामस्थांनी पेसा निधीतून राबविण्यात/घेतलेल्या कामाचा गावाला उपयोग झाला नाही असे मत नोंदविलेले आहे. १२१७(२८.६३%) ग्रामस्थ सदर माहितीबाबत अनभिज्ञ आहेत.

### ४.७.१८) पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेणेबाबतची माहिती

**तक्ता क्र. -४.७.१७**

| अ.क्र. | आपल्या पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेण्यात आली आहेत का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २३५९ | ५५.५१ |
| २ | नाही | ३०४ | ७.१५ |
| ३ | माहितीबाबत अनभिज्ञ | १५५० | ३६.४७ |
| ४ | प्रतिसाद नाही | ३७ | ०.८७ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यामध्ये पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेण्यात आली आहेत किंवा कसे याबाबत तपशिल दिला आहे. २३५९(५५.५१%) ग्रामस्थांनी पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेण्यात आली आहेत तर ३०४(७.१५%) ग्रामस्थांनी पाडा/वस्तीमध्ये उद्भवणाऱ्या समस्येची कामे ग्रामसभा आराखड्यात घेण्यात आली नाहीत असे नमूद केले आहे. १५५०(३६.४७%) ग्रामस्थ सदर माहितीबीबत अनभिज्ञ आहेत.

### ४.७.१९) ग्रामसभा आराखड्यानुसार पाडा/वस्तीतील पूर्ण करण्यात आलेल्या कामासंबंधीची माहिती

**तक्ता क्र. - ४.७.१८**

| अ.क्र. | ग्रामसभा आराखड्यानुसार आपल्या पाडा/वस्तीतील कामे पूर्ण झाली आहेत का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १४४४ | ३३.९८ |
| २ | नाही | ३६४ | ८.५६ |
| ३ | काही प्रमाणात | १३३४ | ३१.३९ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | १०५२ | २४.७५ |
| ५ | प्रतिसाद नाही | ५६ | १.३२ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

ग्रामसभा आराखड्यानुसार पाडा/वस्तीतील कामे पूर्ण झाली आहेत का याबाबत ग्रामस्थांकडून माहिती घेतली असता असे आढळून येते की, १४४४(३३.९८%) ग्रामस्थांनी ग्रामसभा आराखड्यानुसार त्यांच्या पाडा/वस्तीतील कामे पूर्ण झाली आहेत तर ३६४(८.५६%) ग्रामस्थांनी ग्रामसभा आराखड्यानुसार त्यांच्या पाडा/वस्तीतील कामे पूर्ण झाली नाहीत असा अभिप्राय दिला आहे. १३३४(३१.३९%) ग्रामस्थांनी काही प्रमाणात पाडा/वस्तीतील कामे पूर्ण झाली आहेत असे नमूद केले आहे तर १०५२(२४.७५%) ग्रामस्थ सदर माहितीबीबत अनभिज्ञ आहेत.

### ४.७.२०) ग्रामपंचायती/ग्रामकोष समितीने केलेल्या कामावर समाधानी असणेबाबत ग्रामस्थांची मते

**तक्ता क्र. -४.७.१९**

| अ.क्र. | ग्रामपंचायती/ग्रामकोष समितीने केलेल्या कामावर आपण समाधानी आहात का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २१३३ | ५०.१९ |
| २ | नाही | ६०४ | १४.२१ |
| ३ | सांगता येत नाही | १४५७ | ३४.२८ |
| ४ | प्रतिसाद नाही | ५६ | १.३२ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यामधील माहितीचे विश्लेषण केले असता असे निर्देशनास येते की, २१३३(५०.१९%) ग्रामस्थ, ग्रामपंचायती/ग्रामकोष समितीने केलेल्या कामावर समाधानी आहेत तर ६०४(१४.२१%) ग्रामस्थ,

ग्रामपंचायती/ग्रामकोष समितीने केलेल्या कामावर समाधानी नाहीत. १४५७(३४.२८%) ग्रामस्थांना याबाबत काहिही सांगता आले नाही.

### ४.७.२१) ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजेनुसार कामाचा प्राधान्य क्रम ठरविणेबाबतची माहिती

**तक्ता क्र. -४.७.२०**

| अ.क्र. | ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजेनुसार कामाचा प्राधान्य क्रम ठरविला जातो का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १८२७ | ४२.९९ |
| २ | नाही | ६४९ | १५.२७ |
| ३ | काही प्रमाणात | १६५८ | ३९.०१ |
| ४ | प्रतिसाद नाही | ११६ | २.७३ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजेनुसार कामाचा प्राधान्य क्रम ठरविला जातो का याबाबत माहिती घेतलेली असता असे आढळून येते की, १८२७ (४२.९९%) ग्रामस्थांनी प्राधान्यक्रम ठरविला जातो तर ६४९(१५.२७%) ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजेनुसार कामाचा प्राधान्य क्रम ठरविला जात नाही असे मत नमूद केले आहे.

### ४.७.२२) पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला मिळालेल्या चालनेबाबत

**तक्ता क्र. -४.७.२१**

| अ.क्र. | पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला चालना मिळाली आहे असे आपणास वाटते का? | ग्रामस्थ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७३६ | ४०.८५ |
| २ | नाही | ४५७ | १०.७५ |
| ३ | काही प्रमाणात | १२७६ | ३०.०२ |
| ४ | माहितीबाबत अनभिज्ञ | ७६२ | १७.९३ |
| ५ | प्रतिसाद नाही | १९ | ०.४५ |
| **एकूण** | | **४२५०** | **१००** |

उपरोक्त तक्त्यात  पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला चालना मिळाली आहे का याबाबत ग्रामस्थांची मते नोंदविलेली आहेत. १७३६ (४०.८५%) ग्रामस्थांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला चालना मिळाली आहे तर ४५७(१०.७५%) ग्रामस्थांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला चालना मिळाली नाही. १२७६(३०.०२%) ग्रामस्थांच्या मते पेसा कायदा अंमलबजावणीमुळे गावातील विकासाला  काही प्रमाणात चालना मिळाली आहे.

**प्रकरण - ५**

# निष्कर्ष व शिफारसी

## ५.१ निष्कर्ष -

### १. ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन -

ग्रामस्थांना पेसा कायद्याची माहिती देणेसाठी ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन होणे आवश्यक आहे तथापि सर्व ग्रामसभांमध्ये पेसा कायद्याचे वाचन झाल्याचे दिसून येत नाही. ग्रामस्थांना पेसा कायद्याची माहिती नसल्याचे आढळून आले आहे. ग्रामसभेला पेसा कायद्याची माहिती जास्तीत जास्त प्रमाणात ग्रामसेवक, पेसा समन्वयक व सरपंच यांच्या माध्यमातून दिली गेल्याचे आढळून येते. परंतु याबाबत ग्रामसभाच्या इतिवृत्तांमध्ये कोणत्याही स्वरूपाच्या नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत.

### २. पेसा कायद्याचा प्रचार-प्रसार -

सरपंच, ग्रामसेवक, ग्रामसभाकोष अध्यक्ष/ सदस्य यांच्या मतानुसार ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार-प्रसार होण्याचे प्रमाण जास्त आहे परंतु ग्रामस्थांच्या मतानुसार ग्रामपंचायतींमध्ये पेसा कायद्याचा प्रचार-प्रसार होण्याचे प्रमाण कमी दिसून येते. पेसा कायद्याच्या अंमलबजावणीतील महत्वाच्या घटकांपर्यंत ग्रामस्थांपर्यंत प्रचार-प्रसार झाला नसल्याचे दिसून येते. तसेच नमुना निवड केलेल्या एकूण २९३ ग्रामपंचायतींपैकी १०% म्हणजेच ३० ग्रामपंचायतींना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि राज्य पेसा कक्षाच्या चमुने प्रत्यक्ष भेट देवून कामकाजाचे सनियंत्रण केले आहे. त्यादरम्यान उत्तरदात्यांनी मुलाखत अनुसूचिंमध्ये दिलेल्या प्रतिसादांबाबत फेरपरिक्षण केले असता बहुतांश उत्तरदात्यांनी पेसा कायद्याचा म्हणावा तसा प्रचार प्रसार अद्याप झालेला नसल्याबाबत मत व्यक्त केले आहे.

पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती फलक लावणे, ग्रामसभेमध्ये पेसा कायद्याची माहिती देणे व गावपातळीवर कार्यशाळा घेणे हे उपक्रम जास्तीत जास्त प्रमाणात राबविल्याचे आढळून येते. कलापथक/पथनाट्य, व्हिडीओ फिल्म सादरीकरण तसेच गृहभेटी देवुन माहिती दिल्यास ती अधिक प्रभावीपणे लोकांपर्यत पोहोचेल पर्यायाने या माध्यमातुन माहिती घेताना ग्रामस्थांना तसेच इतर घटकांना अधिक रस निर्माण होऊ शकतो. तथापि या उपक्रमांव्दारे प्रचार-प्रसिध्दी करण्याचे प्रमाण कमी आहे.

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामसभांचे संसंगीकरण (Gram Sabha Mobilization) या उपक्रमांतर्गत काही प्रमाणात पेसा कायद्याचे प्रबोधनासाठी उपक्रम राबविल्याचे दिसून येते. स्वतंत्र IEC योजना राबवावी असे मत अंमलबजावणी यंत्रणेतील पदाधिकारी/ कर्मचारी यांचेकडून व्यक्त होत आहे.

## ३. पेसा कायद्याचे प्रशिक्षण -

सरपंच, ग्रामसेवक व मोबिलायझर यांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाल्याचे प्रमाण जास्त दिसून येते तर ग्रामस्थांना प्रशिक्षण मिळाल्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. पेसा कायद्यानुसार ग्रामसभेला विशेष अधिकार देण्यात आलेले असून पेसा कायद्याच्या अंमलबजावणी मधील महत्वाचा घटक असलेल्या ग्रामस्थांना पेसा कायद्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे तथापि प्रशिक्षण मिळण्याचे प्रमाण नगण्य आहे. ग्रामसेवक, सरपंच, ग्रामसभाकोष अध्यक्ष/सदस्य या घटकांचे १०० % प्रशिक्षण होणे आवश्यक आहे तथापि १०० % प्रशिक्षण झाल्याचे दिसून येत नाही.

पेसा नियमानुसार स्थापन झालेल्या सर्व समित्यांचे पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व समित्यांच्या सदस्यांना समितीच्या कार्यकक्षा समजण्यासाठी प्रशिक्षण होणे आवश्यक आहे तथापि ग्रामसभा कोष समिती व साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती या दोन समित्या वगळता इतर समित्यांचे प्रशिक्षण झाल्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण न करण्याचे प्रमाण कमी असले तरी लक्षणीय साधारण १५% आहे.

पेसा कायद्याच्या अनुषंगाने दर्जेदार प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. तसेच प्रशिक्षणासाठी दर्जेदार वाचन साहित्य, तेही आदिवासी लोकांना समजेल अशा भाषेमध्ये अशा पध्दतीने व अशा रितीने तयार झाले असल्याचे किंवा उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही.

## ४. प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन -

पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी जिल्हा व तालुका पेसा समन्वयकांना विविध अडचणी येत असल्याचे आढळून आले. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल, प्रवीण प्रशिक्षक, कम्प्युटर, इंटरनेट, प्रशिक्षण साहित्य इ. सुविधा उपलब्ध होत नाहीत. नागरिकांचा सहभाग कमी प्रमाणात तसेच प्रशिक्षणार्थी वेळेत उपस्थितीत राहत नाहीत. भाषेची अडचण तसेच प्रशिक्षणार्थीना प्रवासासाठी वाहने उपलब्ध नसल्याने त्यांचा सहभाग कमी असल्याचे दिसते. प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने परिपूर्ण प्रशिक्षण होत नाही.

## ५. प्रशिक्षण देणारी यंत्रणा -

सरपंच, ग्रामसेवक, ग्रामसभाकोष अध्यक्ष/सदस्य व ग्रामस्थ यांना जास्तीत जास्त जिल्हा परिषद/पंचायत समितीमार्फत प्रशिक्षण मिळालेले आहे तर जिल्हा पेसा समन्वयक व तालुका पेसा समन्वयक यांना यशदा, पुणेमार्फत प्रशिक्षण मिळालेले आहे. ग्रामसभाकोष समितीच्या अध्यक्षांना यशदा, पुणेमार्फत प्रशिक्षण मिळालेले आहे. मात्र काही अपवाद वगळता पेसा विषयाचे प्रशिक्षण देणा-या समर्पित प्रशिक्षण संस्था अथवा प्रवीण प्रशिक्षक सर्व पेसा जिल्ह्यांमध्ये उपलब्ध नाहीत असे सर्वत्र दिसून आले आहे.

## ६. शासन निर्णय व परिपत्रके यांमधील तफावत

पेसा कायद्याची अंमलबजावणी शासनाने निर्गमित केलेले विविध शासन निर्णय व परिपत्रकांनुसार करण्यात येते तथापि या शासन निर्णय व परिपत्रकांमध्ये तफावत असल्याचे आढळून येते. पेसा कायद्याच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभाग व ग्राम विकास विभाग आणि महसूल व वन विभाग यांनी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रके काही संदर्भात परस्पर विरोधी असल्याचे दिसून आले आहे. ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ २ वर्ष कि ५ वर्ष, अनुसूचित क्षेत्रात गौण वनउपज अधिकार पेसा कायदा तसेच वनहक्क कायदा या दोन्ही कायद्याअंतर्गत आहे, गौण खजिन बाबत ग्रामसभेस पेसा कायद्यान्वये अधिकार दिले आहेत परंतु महसूल यंत्रणा म्हणून तसे आदेश नाहीत या सर्व बाबींमुळे पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना कार्यक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाले आहेत.

## ७. ग्रामसभा -

प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन केले जात असल्याचे प्रमाण जास्त असले तरीही १७% मोबिलायझरच्या मतानुसार अद्यापही प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन केले जात नाही.

ग्रामसभेच्या बैठकांना ग्रामस्थ नियमीतपणे उपस्थित राहत नसल्याचे प्रमाण कमी असले तरीही सर्व ग्रामस्थंनी ग्रामसभेस उपस्थित राहून कामकाजात प्रत्यक्ष सहभाग घेणे आवश्यक आहे. गावापासून ग्रामपंचायतीचे अंतर जास्त असल्याने, ग्रामसभेबाबत पूर्वसुचना न मिळाल्याने, रोजगार/उपजिवीकेसाठी बाहेरगावी जावे लागत असल्यामुळे ग्रामस्थ ग्रामसभेत नियमीतपणे उपस्थित राहत नाहीत असे सर्वेक्षणादरम्यान इतर पेसा संबंधित पदाधिकारी, मोबिलायझर, ग्रामसेवक इत्यादिंनी नमूद केले आहे.

## ८. पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर-

पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन, गौण वन उत्पादन मालकी तसेच ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन या अधिकारांचा वापर जास्त प्रमाणात झाल्याचे दिसून येते. मात्र इतर अधिकारांचा वापर अद्याप सुरू झाला नसल्याचे दिसून आले आहे.

## ९. आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन -

आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करणे, माहिती फलक लावणे हे उपक्रम जास्त प्रमाणात केल्याचे आढळले. माहिती पुस्तीका तयार करणे तसेच व्हिडिओ फिल्म तयार करणे याव्दारे आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन अधिक प्रभावीपणे होऊ शकते. तथापि या बाबी करण्याचे प्रमाण कमी आहे.

पेसा कायद्याच्या उद्देशांपैकी आदिवासी समाजाच्या रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करणे हा महत्वाचा उद्देश आहे तथापि काहि ठिकाणी याबाबत अद्यापही काही प्रयत्न केलेले दिसून आले नाहीत. यासंदर्भात ज्या बाबी अपेक्षित आहेत त्याबाबत प्रशिक्षक तसेच ग्रामस्थ या दोहोंच्या धारणा स्पष्ट होणे व त्यानुसार त्यांना काम करण्यास उद्युक्त करण्याचे प्रयत्न स्वतंत्रपणे पेसा अंमलबजावणीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**१०. पेसा ५% अबंध निधी -**

गावामध्ये मोठ्या प्रमाणावरील विकासात्मक कामे तसेच पायाभूत सुविधा अंतर्गत विविध बांधकामे करण्यासाठी ५% अबंध निधी पुरेसा नाही असे पेसा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचे मत आहे. गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ, विखुरलेल्या वस्त्या, महागाई, निधीची विभागणी इत्यादीमुळे निधी अपुरा पडतो असे नमूद केले आहे.

पेसा नियमांमध्ये पेसा गावनिर्मितीसाठी लोकसंख्येची अट नसल्यामुळे अनेक गावांची लोकसंख्या अगदी किरकोळ म्हणजे १०/१५/२०/२५/३० अशी आहे. त्यामुळे लोकसंख्या अतिशय कमी असलेल्या गावांना अगदी तुटपुंज्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे बहुतांश पेसा गावांना पेसा ५% अबंध निधीचे म्हणावे तसे नियोजन करता येत नाही.

पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता व शिक्षण तसेच पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी ही कामे घेण्यात आलेली आहेत. ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची/कामांची पुनरावृत्ती होत असल्याचे प्रमाण कमी असले तरीही कामांची पुनरावृत्ती होताना दिसून येते.

पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता असे अभिप्राय उत्तरदात्यांनी दिलेले आहेत. तसेच पेसा ५% अबंध निधीचा सर्व गावांचा गावनिहाय वर्षिक आराखडा करण्यात आला नसल्याचे आढळले.

**११. पेसा ५% अबंध निधी योजनेमधुन राबविण्यात आलेले उपक्रम -**

पेसा निधी योजनेमधुन पायाभुत सुविधा रस्ते/गटारे बांधकाम/दुरूस्ती, पाणीपुरवठा, शैक्षणिक उपक्रम जसे अंगणवाडी व शाळेतील साहित्य खरेदी, रंगरंगोटी, सजावट, डिजिटल शाळा, अंगणवाडी/शाळेला संरक्षण कुंपण /भिंत इत्यादी तसेच सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांचेशी निगडीत विविध उपक्रम जास्त प्रमाणात राबविण्यात आलेले आहेत.

रोजगार विकासा करीता नाविन्यपुर्ण उपक्रम तसेच कौशल्य विकासाकरीता प्रशिक्षण राबविण्याचे प्रमाण कमी आहे.

१२. ग्रामसभा कोष समितीचे सर्व सदस्य समितीच्या कामकाजात सहभागी होत नसल्याचे आढळून आले.

१३. इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे पाहिजे त्या प्रमाणात सहकार्य मिळत नसल्याने पेसा कायदा अंमलबजावणीसाठी अडचणी येतात.

१४. पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण, सनियंत्रण व मूल्यमापन याबाबत तुलनात्मकदृष्ट्या पाहिले असता उपक्रमांचे/ कामांचे लेखापरीक्षण, सनियंत्रणापेक्षा मूल्यमापन होण्याचे प्रमाण कमी आढळून येते.

१५. क्षेत्रभेटीच्या वेळी एकूण ११२ (१३%) गावांमध्ये ग्रामसभाकोष समिती स्थापन झाली नसल्याचे दिसून आले.

१६. कार्यालयातील कामकाज जास्त असल्याने तालुका समन्वयक यांना क्षेत्रभेटी जास्त प्रमाणात करता येत नाहीत, दळणवळणाच्या अडचणींमुळे क्षेत्रिय स्तरावर कामकाज करताना अडचणी येतात.

१७. पेसा कायद्याचा प्रचार - प्रसार, प्रशिक्षण, ५ टक्के अंबंध निधी योजनेतील कामांचे लेखापरिक्षण, संनियंत्रण, मूल्यमापन या सर्व बाबी विचारात घेता पुणे, पालघर, नंदूरबार व अहमदनगर या जिल्ह्यांत पेसा कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झाल्याचे दिसून येते. तर अमरावती, चंद्रपूर, धुळे व गडचिरोली या जिल्ह्यांत पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अधिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

## ५.२ शिफारसी

### १. <u>पेसा कायद्याची मोठ्या प्रमाणात व सातत्याने जाणीव जागृती (प्रचार-प्रसार) करण्याची आवश्यकता</u>

पेसा कायदा सन १९९६ मध्ये अस्तित्वात आला आणि कायद्याचे नियम २०१४ मध्ये लागू करण्यात आले आहेत. तेव्हापासून पेसा कायद्याची अंमलबजावणी राज्यभर करण्यात येत आहे. परंतु पेसा कायद्याचा म्हणावा तसा प्रचार प्रसार झाल्याचे दिसून येत नाही. काही किरकोळ स्वरूपाचे अपवाद वगळता पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी होण्यासाठी मोहीम स्वरूपात कोणताही मोठा उपक्रम अद्याप राबविण्यात आलेला नाही. त्यामुळे पेसा कायदा म्हणावा तसा आदिवासी समुदायापर्यंत पोहोचलेला नाही, अशी परिस्थिती आहे. पेसा कायद्याच्या प्रचार प्रसारा अभावी पेसा कायद्याच्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील लोकांच्या मनात कायद्याविषयीच्या परिपक्व कल्पना विकसीत झालेल्या नाहीत. तसेच या कायद्याविषयीचे अनेक समज-गैरसमज लोकांच्या मनात असल्याचे दिसून आले आहे. पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीची अपेक्षित फलनिष्पत्ती दृष्य स्वरूपात येण्यासाठी या कायद्याची मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी  अधिक व्यापक प्रमाणात होणे आवश्यक आहे. पेसा कायद्याची पुरक माहिती व पेसा कायद्याचे महत्व ग्रामस्थांना समजणे आवश्यक आहे. प्रचार व प्रसिध्दीसाठी विविध माध्यमांचा वापर करताना आदिवासींच्या बोली भाषेचा समावेश केल्यास ते अधिक प्रभावी होईल. दूरदर्शन, लघुपट, पथनाट्ये, माहिती पुस्तीका अशा माध्यमातुन प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी.  सामाजिक माध्यमे जसे फेसबुक, वाट्स ॲप यांचा प्रचार प्रसिध्दीसाठी वापर करावा.  ग्रामस्थांपर्यंत तसेच युवकांपर्यंत पेसा कायदा पोहचण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजेत. गावपातळीवर कार्यशाळा आयोजित करणे तसेच यामध्ये लोकांनी सहभागी होणेसाठी त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

### २. <u>पेसा कायद्याची अंमलबजावणी करणा-या घटकांची क्षमता बांधणी</u>

पेसा कायद्याची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर प्रभावीपणे होण्यासाठी पेसा क्षेत्रातील घटकांची मोठ्या प्रमाणात क्षमता बांधणी होण्याची आवश्यकता असल्याचे दिसून येत आहे. यासाठी गाव पातळीपासून जिल्हा स्तरापर्यंतचे लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पातळीवर काम करणा-या स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, अभ्यास भेटी राबवून त्यांच्या क्षमता वृध्दींगत करण्याची आवश्यकता आहे. यासाठी राज्यस्तरापासून ते गाव पातळीपर्यंतचे प्रशिक्षण उपक्रम राबविण्याची आश्यकता आहे.

पेसा अंमलबजावणीमधील सर्व घटकांच्या प्रशिक्षणाची तरतूद आदिवासी विकास विभागाने करून त्याचे वार्षिक नियोजन करण्यात यावे. पेसा अंमलबजावणीमधील विविध स्तरावरील घटकांसाठी वेगवेगळी ट्रेनिंग मॉड्युल्स तयार करण्यात यावीत व त्यानुसार प्रशिक्षण घेण्यात यावे. पेसा कायद्या अंतर्गत गठित सर्व समित्यांचे पेसा कायदा अंमलबजावणी तसेच ५% अबंध निधीबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.  ग्रामसभांचे विविध विषयांवर

( आर्थिक बाबी इ. ) प्रशिक्षण घेण्यात यावे. गावातील ठराविक सक्रिय युवकांना प्रशिक्षण देण्यात यावे. तालुका व गाव स्तरावर प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी प्रशिक्षणासाठी आवश्यक बाबीं/ साधन सामुग्री उपलब्ध करून द्याव्यात.

प्रशिक्षणासोबत प्रशिक्षणार्थींना वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे. प्रत्येक घटकांसाठी प्रशिक्षणाचा कालावधी प्रशिक्षण मोड्यूलप्रमाणे निश्चित करण्यात यावा. प्रशिक्षणा दरम्यान आदर्श पेसा गावाच्या भेटीचे आयोजन करण्यात यावे तसेच पेसा गावांमध्ये झालेल्या कामांची यशोगाथा जास्तीत जास्त घटकांपर्यंत पोहोचल्यास पेसा कायदा अंमलबजावणीसाठी ते अधिक प्रभावी ठरेल.

## **३. महाराष्ट्र पेसा नियम, २०१४ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणेबाबत) नियम, २०१४ अर्थात पेसा नियम लागू केले आहेत. मात्र पेसा कायद्याला अपेक्षित पंचायतीसंबंधीचे अर्थात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरावरील पंचायतींमध्ये पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी नियम तयार करणे अभिप्रेत आहे. सद्यस्थितीत ग्रामपंचायतीसंबंधीचे नियम तयार करून त्या नियमांद्वारे केवळ ग्रामसभेबाबतच्या तरतूदी समाविष्ट करण्यात आलेल्या दिसून येत आहेत. अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम करणे शक्य व्हावे यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरावरील पंचायतींसाठी पेसा नियम तयार करण्याची आवश्यकता आहे. तसेच सद्यस्थितीत पेसा नियमांमधील पेसा गाव निर्मिती प्रक्रिया, गाव स्तरावरील पेसा समित्या याबाबत व्यावहारिक सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. तिन्ही स्तरावरील पंचायतींना पेसा नियमांद्वारे अधिकार प्रदान केल्यास पेसा कायद्याची ख-या अर्थाने प्रभावीपणे अंमलबजावणी होवू शकेल, असे मत आहे.

## **४. पेसा ५% अबंध निधीबाबत**

गावामध्ये मोठ्या प्रमाणावरील विकासात्मक कामे करण्यासाठी ५% अबंध निधी पुरेसा नाही असे पेसा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचे मत आहे. तथापि पेसा अबंध निधीचा उद्देश मोठी विकासात्मक कामे हाती घेणे हा नसून ग्रामस्तरावर पायाभूत सुविधा तयार करणे, वन हक्क अधिनियम ( FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी करणे, आदिवासींना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायाच्या संदर्भात प्रशिक्षण/ मार्गदर्शन करणे, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण तसेच वनीकरण, वन्यजीव संवंर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिवीका इत्यादीबाबत कामकाज करणे हा आहे. तसेच गावातील अतिकुपोषित बालकांचे प्रमाण कमी करणे, बाल विवाहावर बंदी आणणे, मुलींचे शिक्षण गळतीचे प्रमाण कमी करणे, वन जमिनीवर नव्याने अतिक्रमण थांबविणे इ. बाबतही पेसा कायद्याच्या अंमलबजावणीतून प्रगती होणे अपेक्षित आहे.

सन २०१५ पासून पेसा गावांना ५ टक्के अबंध निधी वितरीत करण्यात येतो. या कालावधीत पायाभुत सुविधा तसेच शैक्षणिक सुविधांवर जास्त प्रमाणावर कामकाज झालेले आहे. रोजगार विकासा करीता

नाविन्यपुर्ण उपक्रम तसेच प्रशिक्षण  राबविण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे यापुढील कालावधीमधील निधीचा विनीयोग करताना ग्रामस्थांच्या रोजगार विकासाकरीता नाविन्यपुर्ण उपक्रम, प्रशिक्षण तसेच पेसा कायद्याच्या प्रचार -प्रसारासाठी पुरेसा  निधी खर्च करण्यात यावा, जेणेकरून कायद्यासंबंधी आदिवासी ग्रामस्थांमध्ये पुरेशी जाणीव जागृती होऊन खऱ्या अर्थाने पेसा कायद्याचा लाभ त्यांना प्राप्त होईल.

या अनुषंगाने सर्व पेसा संबंधित यंत्रणांना पेसा ५ % अबंध निधीच्या विनीयोगाबाबत अधिक सविस्तर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

## ५. पेसा कायदा व वन हक्क कायदा अन्वये निर्गमित शासन निर्णयांमध्ये समतोल राखण्याची आवश्यकता

पेसा कायदा व वन हक्क कायदा याबाबतच्या काही तरतूदींमध्ये समानता असल्यामुळे (उदा. गौण वनोपज) याबाबत अधिकार बहाल करताना पेसा कायद्या अन्वये तयार करण्यात आलेल्या समित्या, वन हक्क कायद्याने तयार केलेल्या समित्या, वन विभागाने इतर तयार केलेल्या समित्या, स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी गावात तयार केलेल्या समित्या अशा असंख्य समित्या एकाच कामासाठी निर्माण झाल्याने त्यांच्या अधिकारांबाबत व जबाबदा-यांबाबत गाव पातळीवर मोठ्या प्रमाणात वाद उद्भवतात. त्यामुळे अशा स्वरूपाच्या समित्यांबाबत एकवाक्यता व अधिकारांबाबत एकवाक्यता निर्माण होण्यासाठी पेसा कायदा व वन हक्क कायदा या अन्वये निर्माण झालेल्या/केलेल्या समित्यांच्या कामकाजामध्ये एकसूत्रता निर्माण करण्यासाठी समित्यांच्या रचनेबाबत, आवश्यकतेबाबत व अधिकारांबाबत फेर आढावा घेऊन समतोल साधण्याची आवश्यकता आहे. तत्संबंधी  वन विभाग, महसूल विभाग व ग्राम विकास विभाग यांच्यातील आंतरविभागीय साम्यंजस्यातून वरील बाबींसंदर्भात सुस्पष्ट उपाययोजना करून पेसा कायदा अंमलबजावणीत अधिक स्पष्टता व अचूकता येण्याच्या दृष्टीने सुसंगत शासन निर्णय निर्गमित व्हावेत अशी अपेक्षा गावपातळीवरील यंत्रणांकडून व्यक्त झाली आहे.

## ६. पेसा कायदा अंमलजबावणीसाठी स्वतंत्र व समर्पित यंत्रणेची आवश्यकता

महाराष्ट्र राज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी सूरू आहे. मात्र सध्यस्थितीत पेसा कायद्याची अंमलबजावणी करणारी स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात नाही. राज्य पेसा कक्षाकडे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीची मर्यादीत जबाबदारी शासनाने सोपविलेली आहे. मात्र यासाठी केवळ ४ पदे मंजूर असून या ४ पदांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी करणे व्यावहारिकदृष्ट्या अडचणीचे ठरत आहे. पेसा क्षेत्राची व्याप्ती खुप मोठी आहे. राज्यामध्ये १३ जिल्हे, ५९ तालुके, सुमारे २९२९ ग्रामपंचायती व सुमारे ८४१३ गावे पेसा क्षेत्रात येतात. एवढ्या मोठ्या क्षेत्रात पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर राज्य शासनाची स्वतंत्र व समर्पित यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी राज्य पेसा कक्षामार्फत पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून मान्यतेसाठी शासन स्तरावर

विचाराधीन आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यास पेसा कायद्याची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू होण्यास मदत होईल.

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध स्तरावर कुशल मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. क्षेत्रिय पातळीवरील कामकाजासाठी प्रचार-प्रसार, जनजागृती या सर्व कामांसाठी त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणे, तसेच त्यांचेसाठी कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे.

## ७. पेसा कायदा अंमलजबावणीसाठी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र कक्ष व मनुष्यबळाबाबत

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. राज्यपा २०१५/प्र.क्र.१२०/का-१६ दि.१८/१२/२०१५ अन्वये ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मंत्रालयीन स्तरावर राज्यस्तरीय पेसा (PESA) कक्ष स्थापन करण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून निधी मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व त्यानुसार सदर कक्षातील पद रचना नमूद करून राज्य स्तरावरील पेसा कक्षाकडे पुढीलप्रमाणे कामकाज सोपविण्यात आले.

- ग्रामसभेकडून निर्माण करण्यात येणाऱ्या नवीन पेसा गाव निर्मितीचा आढावा घेणे व महसूल विभागाशी पेसा गाव अधिसूचित करणेबद्दल समन्वय साधणे.
- प्राप्त गौण वनौपज विक्री आणि विल्हेवाट करणेबाबत आढावा घेणे.
- सर्व पेसा गावामध्ये ग्रामसभा कोषाची स्थापना करणे, त्यासाठी तांत्रिक मदत आणि त्याचा पारदर्शक वापर करणे याबाबत आढावा घेणे.
- ग्रामसभेकडून करण्यात येणाऱ्या जमीन संसाधनांच्या व्यवस्थापनाचा आढावा घेणे.
- गावातील गरजेप्रमाणे सूक्ष्म नियोजन, सामाजिक लेखा परिक्षण व ग्रामसभा सक्षमीकरण करणे.

तसेच आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-२०१७/प्र.क्र.३५/का-०८. दि.३१/०३/२०१७ अन्वये पुढील बाबींचाही राज्य पेसा कक्षाच्या कामकाजात अंतर्भाव करण्यात आला.

- पेसा गावांतील आदिवासी उपयोजनेच्या ५% अबंध निधीचे नियोजन, व्यवस्थापन व विनियोजन दाखले इ. सादर करणे.
- पेसा ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आदिवासी उपयोजनेच्या ५% अबंध निधीचे व्यवस्थापन, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र इ. बाबींचे समन्वय करणे.

सदर कक्षासाठी १) संचालक, राज्य (पेसा) २) राज्य समन्वयक (पेसा) ३) सहाय्यक पेसा (समन्वयक) ४) कार्यालयीन सहाय्यक (डाटा एन्ट्री ऑपरेटर) ही चार पदे मान्य करण्यात येऊन ती पदे प्रतिनियुक्ती/ कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्ती संदर्भातील अटी व शर्ती ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून निश्चित करण्यात यावेत असे संदर्भिय शासन निर्णयात नमूद केले आहे.

सदर कक्षाकडील कामाच्या जबाबदाऱ्या व पेसा क्षेत्राच्या विकासाची संभाव्य गती लक्षात घेता राज्य, जिल्हा व तालुका अशा तीनही पातळयांवर पेसा कक्षासाठी समर्पित मनुष्यबळ असणे आवश्यक असून

त्यानुसार "महाराष्ट्र राज्य पेसा कक्ष, पुणे" या कक्षाचा विस्तार व बळकटीकरण करण्यासाठीचा प्रस्ताव संचालक, राज्य पेसा, पुणे यांनी ग्राम विकास व पंचायतराज विभागास सन २०१९-२० मध्ये सादर केला आहे. सदर संरचनेमध्ये राज्यस्तरावरील १८, जिल्हा स्तरावरील ६५ व तालुकास्तरावरील ११८ पदांचा समावेश आहे.

या प्रस्तावातील मनुष्यबळ संरचना व पदनिहाय आकृतीबंध मान्य झाल्यास तसेच त्याचे अंतिम संनियंत्रण आदिवासी विभागामार्फत केल्यास पेसा कायद्याच्या अंमलबजावणीस क्षेत्रिय स्तरावर गती प्राप्त होऊन पेसा क्षेत्रातील विविध घटकांची क्षमता बांधणी, कौशल्य विकास, शाश्वत उपजिविका, पायाभूत सुविधा विकास, वनहक्काचे संरक्षण इ. बाबत ठोस उपाययोजना अंमलात आणणे व खऱ्या अर्थाने पेसा कायद्याचा लाभ आदिवासी क्षेत्राला मिळणे शक्य होईल.

## ८. ग्रामसभाकोष समितीचे बळकटीकरण -

पेसा कायद्याअंतर्गत ५% अबंध निधी ग्रामसभा कोषामध्ये जमा करण्यात येतो व या प्राप्त निधीचे व्यवस्थापन ग्रामसभा कोष समितीमार्फत ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली करण्यात येते. शासनाच्या विविध विभागामार्फत सामाजिक व आर्थिक विकासाच्या अनेक योजना, कार्यक्रम व प्रकल्प गावपातळीवर राबविण्यात येतात. गावाच्या विकासासाठी विविध योजनेतंर्गत (उदा. आदिवासी उपयोजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, वित्त आयोग इ.) प्राप्त होणाऱ्या निधीसह गावाचा विकास आराखडा तयार करणे व गावातील विकास कामांची गरज/ आवश्यकता ओळखून व अवलोकन करून त्याप्रमाणे नियोजन करणे याबाबतचे प्रशिक्षण ग्रामसभाकोष समितीच्या अध्यक्ष/सदस्यांना देण्यात यावे. ग्रामसभाकोष समितीच्या अध्यक्ष/सदस्यांना याबाबत वेळोवेळी प्रशिक्षण तसेच मार्गदर्शन मिळाल्यास अभ्यासपूर्वक विकास आराखडे तयार होतील व कामांची पुनरावृत्ती टाळता येईल.

## ९. ग्रामसभांचे बळकटीकरण -

पेसा कायद्यानुसार प्रत्येक पेसा गावासाठी स्वतंत्र ग्रामसभा आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहेत. तसेच पेसा कायद्याने ग्रामसभांना विविध बाबींवर निर्णय घेण्याचे विशेष अधिकार बहाल केलेले आहेत. त्यामुळे ग्रामसभांच्या सदस्यांवर महत्वाची जबाबदारी आलेली आहे. ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्यासाठी ग्रामसभांचे बळकटीकरण व सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. ग्रामसभा बळकटीकरणासाठी प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असणा-या ग्रामसभा मोबिलायझरच्या क्षमता वृध्दींगत करून, स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्था तसेच स्थानिक शिक्षक, युवक इत्यादिंचा सहभाग घेऊन, शासनामार्फत विविध उपक्रम राबवून ग्रामसभांचे बळकटीकरण करण्यात यावे.





**ग्रामस्थांकडून मुलाखत अनुसूची भरून घेताना अन्वेषक**

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.** | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |

## अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम १९९६ व महाराष्ट्र पेसा नियम २०१४ अंमलबजावणी मूल्यमापन अभ्यास

## मुलाखत अनुसूची — जिल्हा समन्वयक

**अ) प्राथमिक माहिती :-**

| | |
|---|---|
| नाव : | |
| जिल्हा : | |
| सदर पदावर कधी पासून कार्यरत आहात ?<br>(योग्य ठिकाणी खून करावी) | १) नव्याने<br>२) एक वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून<br>३) तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून<br>४) पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून |
| मोबाईल क्रमांक : | |
| Email ID : | |

**ब) पेसा कायदा अंमलबजावणी संबंधीची माहिती :**

१) आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले ?

अ) यशदा, पुणे ☐

आ) जिल्हा परिषद/पंचायत समिती ☐

इ) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र ☐

ई) स्वयंसेवी संस्था ☐

उ) इतर (नमूद करावे)

२) पेसा कायदा १९९६ ची माहिती जिल्ह्यातील गावांना कोणत्या माध्यमातून दिली ?

अ) ग्रामसभेत माहिती दिली

आ) प्रशिक्षणाद्वारे

इ) स्वयंसेवी संस्था

ई) शासनाचे अधिकारी

उ) प्रसिद्धी माध्यमाद्वारे

ऊ) इतर (नमूद करावे)

ए) अद्याप पर्यंत माहिती दिली नाही

३) आपल्या भागातील कोणकोणत्या स्तरावरील व्यक्तींना प्रशिक्षण दिले जाते ?

अ) पेसा मोबिलायझर ☐

आ) ग्रामसभा कोष समिती सदस्य ☐
इ) गाव स्तरीय कर्मचारी ☐
ई) ग्रामपंचायत सदस्य ☐

४) पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या खालीलपैकी कोणकोणत्या समित्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे ?

अ) ग्रामसभा कोष समिती ☐
आ) साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती ☐
इ) शांतता समिती ☐
ई) बाजार समिती ☐
उ) मादक द्रव्य नियंत्रण समिती ☐
ऊ) ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती ☐
ए) न्याय समिती ☐
ऐ) कर्ज नियंत्रण समिती ☐

५) शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण केले जाते का ?

अ) होय ब) नाही

६) शासनामार्फत आपणास दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती दिली जाते का ?

अ) होय ब) नाही

७) पेसा प्रशिक्षणामध्ये कोणकोणते विषय घेण्यात येतात ?

अ) पेसा कायदा ☐
आ) पेसा ग्रामसभेचे अधिकार ☐
इ) वनहक्क कायदा ☐
ई) गौण वनउपज ☐
उ) बाजार व सावकारी ☐
ऊ) गौण जलसाठे ☐
ए) जमीन हस्तांतरण ☐
ऐ) आदिवासी समाजाची ओळख ☐
ओ) इतर (नमूद करावे)

८) पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

अ) प्रशिक्षण साहित्य ☐
आ) प्रवीण प्रशिक्षक ☐
इ) प्रशिक्षण हॉल, लाईट, इंटरनेट, कम्प्युटर इ. सुविधा ☐
ई) प्रशिक्षणार्थींची वेळेत उपस्थिती ☐
उ) इतर (नमूद करावे)

९) शासनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नव्याने कोणत्या बाबींचा समावेश करणे गरजेचे वाटते ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१०) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का ?

अ) होय ब) नाही क) काही प्रमाणात

११) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१२) पेसा कायदा विषयक काही अडचणी व समस्या उद्भवल्यास आपण कोणाकडे मार्गदर्शन मागता ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१४) पेसा कायदा व नियमाला अणुसरून शासनाने काढलेले शासन निर्णय व परिपत्रके यांचे मध्ये तफावत असल्याचे दिसून येते का ?

अ) होय ब) नाही

१५) तफावत असल्यास कुठे ते नमूद करावे ?

१६)---------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१७) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत कोणकोणत्या बाबतीत शासन निर्णय व परिपत्रके काढणे आवश्यक वाटते ?

१८)---------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१९) पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर आपल्या गटामध्ये जास्त झालेला आहे ?

अ) विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन ☐

आ) लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन ☐

इ) गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे ☐

ई) गौण खनिजांचे उत्खनन ☐

उ) मादक द्रव्यांची विक्री व सेवन ☐

ऊ) गौण वन उत्पादन मालकी ☐

ए) जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध ☐

ऐ) ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन
ओ) सावकारी करण्यावर नियंत्रण
औ) संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण

२०) प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी आपल्या स्तरावरून कोणते प्रयत्न केले जातात ?

अ) पत्रव्यवहार
आ) ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे
इ) बैठक घेऊन माहिती देणे
ई) इतर (नमूद करावे)

२१) आपल्या गटामध्ये आदिवासी समाजाचे रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले आहेत ?

अ) रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करण्यात आला
आ) माहिती पुस्तिका तयार केली
इ) व्हिडिओ फिल्म तयार केल्या
ई) माहिती फलक लावण्यात आले
उ) अद्याप केलेली नाही
ऊ) इतर (नमूद करावे)

२२)आपल्या गटामध्ये लहान जलस्त्रोतांचा उपयोग कशा प्रकारे करण्यात येतो ?

अ) मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी
आ) शेतीला पाण्यासाठी
इ) पिण्याच्या पाण्यासाठी
ई) जनावरांना पाणी
उ) कारखान्यांना पाणी
ए) अद्याप उपयोग झालेला नाही
ऐ) इतर (नमूद करावे)

२३) पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणती प्रक्रिया राबविली जाते ?

अ) गौण वनउपज गोळा करणे
आ) लिलाव करणे
इ) गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे
ई) गौण वनउपजा बाबत कार्यवाही करण्यात येत नाही

२४) गौण वनउपज विक्रीची प्रक्रिया कोणती ?

अ) लिलावाद्वारे
आ) शबरी विकास महामंडळ

इ) खाजगी ठेकेदार ☐

ई) बाजारामध्ये ☐

उ) इतर (नमूद करावे)

ऊ) कोणतीच प्रक्रिया राबविली जात नाही ☐

२५) आपल्या विकास गटामध्ये मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती नमूद करा ?

अ) ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहे ☐

आ) मादक द्रव्यांचे सेवन होत नाही ☐

इ) मादक द्रव्यांच्या दुकानावर बंदी ☐

ई) याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही ☐

२६) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत ?

अ) पायाभूत सुविधा ☐

आ) पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी ☐

इ) आरोग्य, स्वच्छता व शिक्षण ☐

ई) वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका ☐

२७) पेसा ५% अबंध निधीतून आपल्या जिल्ह्यातील खर्च केलेल्या निधीमधून कोणकोणते उपक्रम राबविण्यात आले आहेत ?

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

२८) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का ?

अ) उपलब्ध होऊ शकला असता ☐

आ) उपलब्ध होऊ शकला नसता ☐

इ) माहिती नाही ☐

२९) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे डुप्लीकेशन झाले आहे/होत आहे ? असे आपणास वाटते का ?

अ) होय ब) नाही

३०) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का ?

अ) होय ब) नाही

३१) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन कोणामार्फत करण्यात आले ?

☐

अ) जिल्हा परिषद

आ) ग्राम विकास विभाग ☐

इ) आदिवासी विकास विभाग ☐

ई) त्रयस्थ यंत्रणा ☐

३२) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का ?

अ) होय ब) नाही

३३) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण कोणी केले ?

अ) गट विकास अधिकारी ☐

आ) उपमुख्य कार्यकारी अधिकारी ☐

इ) मुख्य कार्यकारी अधिकारी ☐

ई) राज्यस्तरीय अधिकारी ☐

३४) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी काय उपाय योजना कराव्या लागतील असे आपणास वाटते ? (थोडक्यात लिहा)

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

३५) आपल्या जिल्ह्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणी करताना आपणास येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

३६) आपल्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

| **क्षेत्रीय कामाचा तपशील :** | |
|---|---|
| माहिती देणाऱ्याचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| माहिती घेणाऱ्याचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| दिनांक : | ठिकाण : |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन<br>आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,<br>२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१. | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |


**पेसा कायदा १९९६ व महाराष्ट्र पेसा नियम २०१४ अंमलबजावणी मूल्यमापन**
**जिल्हा समन्वयक यांचेकडून भरायची माहिती**

---

## पेसा विषयक मुलभूत माहिती

**तक्ता क्र. १**

| जिल्ह्यातील एकूण पेसा तालुकांची संख्या | जिल्ह्यातील एकूण पेसा ग्रामपंचायतीची संख्या | जिल्ह्यातील एकूण पेसा महसुली गावांची संख्या | जिल्ह्यातील एकूण पेसा गावांची संख्या | जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील एकूण लोकसंख्या | जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींची एकूण लोकसंख्या | जिल्ह्यातील एकूण क्षेत्रफळ | जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

## पेसा ५ % अबंध निधी विषयीची माहिती

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | वर्ष | प्राप्त ५ % अबंध निधी (रु.) | खर्चाचा एकूण विनियोग (रु.) | शिल्लक रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | | | | |
| २ | २०१६-१७ | | | | |
| ३ | २०१७-१८ | | | | |
| ४ | २०१८-१९ | | | | |
| ५ | २०१९-२० | | | | |
| ६ | २०२०-२१ | | | | |
| | **एकूण** | | | | |

**जिल्हा पेसा समन्वयकाचे नाव :**

**सही :**

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.** | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |

**अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम १९९६ व महाराष्ट्र पेसा नियम २०१४ अंमलबजावणी मूल्यमापन अभ्यास**

**मुलाखत अनुसूची – तालुका समन्वयक**

---

**अ) प्राथमिक माहिती :-**

| | |
|---|---|
| नाव : | |
| तालुका : | |
| जिल्हा : | |
| सदर पदावर कधी पासून कार्यरत आहात ?<br>(योग्य ठिकाणी खून करावी) | १) नव्याने<br>२) एक वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून<br>३) तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून<br>४) पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून |
| मोबाईल क्रमांक : | |
| Email ID : | |

**ब) पेसा कायदा अंमलबजावणी संबंधीची माहिती :**

१) आपणास पेसा कायद्याचे प्रशिक्षण कोणामार्फत मिळाले ?

अ) यशदा, पुणे ☐

आ) जिल्हा परिषद/पंचायत समिती ☐

इ) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र ☐

ई) स्वयंसेवी संस्था ☐

उ) इतर (नमूद करावे)

२) पेसा कायदा १९९६ ची माहिती जिल्ह्यातील गावांना कोणत्या माध्यमातून दिली ?

अ) ग्रामसभेत माहिती दिली

आ) प्रशिक्षणाद्वारे

इ) स्वयंसेवी संस्था

ई) शासनाचे अधिकारी

उ) प्रसिद्धी माध्यमाद्वारे

ऊ) इतर (नमूद करावे)

ए) अद्याप पर्यंत माहिती दिली नाही

३) आपल्या भागातील कोणकोणत्या स्तरावरील व्यक्तींना प्रशिक्षण दिले जाते ?

अ) पेसा मोबिलायझर

आ) ग्रामसभा कोष समिती सदस्य

इ) गाव स्तरीय कर्मचारी

ई) ग्रामपंचायत सदस्य

४) पेसा नियमानुसार स्थापन करण्यात आलेल्या खालीलपैकी कोणकोणत्या समित्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे ?

अ) ग्रामसभा कोष समिती

आ) साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती

इ) शांतता समिती

ई) बाजार समिती

उ) मादक द्रव्य नियंत्रण समिती

ऊ) ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती

ए) न्याय समिती

ऐ) कर्ज नियंत्रण समिती

५) शासनाने ठरवून दिलेल्या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरातील व्यक्तींचे प्रशिक्षण पूर्ण केले जाते का ?

अ) होय ब) नाही

६) शासनामार्फत आपणास दिल्या गेलेल्या प्रशिक्षणामध्ये पेसा कायद्याबाबत परिपूर्ण माहिती दिली जाते का ?

अ) होय ब) नाही

७) पेसा प्रशिक्षणामध्ये कोणकोणते विषय घेण्यात येतात ?

अ) पेसा कायदा

आ) पेसा ग्रामसभेचे अधिकार

इ) वनहक्क कायदा

ई) गौण वनउपज

उ) बाजार व सावकारी

ऊ) गौण जलसाठे

ए) जमीन हस्तांतरण

ऐ) आदिवासी समाजाची ओळख

ओ) इतर (नमूद करावे)

८) पेसा क्षेत्रात प्रशिक्षणाचे आयोजन/नियोजन करतेवेळी येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

अ) प्रशिक्षण साहित्य

आ) प्रवीण प्रशिक्षक

इ) प्रशिक्षण हॉल, लाईट, इंटरनेट, कम्प्युटर इ. सुविधा

ई) प्रशिक्षणार्थींची वेळेत उपस्थिती

उ) इतर (नमूद करावे)

९) शासनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नव्याने कोणत्या बाबींचा समावेश करणे गरजेचे वाटते ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१०) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का ?

अ) होय ब) नाही क) काही प्रमाणात

११) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१२) पेसा कायदा विषयक काही अडचणी व समस्या उद्भवल्यास आपण कोणाकडे मार्गदर्शन मागता ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१४) पेसा कायदा व नियमाला अणुसरून शासनाने काढलेले शासन निर्णय व परिपत्रके यांचे मध्ये तफावत असल्याचे दिसून येते का ?

अ) होय ब) नाही

१५) तफावत असल्यास कुठे ते नमूद करावे ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१६) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत कोणकोणत्या बाबतीत शासन निर्णय व परिपत्रके काढणे आवश्यक वाटते ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

१७) पेसा कायद्यानुसार ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना मिळालेल्या अधिकारांपैकी कोणत्या अधिकारांचा वापर आपल्या गटामध्ये जास्त झालेला आहे ?

अ) विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन ☐

आ) लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन ☐

इ) गौण खनिज व खाणपट्टा याबाबत शिफारस देणे ☐

ई) गौण खनिजांचे उत्खनन ☐

उ) मादक द्रव्यांची विक्री व सेवन ☐

ऊ) गौण वन उत्पादन मालकी ☐

ए) जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध ☐

ऐ) ग्रामीण बाजारपेठांचे व्यवस्थापन ☐

ओ) सावकारी करण्यावर नियंत्रण ☐

औ) संस्था व कार्यकर्ते यांचेवर नियंत्रण ☐

१८) प्रत्येक पेसा गावानुसार ग्रामसभेचे आयोजन करण्यासाठी आपल्या स्तरावरून कोणते प्रयत्न केले जातात ?

अ) पत्रव्यवहार ☐

आ) ग्रामसभेस उपस्थित राहून माहिती देणे ☐

इ) बैठक घेऊन माहिती देणे ☐

ई) इतर (नमूद करावे)

१९) आपल्या गटामध्ये आदिवासी समाजाचे रूढी/परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले आहेत ?

अ) रुढी/परंपरा जतन करणेबाबत ग्रामसभेत ठराव करण्यात आला ☐

आ) माहिती पुस्तिका तयार केली ☐

इ) व्हिडिओ फिल्म तयार केल्या ☐

ई) माहिती फलक लावण्यात आले ☐

उ) अद्याप केलेली नाही ☐

ऊ) इतर (नमूद करावे)

२०) आपल्या गटामध्ये लहान जलस्त्रोतांचा उपयोग कशा प्रकारे करण्यात येतो ?

अ) मत्स्य बीज सोडून लिलाव करण्यासाठी ☐

आ) शेतीला पाण्यासाठी ☐

इ) पिण्याच्या पाण्यासाठी ☐

ई) जनावरांना पाणी ☐

उ) कारखान्यांना पाणी ☐

ए) अद्याप उपयोग झालेला नाही ☐

ऐ) इतर (नमूद करावे)

२१) पेसा कायद्यानुसार गौण वनउपजबाबत ग्रामसभेमध्ये कोणती प्रक्रिया राबविली जाते ?

अ) गौण वनउपज गोळा करणे ☐

आ) लिलाव करणे ☐

इ) गौण वनउपज पुनरुज्जीवन करणे ☐

ई) गौण वनउपजा बाबत कार्यवाही करण्यात येत नाही ☐

२२) गौण वनउपज विक्रीची प्रक्रिया कोणती ?

अ) लिलावाद्वारे ☐

आ) शबरी विकास महामंडळ ☐

इ) खाजगी ठेकेदार ☐

ई) बाजारामध्ये ☐

उ) इतर (नमूद करावे)

ऊ) कोणतीच प्रक्रिया राबविली जात नाही ☐

२३) आपल्या विकास गटामध्ये मादक द्रव्यांची विक्री व सेवनाबाबतची सद्यस्थिती नमूद करा ?

अ) ग्रामसभेने मादक द्रव्याच्या विक्रीवर निर्बंध घातलेले आहे ☐

आ) मादक द्रव्यांचे सेवन होत नाही ☐

इ) मादक द्रव्यांच्या दुकानावर बंदी ☐

ई) याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही ☐

२४) पेसा ५% अबंध निधीच्या वार्षिक आराखड्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रातील कामे घेण्यात आली आहेत ?

अ) पायाभूत सुविधा ☐

आ) पेसा व वनहक्क कायद्याची अंमलबजावणी ☐

इ) आरोग्य, स्वच्छता व शिक्षण ☐

ई) वन्यजीव संवर्धन, पर्यटन व उपजीविका ☐

२५) पेसा ५% अबंध निधीतून आपल्या तालुक्यातील खर्च केलेल्या निधीमधून कोणकोणते उपक्रम राबविण्यात आले आहेत ?

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

२६) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीतील अन्य उपक्रमांद्वारे (१५ वा वित्त आयोग, आदिवासी घटक योजना इ.) निधी उपलब्ध होऊ शकला असता का ?

अ) उपलब्ध होऊ शकला असता ☐

आ) उपलब्ध होऊ शकला नसता ☐

इ) माहिती नाही ☐

२७) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५ % अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे डुप्लीकेशन झाले आहे/होत आहे ? असे आपणास वाटते का ?

अ) होय ब) नाही

२८) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजने मधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन झाले आहे का ?

अ) होय ब) नाही

२९) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे मूल्यमापन कोणामार्फत करण्यात आले ?

अ) जिल्हा परिषद ☐

आ) ग्राम विकास विभाग ☐

इ) आदिवासी विकास विभाग ☐

ई) त्रयस्थ यंत्रणा ☐

३०) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण झाले आहे का ?

अ) होय ब) नाही

३१) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजनेमधून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे/कामांचे सनियंत्रण कोणी केले ?

अ) गट विकास अधिकारी ☐

आ) उपमुख्य कार्यकारी अधिकारी ☐

इ) मुख्य कार्यकारी अधिकारी ☐

ई) राज्यस्तरीय अधिकारी ☐

३२) आपल्या तालुक्यामध्ये पेसा ५% अबंध निधी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी काय उपाय योजना कराव्या लागतील असे आपणास वाटते ? (थोडक्यात लिहा)

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

३३) आपल्या तालुक्यामध्ये पेसा कायदा अंमलबजावणी करताना आपणास येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

३४) आपल्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या अडचणी नमूद करा ?

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

| **क्षेत्रीय कामाचा तपशील :** | |
|---|---|
| माहिती देणाऱ्याचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| माहिती घेणाऱ्याचे नाव : | |
| स्वाक्षरी : | |
| दिनांक : | ठिकाण : |

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.** | दूरध्वनी- ०२०-२६३६०९४१<br>फॅक्स- ०२०-२६३६००२६<br>Email: trti.mah@nic.in |


**अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम १९९६ व महाराष्ट्र पेसा नियम २०१४ अंमलबजावणी मूल्यमापन अभ्यास**

**मुलाखत अनुसूची - सरपंच**

---

**अ) प्राथमिक माहिती :-**

| | |
|---|---|
| नाव : | |
| ग्रामपंचायत नाव : | |
| गावाचे नाव : | |
| तालुका : | |
| जिल्हा : | |
| मोबाईल क्रमांक : | |
| ई-मेल (असल्यास) | |

**ब) पेसा कायदा अंमलबजावणी संबंधीची माहिती :**

१) पेसा कायदा - १९९६ ची माहिती आपणास कशी मिळाली ?

अ) कायदा वाचून

आ) प्रशिक्षणाद्वारे

इ) स्वयंसेवी संस्था

ई) शासनाचे अधिकारी

उ) प्रसिद्धी माध्यमांद्वारे

ऊ) इतर (नमूद करावे)

ऋ) अद्याप माहिती नाही

२) ग्रामसभेत पेसा कायद्याचे वाचन झाले आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

३) पेसा कायद्याची माहिती ग्रामसभेला कोणामार्फत देण्यात आली ?

अ) सरपंच

आ) ग्रामसेवक

इ) पेसा समन्वयक

ई) जिल्हा परिषद/पंचायत समिती अधिकारी

उ) स्वयंसेवी संस्था

ऊ) अन्य (नमूद करावे)

ए) माहिती अद्याप पर्यंत दिली नाही

४) आपणास पेसा कायदा विषयक प्रशिक्षण मिळाले आहे का ?

अ) होय ब) नाही

५) पेसा कायद्याचे प्रशिक्षण मिळाले असल्यास कोणामार्फत ?

अ) यशदा, पुणे

आ) जिल्हा परिषद/पंचायत समिती

इ) पंचायत राज प्रशिक्षण केंद्र

ई) स्वयंसेवी संस्था

उ) GTC

ऊ) इतर (नमूद करावे)

६) आपल्या ग्रामपंचायतीमध्ये पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेला आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

७) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धी झाली असल्यास कोणामार्फत करण्यात आली ?

अ) शासनामार्फत

आ) स्वयंसेवी संस्था

इ) सामाजिक कार्यकर्ते

ई) शैक्षणिक संस्था

उ) ग्रामपंचायत

ऊ) इतर (नमूद करावे)

८) पेसा कायद्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी कोणते उपक्रम राबवण्यात आले ?

अ) चित्ररथ

आ) माहिती फलक

इ) गावपातळीवर कार्यशाळा

ई) ग्रामसभेमध्ये माहिती मिळाली

उ) प्रचार फेरी

ऊ) कलापथक/पथनाट्य

ए) व्हिडिओ फिल्म सादरीकरण

ऐ) पेसा कॅलेंडर

ओ) लाउड स्पीकर

औ) इतर (नमूद करावे)

९) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी शासनाकडून प्रचार व प्रसिद्धीचे साहित्य उपलब्ध झाली आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१०) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी शासनाकडून साहित्य उपलब्ध झाले असल्यास कोणते ?

अ) माहिती फलक

आ) माहिती पत्रिका ☐

इ) पुस्तके व माहिती पुस्तिका ☐

ई) कॅलेंडर ☐

उ) विविध तक्ते ☐

ऊ) व्हिडिओ फिल्म ☐

ए) लागू नाही ☐

ऐ) इतर (नमूद करावे)

११) पेसा कायद्याच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीने वार्षिक आराखड्यात निधीची तरतूद केली आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

१२) पेसा कायद्याची प्रचार व प्रसिद्धी केली असल्यास त्यासाठी कोणते उपक्रम राबवले ?

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

१३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आपल्या ग्रामपंचायतीमध्ये खालीलपैकी किती पेसा विषयक समित्या स्थापन केल्या आहेत ?

अ) ग्रामसभा कोष समिती ☐

आ) साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन समिती ☐

इ) शांतता समिती ☐

ई) बाजार समिती ☐

उ) मादक द्रव्य नियंत्रण समिती ☐

ऊ) ग्रामसभा दक्षता व सनियंत्रण समिती ☐

ए) न्याय समिती ☐

ऐ) कर्ज नियंत्रण समिती ☐

१४) सर्व समित्यांच्या कामकाजाच्या स्वतंत्र बैठका होतात का ?

अ) होय ब) नाही

१५) सर्व समित्यांच्या कामकाजात आपण सहभागी होतात का ?

अ) होय ब) नाही

१६) समित्यांच्या कामकाजात सहभागी होत असल्यास कोणकोणत्या समित्यांमध्ये सहभागी होतात ?

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

१७) समितीचे अभिलेखे व दस्तऐवज यांची ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते का ?

अ) होय ब) नाही

१८) आपल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेमार्फत पेसा मोबिलायइझरची निवड करण्यात आलेली आहे का ?

अ) होय ब) नाही

१९) पेसा मोबिलायइझरच्या नेमणुकीमुळे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी उपयोग होत आहे का ?

अ) होय ब) नाही क) तटस्थ

२०) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी इतर शासकीय विभागाच्या यंत्रणांचे (तलाठी, वनरक्षक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, शाळा व महाविद्यालये, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बँक, स्वयंसेवी संस्था व इतर अस्थापना) सहकार्य मिळते का ?

अ) होय ब) नाही क) काही प्रमाणात

२१) पेसा कायदा अंमलबजावणीसाठी तालुका व जिल्हा स्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

२२) पेसा कायदा विषयक काही अडचणी व समस्या उद्भवल्यास आपण कोणाकडे मार्गदर्शन मागता ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

२३) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभाग व राज्यस्तरावर शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे का ?

अ) होय ब) नाही क) माहिती नाही

२४) पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयामध्ये तफावत असल्याचे आपणास आढळून आले आहे का ?

अ) होय ब) नाही

२५) शासन निर्णयामध्ये तफावत आढळून आली असल्यास कोणत्या बाबी मध्ये ?

